सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, १ सप्टेंबर २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २९३ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
प्रत्येक क्षणी तुमच्या सोबत

बीमित भारत, सुरक्षित भारत
69th Anniversary
INSURED INDIA, SECURED INDIA

विश्वसनीय वर्तमान, सुरक्षित भविष्य.



आमच्यावर भरवसा ठेवल्याबद्दल आम्ही तुमचे आभार मानतो.
देशाच्या अर्थपूर्ण सेवेची 69 वर्षे साजरी करीत आहोत.

उप कंपन्या: LIC PFL LIC PENSION FUND LTD | LIC CARDS SERVICE LIMITED
सहयोगी कंपन्या: LIC HFL LIC HOUSING FINANCE LTD | LIC MUTUAL FUND | LICHFL Asset Management Company Limited

आमचा व्हाट्सअ‍ॅप नं. 8976862090 बोला 'Hi'
एलआयसी मोबाईल अ‍ॅप डाऊनलोड करा LIC digital
भेट द्या: licindia.in
कॉल सेंटर सेवा (022) 6827 6827
आम्हाला फॉलो करा: LIC India Forever
IRDAI Regn No.: 512

This pictorial representation of Map of India does not purport to be the political map of India. Map not to scale. For representation only.

LIC / P1 / 2025 - 26 / 16 / Mar

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



***भारतीय संस्कृतीमध्ये सण उत्सव व परंपरेला महत्त्वाचे स्थान आहे. देशभरात विविध भौगोलिक प्रदेशानुसार सर्वत्र सण, उत्सव व परंपरा साजरी केले जातात यालाच पर्यावरणाची ही जोड आहे. निसर्ग संपन्न वातावरणातच सर्व सण साजरे केले जातात. प्रत्येक सणानिमित्त घरांमध्ये प्रसन्न वातावरण निर्माण होते. त्यामुळे व्यक्तीला कुटुंबाला आणि समाजाला एक आत्मिक शांतता लागते आणि आनंदही मिळतो. प्रसन्न वातावरणा मुळे मनामध्ये एक सकारात्मक ऊर्जा निर्माण होते त्यामुळे प्रत्येक सणाला विशेष महत्त्व असते. त्यातच नुकताच श्रावण सरींनी अवनीला हिरव्यागार पांघरलेल्या शालू वर रंगीबेरंगी फुलांच्या नक्षीदार मखमली वर भाद्रपद सुरू होतो आणि घेऊन येतो गणेशोत्सव म्हणजेच आनंद, उत्साह, ऊर्जा, मराठी अस्मिता आणि परंपरा जपणारा भारतीय संस्कृतीचा ठेवा.***

गणेशोत्सव हा भारतीय संस्कृती मधील एक महत्त्वाचा व लोकप्रिय सण आहे. दरवर्षी भाद्रपद महिन्यातील शुक्ल चतुर्थीला गणेशोत्सवाची सुरुवात होते. हा उत्सव केवळ धार्मिक नसून सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही महत्त्वाचा आहे. भगवान गणेश हे बुद्धी, ज्ञान, समृद्धी आणि विघ्न दूर करणारे प्रथम देव मानले जातात. प्रत्येक शुभकार्याच्या प्रारंभी आद्यदेवता गणेशाची पूजा केली जाते. गणेशाच्या जन्माच्या स्मरणार्थ हिंदू लोक हा उत्सव साजरा करतात. १८९३ मध्ये लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक उत्सवाचे स्वरूप दिले. ज्यामुळे तो लोकजागृती आणि सामाजिक ऐक्याचे साधन बनला. गणेशोत्सवामध्ये



# गणेशोत्सव : एक आनंददायी आणि उत्साही पर्व

गणेश चतुर्थीला घरोघरी गणपतीच्या मूर्तीची स्थापना करतात. दीड दिवस, तीन दिवस, पाच दिवस, दहा दिवस अशा परंपरेनुसार गणेशाची विधीवत पूजा करून बाप्पाला त्याच्या आवडत्या नैवेद्याचा म्हणजेच मोदकांचा नैवेद्य दाखवतात. शेवटी अनंत चतुर्थीला मूर्तीचे विसर्जन करतात. गणेशाच्या जन्माबद्दल वेगवेगळ्या कथा सांगितल्या जातात. शिवा आणि पार्वतीचा पुत्र, हत्तीच्या डोक्याचा देव, लोकांचा म्हणजेच गणांचा स्वामी गणेश ज्याचे वाहन उंदीर म्हणजेच उंदीर आणि हत्तीप्रमाणे कोणत्याही अडचणीवर मात करून हवे ते मिळवण्याच्या क्षमतेचे प्रतीक असणाऱ्या आपल्या सर्वांच्या लाडक्या बाप्पाचा हा सण म्हणजेच शाश्वत शक्तीचे प्रतीक. गणेशोत्सवाच्या निमित्ताने समाजात एकात्मता आणि बंधुभाव वाढतो. सर्व जाती धर्मातील गरीब-श्रीमंत असा भेद न करता अबाल वृद्ध एकत्र येऊन एकमेकांच्या सहकार्याने हा उत्सव साजरा करतात. त्यामुळे समाजात समरसतेचा संदेश जातो. आपुलकी निर्माण होते. या उत्सवाला सांस्कृतिक वारसाही लाभला आहे. नृत्य, गायन, वादन, नाटक आणि विविध स्पर्धा या काळात होतात. या कार्यक्रमामधून भारतीय संस्कृतीचे विविध पैलू, कला आणि परंपरांचा प्रचार आणि प्रसार होतो. अनेक नवोदित कलाकारांना प्रोत्साहन मिळते व संस्कृतीचे संवर्धनही होते. लोककला आणि हस्तकला, पारंपारिक शिल्पकला, चित्रकला यांचा विकास होतो. स्थानिक कारागिरांना रोजगाराची संधी उपलब्ध होते. महिला मंडळही या काळात अधिक सक्रिय होतात. भजन-कीर्तन, रांगोळी, पाककला, पारंपारिक वेशभूषा, उखाणे अशा स्पर्धांमधून महिलांना समाजात आपली कौशल्य दाखवता येते व मानाचे स्थान ही मिळते. गणेशोत्सवाचा समाजातील आर्थिक घटकावरही महत्त्वपूर्ण परिणाम दिसून येतो. बाजारपेठेत या काळात विविध वस्तूंची मागणी वाढते. गणेश मूर्ती, सजावट साहित्य, पूजा सामग्री, वस्त्र, फळ, मिठाई आणि इतर वस्तूंच्या विक्रीतही लक्षणीय वाढ होते. स्थानिक व्यावसायिकांना फायदा होतो. अर्थव्यवस्थेला योगदान मिळते तसेच या उत्सवाचे शैक्षणिक महत्त्वही लक्षात घेतले पाहिजे. यानिमित्ताने विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा व इतिहासाबद्दल माहिती मिळते. शाळांमधून गणेश उत्सवानिमित्त विविध स्पर्धा आयोजित केल्याने विद्यार्थ्यांमध्ये एकात्मता, सहकार्य, बंधू भावाची भावना वाढते. त्यांच्यावर चांगले संस्कार होतात. गणेश उत्सवाच्या काळात आधुनिकतेचा आणि पारंपारिकतेचा संगम पाहायला मिळतो. काही ठिकाणी तंत्रज्ञानाच्या मदतीने तयार केलेले देखावे, आधुनिक संगीत, लाईट शो, डीजे तर काही ठिकाणी शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम यामुळे अलीकडील उत्सवात आधुनिकता स्वीकारून पारंपारिक तेला जपून उत्सव अधिक आकर्षक रित्या साजरा केला जातो. त्यामुळेच अलीकडे हा उत्सव इतर सर्व गोष्टींबरोबरच पर्यावरण पूरक कसा होईल याची सर्वजण दक्षता घेत आहेत. पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी शाडूची माती, नैसर्गिक रंग, कृत्रिम तलावात मूर्ति विसर्जन, फटाक्यांऐवजी वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, अन्नदान यासारख्या गोष्टींचा अवलंब केला जात आहे. पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करणे ही काळाची गरज आहे, ज्यामुळे सणाचे पावित्र्य टिकून राहील आणि पर्यावरणाचे संरक्षणही होईल. पर्यावरणाला सन्मान देऊन सण साजरी केले तर आपण एक समृद्ध आणि सशक्त समाज निर्माण करू शकतो. भारतासह देश-विदेशात पोहोचलेला गणेशोत्सव काळानुरूप बदलत आहे. आज सर्वजण पर्यावरणाविषयी अधिक सजग झाले आहेत. पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करत आहे. त्यात आपलाही सहभाग नोंदवूया, इतरांनाही आग्रह करूयात आणि कोणतेच सण पर्यावरणाला हानिकारक ठरणार नाहीत याबाबत जाणीव जागृती करून सामाजिक परिवर्तन करूयात.

**गणपती बाप्पा मोरया**
**मंगलमूर्ती मोरया।।**

**- कविता धन्यकुमार हिंगमिरे**
जि. प. शाळा खंडाळी (ता. माळशिरस)



# गणेशोत्सवात सामाजिक उपक्रमाला महत्व

## तहसीलदार शिल्पा ठोकडे : अरोग्य शिबिरात ३०२ जणांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.३१ ऑगस्ट-**

गणेशोत्सव हा सामाजिक एकतेचा संदेश देणारा सण असून या उत्सवात सामाजिक उपक्रम राबवणे महत्वाचे आहे. अशा उपक्रमाचा समाजाला फायदा होत असल्याचे प्रतिपादन तहसीलदार शिल्पा ठोकडे यांनी केले.

येथील गजानन सोशल अँड स्पोर्ट्स क्लबतर्फे गणेशोत्सवानिमित्त आयोजीत अरोग्य व रक्तदान शिबिराच्या उद्घघाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. येथील वेताळ पेठेत झालेल्या या शिबिरात ९४ जणांनी रक्तदान केले तर ३०२ जणांची अरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये ७३ जणांची मोतीबिंदू व नेत्र तपासणी तर १३५ जणांची रक्त तपासणी करण्यात आली. यावेळी आयोजक व क्लबचे संस्थापक अध्यक्ष मा. नगराध्यक्ष प्रशांत ढाळे, संजीवनी हॉस्पिटलचे डॉ. सुहास कुलकर्णी तसेच क्लबचे सदस्य उपस्थित होते. मंडळाचे यंदा २६ वे वर्ष असून या मंडळात सर्व जाती-धर्माचे युवक कार्यरत असून तन-मन धनाने गणेशाप्रती भक्ती भाव ठेवून समाजाच्या कल्याणासाठी काम करत असल्याचे अध्यक्ष ढाळे यांनी सांगितले.

# मूकबधीर शाळेतील मुलांना अन्नदान; गणेश मित्र मंडळाचा उपक्रम



**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ३१ ऑगस्ट-**

करमाळा येथील फंड गल्ली येथे असणारे श्री गणेश मित्र मंडळाने सगळ्यात आगळा वेगळा स्मित उपक्रम राबवला आहे डीजे, डॉल्बी वर पैसे खर्च नकरता श्री कमलाभवानी मूकबधिर निवास विद्यालय देवीचामाळ करमाळा येथील मुलांना भोजन देऊन अनोखा उपक्रम राबवला आहे. यावेळी अध्यक्ष रोहन गायकवाड, उपाध्यक्ष विठ्ठल फुटाणे, खजिनदार यश काळे, सचिव सूर्यचरण जानगाम, सदस्य ओम मारडकर, ओम क्षीरसागर, समर्थ क्षीरसागर, यश खंडागळे, गुरु गोणेकर, पवन मारडकर उपस्थित होते.

# नो डॉल्बी, नो डीजे; पारंपारिक वाद्यांचा करा वापर

## विभागीय पोलीस अधिकारी यामवार यांचे आवाहन



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ ऑगस्ट-**

पारंपारिक वाद्याचा वापर करा. पर्यावरण पुरक उत्सव साजरे करा. जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांच्या आदेशाने सर्व गणेश मंडळांनी नो डीजे नो डॉल्बी ही संकल्पना राबवायची आहे. याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येणार आहे. डीजे, डॉल्बी लावल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा इशारा विभागीय पोलीस अधिकारी विलास यामवार यांनी दिला.

अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे हद्दीत गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद निमित्त रविवारी तहसील कार्यालयात गणेश मंडळांचे अध्यक्ष व पदाधिकारी, डीजे डॉल्बीधारक यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी. कोणतेही जातीय, धार्मिक तणाव निर्माण होऊ नये, नो डीजे नो डॉल्बी संकल्पना राबविण्यात यावी, पारंपरिक वाद्याचा वापर करावा, पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करावा याबाबत विभागीय पोलीस अधिकारी यामवार यांनी सुचना दिल्या. यावेळी तहसीलदार शिल्पा पाटील, उत्तरचे पोलीस निरिक्षक दिपक भिताडे दक्षिणचे पालीसे निरिक्षक सुरेश चिल्लावार, सपोनी निलेश बागाव, पोसई सतीश रणवरे यांच्यासह गणेश मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# पिलीव येथे आज रक्तदान शिबीर

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि ३१ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील संग्राम दोस्ती मंडळ व पिलीव पोलीस स्टेशनच्या वतीने १ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते २ या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.सदराच्या शिबिराचे आयोजन संग्राम दोस्ती मंडळाचे संस्थापक याकुब (तालुभाई) सय्यद यांच्या स्मरणार्थ व मंडळाचे माजी अध्यक्ष सालारखान पठाण यांच्या संकल्पनेतून आयोजीत करण्यात आले आहे.

तरी पिलीव परिसरातील नागरिक, तरूणानी मोठ्या संख्येने या रक्तदान शिबिरास उपस्थित राहण्याचे आवाहन मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

# विष्णू महेश प्रतिष्ठान व गोविंदराज गणेशोत्सव मंडळातर्फे अथर्वशीर्ष पठण

## २५० महिलांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

जुना विडी घरकुल येथे विष्णु महेश प्रतिष्ठान व गोविंदराज नगर गणशोत्सव मंडळाच्यावतीने अथर्वशीर्ष पठणचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये २५० महिला सहभागी झाल्या होत्या.

श्रीच्या सामूहिक अथर्वशीर्ष पठणास सकाळी ७.३० वाजता नित्य पूजनाने सुरुवात करण्यात आली. नित्य पुजेनंतर श्रींच्या प्रतिकात्मक मूर्तीस अभिषेक, विष्णू महेश प्रतिष्ठानचे संस्थापक प्रथमेश कोठे यांच्या हस्ते करण्यात आला. अथर्वशीष पठणानंतर जमलेल्या भाविकांच्या हस्ते श्रींची महाआरती करण्यात आली. या कार्यक्रमाचे पौरोहित्य पंडित वेणुगोपाल जिल्ला, अन्नपूर्णा जिल्ला, देविदास यंगलदास, सागर यंगलदास. राजू बुर्ला यांनी केले. यावेळी विष्णु महेश प्रतिष्ठानचे संस्थापक प्रथमेश कोठे, सी.ए. चंद्रकांत इंजामुरे, विठ्ठल कोटा, वासुदेव यलदंडी, विडी घरकुल मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष अविनाश दासरी, नरेश कोलप्याक आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. महिलांनी मुख्य अथर्वशीर्ष पठण करीत गणरायाला नमन केले. मोरया मोरया गणपती बाप्पा मोरया असा गणेश नामाचा गजर करताना प्रत्येक महिलेच्या चेहऱ्यावरील उत्साह ओसंडून वाहत होता.

कार्यक्रम संपल्यानंतर सर्व महिलांना वाण भेट देण्यात आला. जुना विडी घरकुल येथे सामूहिक अथर्वशीर्ष पठणाची सुरूवात करणारे हे मंडळ पहिले आहे.



# गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था लोकाभिमुख करण्यावर भर!

***शिक्षण हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे आणि राष्ट्राच्या प्रगतीचे मूळ आहे. शिक्षणामुळे केवळ ज्ञानसंपादन होत नाही तर आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक जबाबदारी आणि आर्थिक स्वावलंबनाची वाट खुली होते. म्हणूनच शासनाने शिक्षण सर्वांसाठी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक घटकातील विद्यार्थ्यांना समान संधी देण्यासाठी राज्य शासनाने विविध योजना आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे शक्तिशाली साधन आहे. आजच्या युगात शिक्षण व्यवस्थेला विद्यार्थ्यांच्या गरजा, स्वप्ने आणि क्षमतांशी जोडणे ही काळाची गरज आहे. या जाणिवेतून शासनाने शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख करण्यासाठी अनेक ठोस पावले उचलली आहेत. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०20 अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, संशोधन वृत्तीला आणि कौशल्यविकासाला चालना देणारे उपक्रम राबवले जात आहेत.***

अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ राज्य शासनाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. राज्यात २६ फेब्रुवारी २०२४ पासून सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (डएइड) आरक्षणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी तसेच शासकीय सेवांमधील सरळसेवेसाठी १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. यानंतर मा. न्या. शिंदे समितीच्या शिफारशीनुसार मराठा समाजातील काही विद्यार्थ्यांना कुणबी, कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी जातीचे म्हणजेच इतर मागास वर्ग प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळाले आहे. मात्र या विद्यार्थ्यांपैकी अनेकांना जातवैधता प्रमाणपत्र तातडीने न मिळाल्याने प्रवेश प्रक्रियेत अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर राज्यशासनाने अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सुरुवातीला सहा महिने, त्यानंतर तीन महिन्यांची मुदतवाढ दिली होती. तरी देखील काही विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळवण्यास अडचणी येत आल्याचे निदर्शनास आले आणि अनेक विद्यार्थ्यांनी तक्रारी केल्या होत्या याची राज्य शासनाने दखल घेऊन पुन्हा तीन महिन्यांची अतिरिक्त मुदतवाढ दिली आहे.

याशिवाय, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे प्रवेश जातवैधता प्रमाणपत्रांच्या अभावी त्यांचे प्रवेश रद्द होणार नाहीत आणि शैक्षणिक नुकसान टळणार आहे.

तंत्रशिक्षणातील प्रवेशांची आकडेवारी (२०२४-२५) सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग आरक्षणाच्या अंमलबजावणीनंतर राज्यातील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये मराठा विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रवेश घेतले आहेत.

तंत्रशिक्षणातील प्रवेशांची आकडेवारी (२०२४-२५) पदवी : १७ हजार ७७८, पदव्युत्तर : १ हजार ९२७, डिप्लोमा : ७ हजार ३५४ म्हणजेच एकूण २७ हजार ०५९ विद्यार्थी यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये SEBC आरक्षणाअंतर्गत प्रवेश घेतलेला आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. ही योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे. यामध्ये मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा आणि कुणबी-जातीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाने सुरु केलेली डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना ही विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे. सन २०२२-२३ पासून या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक पाठबळ मिळू लागले असून, उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढत असून शिक्षणाचा दर्जा वाढविण्यास मदत होत आहे.

या योजनेअंतर्गत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. विद्यार्थ्यांना केवळ शुल्क सहाय्यच नव्हे, तर वसतिगृह, पुस्तके, अभ्यास साहित्य, प्रवास भत्ता आदी विविध सुविधा पुरवल्या जातात.यामुळे मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील गरीब व हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन.आणि आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक जगात उभे करण्यासाठी शैक्षणिक मदत होऊन उच्च व तांत्रिक शिक्षण घेताना होणारा आर्थिक खर्चही कमी होतो त्यामुळे उच्च शिक्षणात विद्यार्थांचे प्रमाण वाढते.

छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी लक्षित गटातील पीएच.डी. करणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीच्या माध्यमातून विशेष प्रोत्साहन देण्याकरिता सन २०१९ या वर्षापासून छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (उडचछठऋ) सुरु करण्यात आली आहे. सदर छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती अंतर्गत लक्षित गटातील ३०७८ विद्यार्थ्यांना सारथी संस्थेद्वारे सन २०२३ पर्यंत अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यात आली आहे.आज रोजी पर्यंत ३९३ विद्यार्थ्यांची झहऊ पुर्ण झाली असून ११० विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी नोकरी लागली आहे. या विद्यार्थ्यांपैकी २३ विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन विषयात पेटंट मिळाला आहे.

**विद्यार्थ्यांना देण्यात येणारी विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे अधिछात्रवृत्ती :**

JRF प्रमाणे (प्रथम ०२ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती णत्रऋ निकषा नुसार ५ लाख ५३ हजार ३००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ४६ हजार १०८ आहे. तसेच SRF प्रमाणे (२ वर्षानंतर पुढील ०३ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती ६ लाख २९ हजार ८००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ५२ हजार ४८३ देण्यात येते. अधिछात्रवृत्ती अंतर्गत अंतिमरित्या निवड झालेल्या उमेदवारांना आर्थिक सहाय्य हे सारथीकडून ज्या रोजी अवार्ड लेटर (ward Letter) दिले जाईल, त्या तारखेपासून पुढे पीएच.डी. करिता पाच वर्ष किंवा उमेदवार संशोधनासाठी विद्यापीठ महाविद्यालय/संस्था येथे रुजू झालेला असेल. (विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थेच्या अहवालातील नमूद रुजू तारीख), या वेळी जी नंतरची तारीख असेल त्या तारखेपासून उमेदवाराच्या फक्त उर्वरित कालावधीसाठी पीएच.डी. च्या फक्त उर्वरित कालावधीसाठी एकुण ५ वर्षांच्या कालावधीच्या आधारे किंवा उमेदवारांनी ज्या तारखेस संशोधन अहवाल (Dissertation) सादर केला असेल, यापैकी जी अगोदरची तारीख असेल त्या तारखेपर्यंत अनुज्ञेय राहील. निवड झालेल्या लाभार्थ्यांना रक्कमे संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे अंतर्गत होणाऱ्या बदलानुसार अधिछात्रवृत्ती अनुज्ञेय राहील. अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत सन २०१९ मध्ये पात्र विद्यार्थी ५०३, पीएचडी घेतलेले विद्यार्थी २४६, नोकरी लागलेले विद्यार्थी ७४ आहेत. सन २0२0 मध्ये पात्र विद्यार्थी २०४, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ८०, नोकरी लागलेले विद्यार्थी १८ आहेत. सन २०२१ मध्ये पात्र विद्यार्थी ५५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ६४, नोकरी लागलेले विद्यार्थी १० आहेत. सन २०२२ मध्ये पात्र विद्यार्थी ८५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ४, नोकरी लागलेली विद्यार्थी १ आहेत. सन २०२३ मध्ये पात्र विद्यार्थी ९६९ आहेत.

**परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती**

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या जातीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घेता येत नाही. विद्यार्थ्यांची गुणवत्ता असून आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी जातीतील मुलामुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी/पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी QS World Ranking मध्ये २०० च्या आत रॅन्कीग असलेल्या शैक्षणिक संस्था/विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश घेतील अशा मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील एकत्रितपणे ७५ विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत सयाजीराव गायकवाड-सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राबविण्यात येत आहे.

सारथी संस्थेमार्फत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या लक्षित गटातील विद्यार्थ्यांकरिता डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती सन २०२२-२३ पासून २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशित पात्र विद्याध्यर्थ्यांना ही शिष्यवृत्ती लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्रतील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे. देशाच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत भारतातील शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तनाची सुरुवात झाली आहे. देशातील एकूण नोंदणी गुणोत्तर (Gross Enrollment Ratio - GER) ५० टक्के पर्यंत नेण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट गाठण्यासाठी, भारताने जागतिक दर्जाचे शिक्षण आणि संशोधन भारतातच उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली आहेत. महाराष्ट्रातही विविध अभिनव आणि परिवर्तनशील उपक्रम शिक्षण क्षेत्रात राबविले आहेत. यामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांपर्यंत संधींची समान उपलब्धता आणि संशोधनाला चालना यावर अधिक भर देऊन गुणवत्तापूर्ण शैक्षणिक बदल करून राज्यातील शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख केली जात आहे.

**- काशीबाई थोरात-धायगुडे**
विभागीय संपर्क अधिकारी
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित



## विचारपुष्प



आपल्या देशामध्ये इंग्रज सरकारद्वारे आपली अस्मिता नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मोठ्या प्रमाणावर ते यशस्वी सुद्धा झाले. अशा अस्मिताविहीन समाजाला जागृत करणे अत्यंत आवश्यक कार्य होते. हेच कार्य पूजनीय डॉ. हेडगेवारांनी केले आहे. हिंदू समाजाला जागृत करून, संघटित करून डॉ. हेडगेवार यांनी हिंदुराष्ट्र पुनर्जागरणाची घोषणा केली. आपण सर्व स्वयंसेवक याच दिशेने पुढे जात आहोत. या मार्गावर चालताना छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र निरंतर प्रेरणादायी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांसारखे चारित्र्य सर्व स्वयंसेवकांनी निर्माण केले पाहिजे. त्यांच्या चरित्रातून विविध गुण आपण संपादित करू शकतो, अशा प्रकारचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

**- कृ. सूर्यनारायण राव**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. सेवा प्रमुख

# मैत्रीचे नवे पर्व सुरू

## दहशतवादविरोधी लढ्यात चीनने साथ द्यावी : पंतप्रधान मोदी

**तियानजिन, ३१ ऑगस्ट**

दहशतवाद हा संपूर्ण जगासाठी धोका असून, या विरोधातील लढ्यात चीनने भारताला साथ द्यावी, असे आवाहन पंतप्रधानन नरेंद्र मोदी यांनी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांना केले.

दोन्ही देशांमधील सहकार्य २.८ अब्ज लोकांच्या कल्याणाशी जोडलेले असल्याने परस्पर विश्वास, आदर आणि संवेदनशीलतेवर आधारित चीनसोबत संबंध पुढे नेण्यास भारत वचनबद्ध आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी झालल्या चर्चेदरम्यान सांगितले.

सीमेवरील दोन्ही बाजूंनी लष्कर मागे हटवल्याने शांतता आणि स्थिरतेचे वातावरण निर्माण झाले, असे बैठकीतील उद्घाटन भाषणात मोदींनी नमूद केले. आपले सहकार्य आपल्या दोन्ही देशांच्या २.८ अब्ज लोकांच्या हिताशी जुळलेले आहे. त्यामुळे संपूर्ण मानवतेच्या कल्याणाचा मार्गही मोकळा होईल, असे मोदी यांनी सांगितले.

परस्पर विश्वास, आदर आणि संवेदनशीलतेवर आधारित आमचे संबंध पुढे नेण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत, असे ते म्हणाले. आपल्या भाषणात मोदींनी मागील वर्षी ऑक्टोबरमध्ये शी यांच्याशी झालेल्या भेटीनंतर दोन्ही बाजूंनी सुरू केलेल्या उपाययोजनांची यादीही दिली.

मागील वर्षी कझानमध्ये आपल्यात सकारात्मक चर्चा झाली. त्यामुळे आपल्या संबंधांनाही सकारात्मक दिशा मिळाली. सीमेवरील लष्कराच्या माघारीनंतर आता शांतता आणि स्थैर्याचे वातावरण आहे. आमच्या विशेष प्रतिनिधींनी सीमा व्यवस्थापनावरही करार केला आहे. कैलाश मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू झाली आहे, असे मोदी म्हणाले. (वृत्तसंस्था)



**चर्चेतील चार महत्त्वाचे मुद्दे**
- धोरणात्मक संवाद वाढवून परस्पर विश्वास मजबूत करणे.
- सहकार्य आणि आदान-प्रदान वाढवून दोघांसाठीही समान फायदे मिळवणे.
- परस्परांच्या काळजींचा सन्मान करून शांतिपूर्ण सहअस्तित्व समोर नेणे आणि या संबंधांवर सीमावादाचा प्रभाव पडू न देणे.
- बहुपक्षीय सहकार्य मजबूत करून आशिया आणि जगभरात शांतता आणि समृद्धीसाठी काम करणे.

## हत्ती-ड्रॅगनची मैत्री ठरेल निर्णायक : शी जिनपिंग

**तियानजिन, ३१ ऑगस्ट**

मित्र होणे, चांगले शेजारी होणे तसेच ड्रॅगन आणि हत्तीला सोबत येणे अतिशय गरजेचे आहे. हत्ती आणि ड्रॅगनमधील मैत्री निर्णायक ठरेल, असा स्पष्ट संदेश चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत झालेल्या चर्चेनंतर दिला आहे.

मागील वर्षी कझान येथील चर्चेनंतर नरेंद्र मोदी आणि शी जिनपिंग यांची रविवारी पहिल्यांदाच भेट झाली तसेच नरेंद्र मोदी सात वर्षांनंतर चीनला गेले आहेत. नरेंद्र मोदी आणि शी जिनपिंग यांच्यात जवळपास तासभर चर्चा झाली.

तुमच्यासोबत पुन्हा भेट झाल्याने आनंद झाला. शांघाय सहकार्य परिषदेसाठी मी आपले स्वागत करतो. आपली मागील वर्षी कझान येथील भेट यशस्वी झाली होती, असे शी जिनपिंग यांनी मोदी यांचे स्वागत करताना म्हटले. आपली ही भेट ऐतिहासिक असून, जग सध्या मोठ्या बदलांमधून जात आहे. चीन आणि भारत केवळ प्राचीन संस्कृतीच नव्हे, तर सर्वाधिक लोकसंख्या असलेले देश आहेत, असे शी जिनपिंग म्हणाले.

भारत आणि चीनमधील राजनयिक संबंधांना ७५ वर्षे होत आहेत. अशा परिस्थितीत दोन्ही देशांनी परस्पर संबंधांना धोरणात्मक तसेच दीर्घकालीन दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. दोन्ही देशांनी आपले ऐतिहासिक दायित्व पूर्ण करताना मल्टिलॅटरिझम, मल्टिपोलर वर्ल्ड आणि आंतरराष्ट्रीय संस्थांना अधिक प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. सोबतच आशिया आणि जगात शांतता व समृद्धी आणण्यासाठी एकत्रित काम करणे आवश्यक आहे, असे जिनपिंग यांनी म्हटले. अमेरिकेसोबत झालेल्या शुल्क वादानंतर दोन्ही नेत्यांच्या भेटीकडे जगाचे लक्ष लागले होते. (वृत्तसंस्था)

## आज महालक्ष्मी पूजन



## न्यायाधीश नियुक्त्यांमध्ये महिलांना द्यावे प्राधान्य

**नवी दिल्ली, ३१ ऑगस्ट**

देशातील उच्च आणि सर्वोच्च न्यायालयांमधील नियुक्त्यांमध्ये महिला न्यायाधीशांना प्राधान्य देण्याची मागणी करणारे पत्र सरन्यायाधीशांना पाठविले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या बार असोसिएशनने नुकताच यासंदर्भात ठराव मंजूर केला.

बार असोसिएशनने नुकत्याच झालेल्या सर्वोच्च न्यायालयातील नियुक्त्यांवरही तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी म्हटले की, २०२१ पासून सर्वोच्च न्यायालयात एकाही महिला न्यायाधीशाची नियुक्ती झालेली नसून ही परिस्थिती निराशाजनक आहे. बार असोसिएशनचे अध्यक्ष विकास सिंह यांनी यापूर्वीही २४ मे आणि १८ जुलै रोजी सरन्यायाधीश भूषण गवई यांना पत्र लिहून न्यायव्यवस्थेत महिला प्रतिनिधित्व वाढवण्याची मागणी केली होती. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### अमेरिकेसाठी टपाल सेवा पूर्णतः बंद

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के शुल्क लावण्याचा निर्णय घेतल्यानंतर, भारताच्या वतीनेही सतत मोठे निर्णय घेतले जात आहेत. आता भारताने अमेरिकेसाठीची टपालसेवा पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेला जाणारी पत्रं, दस्तावेज आणि भेटवस्तूंची नोंदणी बंद करण्याचा निर्णय भारतीय टपाल खात्याने घेतला आहे.

सरकारने दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेला जाणाऱ्या टपालाच्या परिवहनासाठी विमानसेवांची असमर्थता आणि अमेरिकेने लागू केलेल्या नव्या नियमावलीनुसार नियमितीकरण संसाधने उपलब्ध नसल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. तत्पूर्वी, २२ ऑगस्ट रोजी भारत सरकारने १०० अमेरिकी डॉलर्सपर्यंत मूल्य असलेल्या पत्र, दस्तावेज आणि भेटवस्तू वगळता इतर टपालांची बुकिंग ऑगस्टपर्यंत निलंबित केली होती. मात्र, आता प्रत्येक वर्गवारीतील सर्व टपालांवर स्थायी स्वरुपात बंदी घालण्यात आली आहे.

### ऑस्ट्रेलियाला नकोत भारतीय स्थलांतरित!

**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलियातील विविध शहरांमध्ये हजारो स्थानिकांनी स्थलांतरितांच्या विरोधात आंदोलनांची सुरुवात केली आहे. यामध्ये, त्यांनी भारतीय प्रवाशांवरही आरोप केले आहेत. दरम्यान, ऑस्ट्रेलिया सरकारने मात्र, अशा आंदोलनांची निंदा करून हा विषय नियो-नाझी लोकांचा असल्याचे म्हटले आहे. मार्च फॉर ऑस्ट्रेलिया नावाने करण्यात येत असलेल्या या प्रदर्शनाच्या जाहिरातींमध्ये मूळ भारतीय वंशाचे लोक प्रामुख्याने दाखविले जात आहेत. भारतीय वंशाचे लोक ऑस्ट्रेलियन लोकसंख्येच्या ३ टक्के झाले आहेत.

# शरद पवारांनी मराठ्यांचं वाटोळं केलं

## संतप्त मराठा आंदोलकांचा सुप्रिया सुळेंवर रोष; ताफा अडवला

**मुंबई, ३१ ऑगस्ट**

आंदोलक मनोज जरांगे यांना भेटून आंदोलन स्थळावरुन परत जात असताना मराठा आंदोलक आक्रमक झाले आणि त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांना घेरावा घातला, त्यांची गाडी अडवली आणि पिण्याच्या पाण्याच्या खाली बाटल्यादेखील भिरवल्या. यावेळी शरद पवारांनी मराठ्यांचं वाटोळ केलं, अशा घोषणा देत, आंदोलकांनी आपला रोष व्यक्त केला.



खासदार सुप्रिया सुळे यांच्याविरोधात नारेबाजी करताना आंदोलक

मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण द्यावे, यासह विविध मागण्यांसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे हे मुंबईतील आझाद मैदानात गेल्या तीन दिवसांपासून बेमुदत उपोषणाला बसले आहेत. विरोधी पक्षातील खासदार आणि आमदार मनोज जरांगे यांची भेट घेताना दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी जरांगे यांची भेट घेतली. यावेळी मराठा समाजाचा वडीलांवरील रोषाचा सामना मुलीला करावा लागल्याचे चित्र बघायला मिळाले. (तभा वृत्तसेवा)

# सीमेवर शांततेसाठी मतैक्य

## • भारत-चीनमध्ये सहमती • परराष्ट्र मंत्रालयाची माहिती

**नवी दिल्ली, ३१ ऑगस्ट**

सीमेवर शांतता ठेवण्यावर, द्विपक्षीय संबंध बळकट करण्यावर, दहशतवादाच्या विरोधात एकजूट राहण्यावर भारत आणि चीनमध्ये सहमती झाली असल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने शनिवारी दिली.

जिनपिंग यांच्यासोबत झालेल्या चर्चेदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सीमापार दहशतवादाचा मुद्दा उपस्थित केला, अशी माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी पत्रकार परिषदेत दिली. भारत आणि चीन त्यांच्या देशांतर्गत विकासावर लक्ष केंद्रित करतात आणि या प्रक्रियेत परस्परांना प्रतिस्पर्धी नव्हे तर भागीदार समजले पाहिजे, या मुद्यावर दोन्ही नेत्यांनी भर दिला. मतभेद वादात बदलू नयेत आणि स्थिर तसेच मैत्रिपूर्ण संबंध २.८ अब्ज लोकांसाठी फायदेशीर असतील, यावरही दोन्ही नेत्यांत सहमती झाली आहे.



भारत-चीन संबंध बळकट व्हावेत यासाठी शी जिनपिंग यांनी चार प्रस्ताव दिले आहेत. यावर नरेंद्र मोदी यांनी सकारात्मक प्रतिक्रिया दिली. द्विपक्षीय संबंध आणि स्थैर्यासाठी सीमाभागात शांतता आवश्यक आहे तसेच लोकांमध्ये संपर्क वाढवण्यासारख्या मुद्यांवरही चर्चा झाली. भारत आणि चीनने एकत्र येऊन बहुध्रुवीय आशियाच्या निर्मितीच्या दिशेने काम करायला पाहिजे, यावरही दोन्ही नेत्यांत सहमती झाल्याचे मिस्री यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# बळजबरीने धर्मांतर करविल्यास जन्मठेप

**जयपूर, ३१ ऑगस्ट**

रविवारी होणाऱ्या विधानसभेच्या अधिवेशनापूर्वी, भजनलाल मंत्रिमंडळाने काही सुधारणांसह राजस्थान बेकायदेशीर धार्मिक धर्मांतर प्रतिबंधक विधेयकाला मंजुरी दिली आहे. विधेयकाच्या नवीन मसुद्यात, जबरदस्तीने धर्मांतर केल्यास जन्मठेपेपर्यंतच्या शिक्षेसह कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत.

नवीन विधेयकात, घरवापसी हे धार्मिक धर्मांतर मानले जात नाही. मूळ पूर्वजांच्या धर्माकडे परतणे हे धार्मिक धर्मांतराच्या व्याख्येत समाविष्ट नाही. सरकार सोमवारपासून सुरू होणाऱ्या विधानसभेच्या अधिवेशनात हे विधेयक सादर करू शकते.

कायदा मंत्री जोगाराम पटेल म्हणाले, बेकायदेशीर धार्मिक धर्मांतरात सहभागी असलेल्या संस्थेची नोंदणी रद्द करणे, राज्य सरकारकडून मिळणारे अनुदान थांबवणे आणि ज्या ठिकाणी बेकायदेशीर धार्मिक धर्मांतर झाले आहे, ती मालमत्ता चौकशीनंतर जप्त करणे किंवा पाडणे अशी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

# मनोज जरांगे आजपासून पाणी पिणेही बंद करणार

## आरक्षणाबाबत तातडीने निर्णय घ्या

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. ३१ ऑगस्ट**

मराठा आरक्षणासाठी गेल्या तीन दिवसापासून सुरू असलेले आंदोलनाची धार आणखी तीव्र होणार आहे, ही गर्दी नाही मराठ्यांच्या वेदना आहेत, असा इशारा मनोज जरांगे-पाटील यांनी रविवारी दिला. उद्यापासून मी पाणीही घेणार नसून आमरण उपोषण सुरु आहे, आरक्षण घेतल्याशिवाय उठणार नसल्याचे त्यांनी जाहीर केले.

त्यांना पाठिंबा देण्यासाठी राज्यभरातील हजारो मराठा बांधव देखील मुंबईत ठाण मांडून आहेत. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन वातावरण तापलेले असून रविवारी त्यांनी सीएसएमटी स्थानकाच्या परिसरासह, गेट वे,मरीन लाईन्स समुद्र किनाऱ्यावर निदर्शने करीत सरकारचा निषेध केला. सकाळी इतिहास अभ्यासकांशी चर्चा केल्यानंतर मनोज जरांगे यांनी पत्रकाराशी बोलताना राज्य सरकार व काही नेत्यांवर थेट आरोप करत जोरदार टीका केली. ते म्हणाले की, ''ट्रक भरून अन्न थेट आझाद मैदानात आणू नका. आम्ही इथे उपोषणाला बसलो आहोत, अन्नछत्राच्या नावाखाली कोणीही पैसे कमावू नये. हे आंदोलन पवित्र आहे, त्याचा वापर व्यवसायासाठी करू नका, ''मुंबईत आमची गर्दी नाही, इथे वेदना आहेत. या आंदोलनामागे राजकीय ताकद नाही, तर अन्यायाविरुद्धचा आक्रोश आहे,'' असं त्यांनी ठणकावून सांगितले. ''महाराष्ट्रातील मराठा बांधवांनी कोणालाही पैसे देऊ नये. स्वार्थी लोक या आंदोलनात असू नयेत,'' असंही आवाहन त्यांनी केलं. उपोषणाच्या स्वरूपातही मोठा बदल जाहीर करत त्यांनी सांगितलं की, ''उद्यापासून मी पाणी पिणं बंद करणार आहे. आमरण उपोषण अधिक कडकपणे सुरू होईल. कोणत्याही परिस्थितीत आता मागे हटणार नाही.''

''काहीही करून आम्हाला आरक्षण मिळवायचं आहे. तोपर्यंत मुंबई सोडणार नाही. सरकारने वेळ वाया घालवू नये,'' असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. सोबतच त्यांनी आपल्या समाजाला संयम बाळगण्याच आवाहनही केले. ''मराठा समाजाच्या तरुणांनी कुठेही दगडफेक करू नये, शांत राहा. आपले आंदोलन अहिंसात्मक आहे, ते तसेच ठेवायचे आहे.'' चंद्रकांत पाटील यांनी यापुढे मराठा विषयावर बोलू नये. कारण त्यांनीच मुख्यमंत्र्यांच्या सांगण्यावरून मराठा समाजाचे जात पडताळणीचे काम थांबवले होते. ओबीसी प्रवर्गातून मराठा समाजाला आरक्षण मिळाल्याशिवाय मी मुंबई सोडणार नाही. सरकारनं वेळकाढूपणा थांबवावा आणि तातडीने निर्णय घ्यावा.''

### आंदोलनानंतर नितेश राणेला बघतोच

जरांगे- पाटील हे सरकारला इशारा देताना म्हणाले,पुढील शनिवारी आणि रविवारी परिस्थिती हाताबाहेर जाईल. त्यामुळे आताच आरक्षण द्या. लोकांचं संतापाचे रूप भयानक असेल. एकदा आमचे आंदोलन संपू दे, मग नितेश राणे किती दमदार आहेत ते आम्ही बघतोच.'' ते पुढे म्हणाले, ठाकरे ब्रँड चांगला आहे, मात्र राज ठाकरे कुजक्या कानाचे आहेत. प्रत्येकवेळी वेगळी भूमिका घेतात. लोकसभेवेळी त्यांनी मुख्यमंत्र्यांना मदत केली.मात्र विधानसभेत त्यांच्या मुलाला पाडले,अशी टीकाही केली.

# राम मंदिराच्या शिखरावर धार्मिक ध्वज फडकणार

## विवाह पंचमीला होणार कार्यक्रम, राष्ट्रपती, पंतप्रधान मोदी, डॉ. मोहनजी भागवत यांची उपस्थिती, १० हजार पाहुणे येणार

**अयोध्या, ३१ ऑगस्ट**

अयोध्येत रामलल्लाच्या प्राण प्रतिष्ठेनंतर, ऐतिहासिक ध्वजारोहण समारंभाची तयारी सुरू आहे. हा कार्यक्रम २५ नोव्हेंबर रोजी होणार आहे. ही सीतारामाची विवाह पंचमी आहे. या दिवशी, रामनगरीतील शेकडो मंदिरे भगवान श्री राम आणि माता सीता यांच्या विवाहाचा उत्सव साजरा करणार आहे. त्यामुळे नोव्हेंबरमध्ये अयोध्या पुन्हा एकदा भव्य उत्सवाचे केंद्र बनेल.

या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत देखील या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहे. समारंभाच्या



तयारीबाबत शनिवारी राम मंदिर ट्रस्ट, संघ आणि विहिंपच्या अधिकाऱ्यांची तीर्थ क्षेत्र भवनात बैठक झाली. या समारंभात केवळ ध्वजारोहणच मर्यादित राहणार नाही, तर त्यातून राष्ट्राच्या संघटनेची सांस्कृतिक जाणीव, सुसंवाद आणि ताकद दिसून येईल, असा निर्णय घेण्यात आला. ध्वजारोहण समारंभात राम मंदिरावर सोन्याचा शिखर बसवल्यानंतर आता त्यावर ध्वज फडकवला जाईल. राम मंदिरावर स्थापित केलेल्या सोन्याच्या शिखर कलशाला जोडलेल्या खांबावर हा ध्वज फडकवला जाईल. राम मंदिरासोबतच संकुलातील सर्व २० मंदिरांमध्ये ध्वज फडकवला जाईल. ज्यामध्ये तटबंदीतील ६ मंदिरे समाविष्ट आहेत. (वृत्तसंस्था)

### २३ नोव्हेंबरपासून धार्मिक विधी

या कार्यक्रमात २३ नोव्हेंबरपासून धार्मिक विधी सुरू होतील. राम मंदिर परिसरातच धार्मिक विधी आणि ध्वजपूजन होईल. पूजेमध्ये राम रक्षा स्तोत्र आणि विशेष मंत्रांसह अनेक प्रकारचे ग्रंथ जपले जातील आणि आहूती देखील अर्पण केल्या जातील. त्यानंतर २५ नोव्हेंबर रोजी मुख्य कार्यक्रमाच्या दिवशी सकाळी ११:४५ ते दुपारी १२:१५ पर्यंत ध्वजाची पूजा केली जाईल. म्हणजेच पूजेसाठी शुभ वेळ फक्त ३० मिनिटे आहे.

### प्रसिद्ध कलाकारांचे सादरीकरण

या दिवशी वैदिक जप आणि सांस्कृतिक सादरीकरणे होतील. संपूर्ण कार्यक्रमात वैदिक जप, भजन, कीर्तन, पारंपारिक संगीत आणि विशेष पूजा विधींचा समावेश असेल. या प्रसंगी देशातील अनेक प्रसिद्ध कलाकार आपले सादरीकरण करतील. कार्यक्रमासाठी विविध जाती आणि वर्गातील सुमारे १० हजार पाहुण्यांना आमंत्रित केले जात आहे. राम मंदिराच्या बांधकामाशी संबंधित हा शेवटचा कार्यक्रम असल्याने, तो संस्मरणीय ठरणार आहे.

# जी-मेलवर सर्वात मोठा सायबर हल्ला

## २५० कोटी वापरकर्त्यांची माहिती हॅकर्सकडे

**नवी दिल्ली, ३१ ऑगस्ट**

जी-मेलवर सर्वात मोठा सायबर हल्ला झाला असून, जवळपास २५० कोटी वापरकर्त्यांची माहिती हॅकर्सच्या हाती लागल्याचे सांगितले जात आहे. या माहितीचा वापर घोटाळ्यांसाठी केला जाऊ शकतो, अशी भीती वर्तवली जात आहे.

सुरक्षा तज्ज्ञांच्या मते, हा जीमेलच्या इतिहासातील सर्वात मोठा 'डेटा ब्रीच' मानला जात आहे. हा प्रकार जी-मेलचा डेटाबेस व्यवस्थापित करणाऱ्या सेल्सफोर्स कंपनीच्या क्लाऊड मंचावर झाला आहे. शायनीहंटर्स नावाच्या कुख्यात हॅकर गटाने हा हल्ला केल्याचे उघड झाले आहे. हा सायबर हल्ला जून महिन्यात करण्यात आला. 'सोशल इंजिनिअरिंग'च्या तंत्राचा वापर करून हॅकर्सनी हा प्रकार घडवून आणला. गुगलच्या थ्रेट इंटेलिजेंस ग्रुपच्या माहितीनुसार, स्कॅमर्सनी स्वतःला गुगलचे कर्मचारी भासवले व सेल्सफोर्समध्ये फसवे ॲप कनेक्ट करून डेटाची चोरी केली. या लीकमुळे वापरकर्त्यांचे कॉन्टॅक्ट डिटेल्स, बिझनेस नेम, संबंधित नोट्ससारखी महत्त्वाची माहिती हॅकर्सच्या हाती लागली. कोणत्याही वापरकर्त्याचा पासवर्ड लीक झालेला नाही. हॅकर्सने चोरलेल्या डेटाचा वापर फसवणूक आणि फिशिंगसाठी सुरू केल्याची तक्रार अनेक वापरकर्त्यांनी केली.




या लीकमुळे थेट जी-मेल पासवर्ड प्रभावित झाला नसला, तरी चोरलेल्या माहितीद्वारे खात्यात प्रवेश मिळवण्याचा धोका आहे. विशेषतः '१२३४५६' किंवा 'पासवर्ड' सारखे कॉमन पासवर्ड वापरणाऱ्या खात्यांना मोठा धोका आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# ताक फुंकून प्यावे लागेल

गेल्या दोन महिन्यांपासून आंतरराष्ट्रीय राजकारणाला फार मोठी कलाटणी मिळाल्याचे चित्र दिसून येते. २०१७ पासून भारत आणि चीन या आशियातील दोन बलाढ्य देशांमधील संबंध डोकलाम संघर्षानंतर विकोपाला गेले. गलवान खोऱ्यातील रक्तरंजित संघर्षानंतर व्यापारी संबंधही कमालीचे बिघडले. अगदी जुलै महिन्यातही चीनने भारताला मौल्यवान खनिजाची निर्यात रोखली होती. याचा विपरीत परिणाम मोटार निर्मिती कंपन्यांवर झाला. पण, महिनाभरातच भारत-चीन संबंध रुळावर येण्यास प्रारंभ झाला. अर्थात दोन्ही देश निर्मळ मनाने एकत्र येण्यास राजी झाले असे नाही. २०१७ पासून जवळपास आठ वर्षे दोन्ही देश एकमेकांवर कुरघोडी करण्याची एकही संधी सोडत नसताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापुढे चीनने रेड कार्पेट अंथरले. शांघाय सहकार्य परिषदेच्या वार्षिक शिखर परिषदेच्या निमित्ताने मोदी चीनच्या दौऱ्यावर आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांच्या आडमुठ्या धोरणामुळे दोन्ही देशांना नाईलाजास्तव जवळ यावे लागत आहे. भारत-चीन यांच्यातील संबंध हे फक्त व्यावहारिक आहेत. अमेरिकेचा फटका या दोन्ही देशांना बसतो आहे. रशियाला लगाम घालण्यात अपयशी ठरल्याने आणि जागतिक शांतता नोबेल पुरस्कार मिळण्यात भारताने खोडा घातल्याचा राग ट्रम्प यांच्या मनात आहे. आज अडीच वर्षे झाली तरी रशिया युक्रेन आणि नाटो संघटनेसोबत एकटा लढतो आहे. अर्थात युक्रेनचे लचके तोडण्याच्या पुतिन यांच्या धोरणाचे समर्थन भारत कधीच करणार नाही. पण, बलाढ्य रशियाशी पंगा घेण्याचा झेलेन्स्की यांचा निर्णय धाडसी नव्हे तर अविचारी म्हणावा लागेल. रशियाची मागणी तरी काय होती? युक्रेनने नाटो संघटनेचा सदस्य देश होऊ नये एवढीच ना. या एकाच मुद्यावर झेलेन्स्की यांनी हजारो युक्रेनियन नागरिकांचा बळी दिला आणि विध्वंसाला आमंत्रण दिले. रशिया हल्ले थांबवत नाही आणि यासाठी चीन, भारताला जबाबदार धरून ट्रम्प यांनी मोठे व्यापारी शुल्क लावले. चीनवर तरी केवळ ३४ टक्केच लावले पण भारतावर तब्बल ५० टक्के व्यापारी शुल्क आकारले. यातून एकच बाब सिद्ध होते की भू-राजकीय पटलावर मित्रता, परस्पर विश्वास याला काहीच महत्त्व नाही. तसे नसते तर अमेरिकेने भारतासोबतच्या संबंधांचा बळी दिलाच नसता. बिल क्लिंटन राष्ट्राध्यक्ष असताना दोन्ही देशांमध्ये मैत्रीचे संबंध निर्माण होऊन ते ज्यो बायडेन यांच्या कार्यकाळापर्यंत मजबूत झाले होते. तसेच डोनाल्ड ट्रम्प यांची पहिली कारकीर्दही भारतासाठी दिलासा देणारी होती. राष्ट्रवाद आणि अमेरिका फर्स्ट या ट्रम्प यांच्या धोरणावर विश्वास ठेवून दुसऱ्या कारकीर्दीमध्ये भारताचाही पाठिंबा ट्रम्प यांनाच होता. पण, रशिया-युक्रेन युद्धामुळे केरात मुसळ गेले असेच म्हणावे लागेल. भारत रशियाकडून स्वस्तात कच्चे तेल खरेदी करतो आणि रिफाईन करून अन्य देशांना विकतो आणि नफा कमावितो. भारत करीत असलेल्या तेल खरेदीमुळे रशियाला आर्थिक बळ मिळत असल्याने युद्ध लांबत असल्याचे अकलेचे तारे ट्रम्प तोडत आहेत. जो देश जगात देशादेशांमध्ये भांडणे लावत त्याच देशांना शस्त्रे विकून पैसा कमावतो तो अमेरिका भारतावर आरोप करतो यापेक्षा दुसरा विनोद नाही. पण, जो चीन रशियाकडून भारतापेक्षा दुप्पट कच्चे तेल खरेदी करतो त्या देशावर भारतापेक्षा कमी व्यापारशुल्क आकारून नव्वद दिवसांची सूटही दिली आहे. ट्रम्प यांचा हा व्यवहार भारतासाठी मोठा धक्कादायक आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेली दहा वर्षे संबंध सुधारण्यासाठी केलेली मेहनत वाया गेल्यासारखे ठरले. अशाही परिस्थितीत मोदी यांनी संयम न ढळू देता परिस्थिती हाताळली. १४० कोटी जनतेचे हित लक्षात घेऊन भारत जागतिक बाजारपेठेत उपलब्ध असलेले कच्चे तेल खरेदी केले जाईल आणि भारत कुणाच्याही दबावाखाली येणार नसल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ठणकावून सांगितले. चीन आणि युरोपियन देशांना सूट आणि भारतावर अतिरिक्त शुल्क, असे दुटप्पी, पक्षपाती धोरण स्वीकारल्याने भारतानेही प्रसंगी नुकसान सहन केले जाईल पण स्वाभिमानाला धक्का लागू न देण्याची स्पष्ट भूमिका घेतली. रशिया जुमानत नाही म्हणून भारतावर अतिरिक्त व्यापारशुल्क लावण्याचे अमेरिकेचे हास्यास्पद धोरण म्हणजे वांग्यावरचे तेल वड्यावर काढणे होय. भारतापूर्वी ट्रम्प यांनी चीनवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. पण, चीननेही जशास तसे उत्तर दिले.

गेल्या एप्रिल महिन्यात ट्रम्प यांनी चीनवर तब्बल १४५ टक्के व्यापारशुल्क आकारले. शी जिनपिंग यांनी लगेच अमेरिकेवर १२५ टक्के व्यापारशुल्क आकारून ट्रम्प यांना तडाखा दिला. भारताने अद्याप तरी संयम दाखवत अमेरिकन मालावर अतिरिक्त व्यापारशुल्क आकारले नाही. ५० टक्के व्यापारशुल्काचा भारताच्या निर्यातीवर परिणाम जाणवत असला तरी ही परिस्थिती नेहमीसाठी कायम राहील, असे नाही. एक मार्ग बंद झाला तर दुसरा मार्ग उघडतोच. नातेवाईक आणि शेजारी कधीही बदलले जाऊ शकत नाहीत, असे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी म्हणाले होते. दुर्दैव म्हणा की नशीब, भारताला चीन, पाकिस्तानसारखे कावेबाज, कपटी शेजारी लाभले आहेत. ज्यांचा डोळा सतत भारताची जमीन गिळंकृत करण्यावर असतो. पण, सध्या जगातील भू-राजकीय परिस्थितीने अशी काही कलाटणी घेतली की आज भारत आणि चीन एकाच नावेवर स्वार आहेत. ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानची ऐसीतैसी केल्यानंतर चीन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी रेड कार्पेट अंथरेल याची कल्पनाही जनरल आसिम मुनीर आणि शाहबाज शरीफ यांनी केली नसावी. परिस्थितीचे गांभीर्य म्हणा की काळाची गरज, भारतालाही चीनसोबत संबंध पूर्ववत करावे लागणार आहेत. कुणी कितीही नाकारले तरी चीन जगातील दुसरी महासत्ता आहे. सध्या तरी भारत आणि चीन यांच्यात आर्थिक पातळीवर तुलना करणे योग्य नाही. चीनने अमेरिकेसह जगभरात उत्पादन पुरवठा साखळी एवढी मजबूत करून ठेवली आहे की, युरोपीय देश आणि खुद्द अमेरिका हे देश हतबल ठरले आहेत. याही परिस्थितीत अपवाद फक्त भारताचा आहे. डोकलाम आणि गलवान खोऱ्यातील संघर्षानंतर मोदी सरकारने चीनला बाजूला सारले. देशाची आर्थिक घडी नीट बसविली. अमेरिकेसह, युरोप, आफ्रिका खंडात व्यापारासाठी संधी शोधण्याचे प्रयत्न सुरू ठेवले. स्पष्ट आर्थिक धोरणे, आत्मनिर्भर भारत अंतर्गत वस्तूंचे उत्पादन वाढवून निर्यातीत वाढ, स्वस्त कच्चे तेल आयात करून परकीय चलन वाचविणे, शेतकरी, सामान्यांना महागाईचे चटके बसणार नाही याची काळजी घेणे आदी उपायांमुळे आज भारत जगातील चौथी आर्थिक महासत्ता आहे. याच बळावर आपण चीनचा व्यापार, आर्थिक आणि लष्करी पातळीवर जोरदार मुकाबला केला. आता अमेरिकेची वेळ आहे. आज चीन भारतासोबत संबंध जोडू इच्छित असला तरी हा लाल ड्रॅगन विश्वासघातकी आहे हे विसरता कामा नये. चीन हा आकाराने, पैशाने बलाढ्य तर आहेच पण अत्यंत व्यवहारी आणि तितकाच कपटी आहे. पण, आजचा भारत १९६२ सारखा नक्कीच नाही, याची जाणीव चीनलाही आहे. गलवाननंतर हाडे गोठविणाऱ्या थंडीत चीनने जवळपास पाऊण लाख सैन्य तैनात करून दबाव आणण्याचा प्रयत्न केला पण भारतानेही रणगाडे, लांब पल्ल्यांच्या तोफांसह तितकेच सैन्य समोरासमोर उभे करून चीनला माघार घेण्यास बाध्य केले. शांघाय सहकार्य परिषदेच्या निमित्ताने तीन महाशक्ती एकत्र येत असल्याने हा अमेरिका आणि युरोपियन संघाला धोक्याचा इशारा आहे. परिषदेच्या एक दिवस अगोदर पंतप्रधान मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात द्विपक्षीय बैठक झाली. आशिया आणि दोन्ही देशांच्या भल्यासाठी हत्ती आणि ड्रॅगन यांनी एकत्र येणे आवश्यक असल्याचे वक्तव्य करीत जिनपिंग यांनी सीमेवर शांतता आणि स्थिरता राहणार असल्याचे संकेत दिले. तथापि, चीनचा पूर्व इतिहास पाहता भारताला ताक फुंकून प्यावे लागेल.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# पुन्हा संसद विरुद्ध सर्वोच्च न्यायालय

संसद आणि सर्वोच्च न्यायालय पुन्हा एकदा परस्परांसमोर उभ्या ठाकण्याच्या स्थितीत आहेत. एकीकडे सर्वोच्च न्यायालयात राष्ट्रपती व राज्यपालांचे अधिकार मर्यादित करण्याबाबत सुनावणी होत आहे तर दुसरीकडे राष्ट्रपती व राज्यपालांना अधिक अधिकार देणारे घटनादुरुस्ती विधेयक संसदेत सादर करण्यात आले आहे.

**नवे विधेयक** : नुकत्याच संपलेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या टप्प्यात १३० वे घटनादुरुस्ती विधेयक सादर करण्यात आले आणि त्यावरून झालेल्या गदारोळानंतर ते एका समितीकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. एखाद्या मंत्र्यास, मुख्यमंत्र्यास वा पंतप्रधानास गंभीर गुन्ह्याखाली अटक करण्यात आली असेल, त्यात त्याला पाच वर्षांची शिक्षा होण्याची शक्यता असेल आणि तो ३० हून अधिक दिवस कारागृहात असेल तर त्याला त्याच्या पदावरून हटविण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. मुख्यमंत्री वा राज्यातील मंत्री यांच्या संदर्भात त्यांना हटविण्याचे अधिकार राज्यपालांना तर पंतप्रधान वा केंद्रातील मंत्र्यास हटविण्याचे अधिकार राष्ट्रपतींना देण्यात येणार आहेत.

**एक काळ होता** : देशाच्या राजकारणात एक काळ होता त्यात नैतिक अधिष्ठान सर्वांत महत्त्वाचे मानले जात होते. एखादी चौकशी असो वा उच्च न्यायालयाचा साधा ताशेरा असो- मंत्री आपल्या पदाचा राजीनामा देत असे.

**मुंदडा प्रकरण** : पं. नेहरू पंतप्रधान असताना त्यांचे एक मंत्री टी. टी. कृष्णम्माचारी एल. आय. सी. घोटाळ्यात अडकले होते. या प्रकरणाच्या चौकशीची मागणी विरोधी पक्षांकडून केली जात होती. कृष्णम्माचारी हे पंतप्रधान नेहरू यांचे खास मंत्री व मित्र मानले जात होते. त्यांची चौकशी कोण व कशी करणार? तत्कालीन गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत यांनी हा निर्णय घेतला. चौकशीचे काम मुंबई उच्च न्यायालयाचे तत्कालीन मुख्य न्यायाधीश न्या. मोहम्मद करीम छागला यांच्याकडे सोपविण्यात आले. त्या चौकशीत कृष्णम्माचारी दोषी असल्याचे आढळून आले आणि त्यांना राजीनामा द्यावा लागला. विशेष म्हणजे कृष्णम्माचारी आपल्या गावी म्हणजे मद्रासला जाण्यासाठी निघाले तेव्हा त्यांना दिल्ली विमानतळावर निरोप देण्यासाठी स्वत: नेहरू उपस्थित होते. नेहरूंचे मोठेपण हे की त्यांनी न्या. छागला यांचा निर्णय स्वीकारला आणि नंतर याच छागलांना त्यांनी आपल्या सरकारात मंत्री म्हणून सामील केले. छागलांना सरकारी बंगला मिळेपर्यंत नेहरूंनी त्यांच्या निवासाची सोय आपल्या बंगल्यात केली होती.

केवळ कृष्णम्माचारीच नाही तर नंतरच्या काळात अनेक मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागल्याची अनेक उदाहरणे आहेत.

**सिमेंट घोटाळा** : महाराष्ट्रात एकेकाळी सिमेंट घोटाळा फार गाजला होता. त्यात तत्कालीन मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले यांना राजीनामा द्यावा लागला. आजच्या संदर्भात विचार केल्यास तो काही फार मोठा घोटाळा नव्हता. पण, तरीही अंतुले यांना पायउतार व्हावे लागले होते.

**हवाला प्रकरण** : नरसिंहराव पंतप्रधान असताना काही विरोधी पक्ष नेते व काही कॅबिनेट मंत्री यांच्यावर सीबीआयने हवाला आरोपपत्र दाखल केले होते. केवळ त्याच आधारावर भाजप नेते लालकृष्ण अडवाणी यांनी लोकसभा सदस्यत्वाचा राजीनामा देत, हवाला आरोपातून निर्दोष सिद्ध झाल्याशिवाय आपण लोकसभेची निवडणूक लढविणार नाही अशी घोषणा केली होती. यानंतर मग अन्य विरोधी सदस्य व मंत्री यांनाही आपापल्या पदांचे राजीनामे सादर करावे लागले होते. पण आज स्थिती बदलली आहे.

**दिल्लीत केजरीवाल** : मागील काही वर्षांत नैतिक मूल्यांची घसरण होत गेली आणि राजकीय नेते निगरगट्ट होत गेले. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे त्याचे मूर्तिमंत उदाहरण होते. दिल्ली मद्य घोटाळ्यात त्यांना अटक झाली. त्यांची रवानगी तिहार कारागृहात करण्यात आली. पण, केजरीवाल काही राजीनामा देण्यास तयार होत नव्हते. काही काळ त्यांनी राजीनामा देण्याचा विचार केला होता. आपल्या पत्नीस मुख्यमंत्री करण्याचा विचार ते करीत होते. मात्र शेवटी त्यांनी राजीनामा न देण्याचा निर्णय घेतला. मुख्यमंत्री कारागृहात आणि तरी त्यांचे सरकार मात्र अस्तित्वात अशी हास्यास्पद स्थिती देशाच्या राजधानीत तयार झाली आणि बहुधा या एका कारणामुळे केंद्र सरकारने असे विधेयक आणण्याचा विचार केला असावा असे आता दिसते.

**दक्षिणेतील बालाजी** : तामिळनाडूतील एक मंत्री बालाजी यांच्याही बाबतीत असाच प्रकार घडला होता. त्यांनाही अटक करण्यात आली. पण मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी त्यांचा राजीनामा मागितला नाही आणि स्वत: बालाजी यांनी तो दिला नाही. ते मंत्री म्हणून तुरुंगात गेले आणि मंत्री म्हणून बाहेर आले. आणि जणू काही झालेच नाही अशा थाटात त्यांनी पुन्हा आपले कामकाज सुरू केले.

**विधेयकाचे भवितव्य** : संयुक्त समिती आपला अहवाल किती काळात देईल, ते केव्हा पारित केले जाईल, यावर सर्वोच्च न्यायालय काय भूमिका घेईल हे सारे प्रश्न आज तरी अनुत्तरित आहेत. येणाऱ्या काळात त्याची उत्तरे मिळू लागतील. मात्र या निमित्ताने राजकारणातील नैतिक मूल्यांचा मुद्दा पुन्हा समोर आणला गेला आहे. राजकीय नेत्यांनी नैतिक मूल्यांचे पालन केले असते तर कदाचित केंद्र सरकारवर असे विधेयक आणण्याचा प्रसंग आला नसता. नैतिक कारणांसाठी एखाद्या राजकीय नेत्याने वा न्यायाधीशाचे पद सोडल्याची घटना मागील काही वर्षांत घडल्याचे स्मरणात नाही. आरोपपत्र दाखल होऊन, अटक झाल्यावरही पदाला चिकटून राहण्याची नवी मानसिकता तयार झाली आहे. या साऱ्या पृष्ठभूमीवर या विधेयकाचे अवलोकन करण्यात आले पाहिजे.

१३० व्या घटना दुरुस्ती विधेयकात पंतप्रधान, मुख्यमंत्री यांना बरखास्त करण्याचा अधिकार राष्ट्रपती व राज्यपालांना देण्यात आला आहे. विशेष म्हणजे राष्ट्रपती व राज्यपालांच्या काही अधिकारांबाबत सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. राष्ट्रपती व राज्यपाल यांनी संसद व विधानसभा यांनी पारित केलेल्या विधेयकांना एका निर्धारित अवधीत मंजुरी दिली पाहिजे असा एक निवाडा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्यासंदर्भात राष्ट्रपतींनी कलम १४३ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाचे मत मागितले आहे.

**परखड प्रश्न** : राष्ट्रपतींनी मागितलेल्या अभिमतावर न्यायालयात सुनावणी सुरू असताना सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने एक परखड प्रश्न विचारला, 'एखाद्या राज्य विधानसभेने २०२० मध्ये एखादे विधेयक पारित केलेले असेल आणि २०२५ पर्यंतही त्याला राज्यपालांची मंजुरी मिळालेली नसेल तर याचा अर्थ सर्वोच्च न्यायालय असहाय- हतबल झाले आहे असा होत नाही काय' असा तो प्रश्न होता.

**अर्थ विधेयक** : विधानसभेने पारित केलेल्या अर्थ विधेयकाची मंजुरीही राज्यपाल रोखू शकतात काय असा एक प्रश्न न्या. नरसिंहा यांनी विचारला असता, महाराष्ट्रातर्फे युक्तिवाद करताना ॲड. हरीश साळवे यांनी होकारार्थी उत्तर दिले. राज्यपालांना हाही अधिकार असल्याचे त्यांनी न्यायालयास सांगितले. नंतर ॲटर्नी जनरल तुषार मेहता यांनी याबाबत स्पष्टीकरणाचा प्रयत्न केला.

**पुन्हा एक फेरी** : म्हणजे एकीकडे राष्ट्रपती व राज्यपाल यांचे अधिकार मर्यादित करण्याची सर्वोच्च न्यायालयाची भूमिका दिसून येत असताना त्यांना अधिक अधिकार देणारे १३० वे घटना दुरुस्ती विधेयक संसदेत सादर करण्यात आले आहे. थोडक्यात संसद विरुद्ध सर्वोच्च न्यायालय अशी आणखी एक फेरी झडण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# प्राणवायू निर्मितीत झाडांचे महत्त्व

वैज्ञानिक मान्यतेनुसार पृथ्वीवर सर्वप्रथम सूक्ष्म समुद्री जीव अस्तित्वात आले. त्यानंतर या जीवांनी ऑक्सिजन अर्थातच प्राणवायूची निर्मिती केली आणि कोट्यवधी वर्षांच्या प्रक्रियेनंतर जमिनीवर झाडांची उत्पत्ती झाली. या झाडांनीही प्राणवायू निर्मितीत योगदान सुरू केले जे आजतागायत कायम आहे. पृथ्वीवर प्राणवायू अस्तित्वात आल्यानंतरच चालते बोलते जीव आकारास आले. प्राणवायू जीवसृष्टीचा मूळ आधार आहे. प्राचीन काळी वातावरणात प्रहणवायूचे प्रमाण आजच्या तुलनेत अधिक होते. त्यामुळेच पूर्वी मनुष्याचे आयुर्मान १०० वर्षांवर होते. जे आज केवळ ७० वर्षे उरले आहेत. वैज्ञानिकदृष्ट्या कुठलेही झाड २४ तास ऑक्सिजन निर्मिती करीत नाही. परंतु, तुळस आणि पिंपळ हे दोन वृक्ष यास अपवाद आहेत. झाडे प्रामुख्याने प्रकाशसंश्लेषणाद्वारे प्राणवायू निर्मिती करतात. त्यामुळे बहुतांश झाडे दिवसा वातावरणात ऑक्सिजन सोडतात. तर रात्री ऑक्सिजन घेतात आणि कार्बन डायऑक्साईड उत्सर्जित करतात. परंतु, तुळस सदैव केवळ आणि केवळ ऑक्सिजनच उत्सर्जित करते. त्यामुळेच हिंदू संस्कृतीत तुळस पूजनीय आहे. वातावरणातील एकूण ऑक्सिजनच्या सुमारे २८ टक्के प्राणवायू जमिनीवरील झाडे आणि जंगलांमधून प्राप्त होतो. बाकी ७२ टक्के ऑक्सिजन समुद्रातील शेवाळजन्य वनस्पती व सूक्ष्म जीव निर्माण करतात. एका मान्यतेनुसार एक प्रौढ झाड दिवसाला जवळपास २७४ लिटर ऑक्सिजनची निर्मिती करते. ज्या झाडाला अधिक पाने असतात ते झाड अधिक प्राणवायू देते.



सूर्यप्रकाश हा झाडांच्या जीवनाचा आधार आहे. झाडांना आपले अन्न तयार करण्यासाठी पाणी, कार्बन डायऑक्साईड आणि सूर्यप्रकाशाची गरज पडते. या प्रकियेतून तयार होणारा ऑक्सिजन झाडे आपल्या पानांच्या माध्यमातून वातावरणात सोडतात. मनुष्य मात्र केवळ प्राणवायू घेतो आणि कार्बन डायऑक्साईड वाढवून वातावरण दूषित करण्यास हातभार लावतो. शिवाय झाडांची कत्तल करून वातावरणाचा समतोल बिघडवतो. सध्या वातावरणातील ऑक्सिजनची टक्केवारी २१ इतकी आहे. जी पूर्वीच्या तुलनेत खूप कमी आहे. आधुनिक काळात जीवाश्म इंधन अर्थातच पेट्रोल, डिझेल, रॉकेल आदींचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. हे इंधन जाळण्यासाठी प्राणवायू खर्ची पडत असल्याने ऑक्सिजनचे प्रमाण कमी होत आहे. शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात जीवाश्म इंधनाचा वापर होत असल्याने ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी वातावरण अधिक दूषित झाले आहे. त्यामुळे अनेक आजारांचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. यातूनच 'हिरवेगार शहर' ही संकल्पना अस्तित्वात आली आहे. त्यामुळेच की काय, नागपूर शहरात जागोजागी मोठमोठे वृक्ष दिसून येतात. तसेही नागपूरकर पूर्वीपासूनच पर्यावरणवादी आहे, ही बाब वेगळी.

दक्षिण अमेरिकेत वसलेल्या ॲमेझॉन जंगलातून तब्बल २० टक्के ऑक्सिजन निर्मिती होत असल्याचा दावा पूर्वी केला जायचा. परंतु, एकट्या ॲमेझॉन जंगलामधून २० टक्के ऑक्सिजन कसा काय निर्माण होऊ शकतो, असा प्रश्न वारंवार उपस्थित केला जात होता. त्यानंतर या जंगलातून ६ ते ९ टक्के ऑक्सिजन मिळत असल्याचा निष्कर्ष शास्त्रज्ञांनी काढला आणि हा निष्कर्ष सर्वमान्य झाला. ॲमेझॉन हे एक वर्षावन असून त्याचा व्यास तब्बल ६.७ दशलक्ष चौरस किलोमीटर इतका आहे. हे वर्षावन अनेक देशांमध्ये विस्तारले असून त्याचे सर्वाधिक क्षेत्र ब्राझीलमध्ये आहे. कोरोना काळात संपूर्ण जगात ऑक्सिजनची कमतरता भासली. झाडे व अन्य घटकांकडून फुकट मिळणाऱ्या या ऑक्सिजनसाठी लाखो रुपये खर्च करूनही अनेकांचा जीव गेला. अशाही परिस्थितीत मनुष्याला अद्याप झाडांचे महत्त्व पूर्णत: कळल्याचे ठामपणे म्हणता येत नाही. काही नागरिक झाडांच्या संगोपनासाठी झटतात. परंतु, बहुतांश नागरिकांना त्याचे सोयरसुतक नसते. लोकसंख्या ज्या गतीने वाढत आहे, त्याच गतीने झाडांचा आणि प्रामुख्याने जंगलांचा नायनाट होत आहे. झाडेझुडपे कमी झाल्याने केवळ ऑक्सिजन निर्मितीवरच परिणाम झालेला नाही. तर यामुळे अनेक समस्यादेखील निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे भविष्यात पर्यावरणाचा समतोल राखायचा असेल तर मोठ्या प्रमाणात झाडे लावून त्यांचे संगोपन करावे लागतील. प्रत्येक मनुष्य या पृथ्वीवर केवळ एक पाहुणा आहे. येणाऱ्या पिढ्यांना पर्यावरणपूरक वारसा सोपविणे हे प्रत्येकाचेच कर्तव्य आहे आणि हीच खरी संस्कृती आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# महालक्ष्मी पूजनाचा खरा अर्थ

ज्येष्ठा गौरी आवाहन हा गणपतीमध्येच अतिशय धूमधडाक्यात साजरा होणारा उत्सव आहे. या उत्सवामध्ये गौरीची पूजा केली जाते. तसे पाहिले तर स्कंदपुराण, मार्कंडेय पुराण, पद्मपुराण, देवीभागवत या सर्वच ग्रंथांमध्ये देवीची उपासना सांगितलेली आहे. कधी तिला आद्यशक्ती म्हटलेले आहे, कधी राक्षसांचा संहार करणारी म्हणून तिचे पूजन केलेले आहे, तर कधी धन, धान्य, ऐश्वर्य, संपत्ती देणारी महालक्ष्मी म्हणून तिचे पूजन केलेले आहे.

आपल्या सनातन धर्मामध्ये पुरुष देवता आणि स्त्री देवता असा काही भेदभाव नाही. पूर्वी साधारणतः शंकर, विष्णू, देवी, सूर्य आणि गणपती या देवतांची सर्व पूजा केली जायची. वैष्णव हे विष्णूला प्रमुख देवता मानायचे आणि इतर सर्वांचीही पूजा करायचे. शैव शंकराला प्रमुख देवता मानायचे आणि इतर सर्वांचीही पूजा करायचे. त्याचप्रमाणे काही लोक देवीला प्रमुख देवता मानायचे, तर काही सूर्याला, तर काही गणपतीला. परंतु इतर सर्व देवतांची पूजा केली जायची.

ज्येष्ठा गौरी हे सुद्धा देवीचे स्वरूप आहे. देवीचीच ती पूजा आहे. ही धन, धान्य, ऐश्वर्य, संपत्ती देणारी महालक्ष्मी आहे. आपला समाज प्रामुख्याने गृहस्थाश्रमी समाज आहे. गृहस्थाश्रमी माणसाला नेहमीच त्याच्या परिवाराची, मुलाबाळांच्या भविष्याची चिंता असते. त्यामुळे ''आज माझ्याजवळ जी सुख-संपदा आहे ती भविष्यातही कायम राहील की नाही?'' ही चिंता त्याला नेहमी सतावत असते. त्याला वाटते की ही सुखसंपत्ती माझ्या आयुष्यापर्यंत तर राहिलीच पाहिजे, पण माझ्या मुलांनाही कशाची कमतरता पडू नये. ज्यांच्याजवळ आज धन-धान्य, ऐश्वर्य, संपत्तीची कमतरता आहे, त्यांना वाटते की आमच्या जीवनात जरी कमतरता आजपर्यंत राहिलेली असली तरी उद्या ती राहू नये आणि मुलांच्या जीवनात तर अजिबातच राहू नये. त्यामुळे हा समाज विविध निमित्ताने महालक्ष्मीची पूजा करीत असतो. ज्येष्ठा गौरी आवाहन हे महालक्ष्मीचेच आवाहन आहे.

आपल्या धर्मामध्ये लक्ष्मी आणि अलक्ष्मी अशी दोन रूपे सांगितलेली आहेत. परंतु सात्त्विक समाज हा फक्त लक्ष्मीची पूजा करतो. अलक्ष्मीला चांगले म्हटले गेलेले नाही. आज आपल्या समाजामध्ये काळा पैसा आहे, तो अलक्ष्मीचे स्वरूप आहे, असे मानले गेलेले आहे. या अलक्ष्मीमुळे कधीही सुखशांती येत नाही. आज आपण समाजामध्ये रोज निरनिराळे घोटाळे उघडकीस येताना पाहतो. एखादा मोठा राजनेता त्याचे आयुष्य खूप मोठ्या ऐश्वर्यात गेलेले असते, पण त्याच्या आयुष्याच्या संध्याकाळी त्याला तुरुंगात जावे लागते.

ज्यावेळी नोटबंदी झाली, त्यावेळी बँकेत विचारले जायचे की ''हे पैसे कुठून आणलेत? याचा उगम काय?'' त्यावेळी तो स्रोत सांगावा लागायचा. त्यामुळे अनेकांनी घरी पोत्यांमध्ये भरून ठेवलेले पैसे शेवटी पेटवून दिले, तर काहींनी ते उकिरड्यावर फेकले. तात्पर्य काय? अशांच्या जीवनात चिंता ही लागूनच राहते. चिंता हे अनेक रोगांचे कारण असते. त्यामुळे आयुष्यभर असा पैसा सांभाळणाऱ्या लोकांना अनेक शारीरिक व्याधी चिकटतात. इतिहास आपल्याला सांगतो की, ज्यांनी लोकांकडून लुबाडलेला पैसा गोळा केला, त्यांचा अंत त्या पैशाच्या राशीकडे पाहता पाहता झालेला आहे. श्रीमंत असणे, वैभवसंपन्न असणे हे चांगलेच आहे. अनेक मोठे व्यापारी अगदी चिकाटीने आपला व्यवसाय करतात व हळूहळू मोठी संपत्ती तयार करतात. अशा लोकांबद्दल समाजालाही आदर असतो आणि असे लोक समाजासाठी मुक्तहस्ते खर्च करण्यामध्येही मागेपुढे पाहत नाहीत. मागे मी एक लेख वाचला होता. त्यामध्ये सारांश असा होता की बिल गेट्स जगातील इतका श्रीमंत माणूस आहे, तो तर महालक्ष्मीची पूजा करत नाही, मग त्याच्याकडे एवढी लक्ष्मी कशी आहे? अनेक वेळा मोठमोठे लोक खूप छोटे प्रश्न विचारतात. अमेरिकेमध्ये राहणारा माणूस ''अमेरिका माता'' म्हणत नाही, जपानमध्ये राहणारा माणूस ''जपान माता'' म्हणत नाही. पण भारतामध्ये राहणारा माणूस मात्र भारताला भारत माता म्हणतो. भारतामध्ये राहणारा माणूस हा भारतमातेचे देवीस्वरूपात दर्शन घेतो, तिची पूजा करतो. मूळ वंदे मातरम्‌मध्ये दुर्गेचे वर्णन आहे ''त्वं हि दुर्गा दशप्रहरणधारिणी'' असे म्हटलेले आहे. त्यामुळे हा पाश्चिमात्य आणि भारतीय दृष्टिकोनाचा फरक आहे.

आपण नेहमीच आपल्यापेक्षा उच्च आदर्शांकडे पाहिले पाहिजे. पोट तर पशू सुद्धा भरतात, परंतु पशू जसे खातात तसे आपण खात नाही. पशू जसे राहतात तसे आपण राहत नाही. ज्या गोष्टी बिल गेट्सला आपल्यापेक्षा चांगल्या येतात त्या त्याच्याकडून शिकाव्यात आणि ज्या गोष्टी आपल्याकडे चांगल्या आहेत त्या त्यालाही दिल्या पाहिजेत.

जो माणूस व्यवसाय करतो त्याच्याकडे पैसे हे येणारच आहेत. तो बिल गेट्स असेल, नाहीतर अंबानी असेल. परंतु मानवीय सभ्यतेचा उगम आपल्या देशात फार पूर्वी झाला आहे. आपल्या देशातील ऋषिमुनींनी, महापुरुषांनी सर्वसामान्य माणसाला जीवन कसे जगावे हे सांगितले आहे.

वाल्या कोळी नावाचा एक दरोडेखोर होता. तो दरोडे टाकून, लूटमार करून पैसे मिळवीत असे. देवर्षी नारदांनी त्याला विचारले ''ज्यांच्यासाठी हे पाप करतोस त्यांना विचारून पाहा की ते तुझ्या पापाचे वाटेकरी होतील का?'' वाल्याने त्याच्या बायको, मुलांना ते विचारले. त्यावर पत्नी आणि मुलं म्हणाली ''आमच्यासाठी पैसे कमवून आणणे आणि आमचे पोट भरणे हे तुमचे कर्तव्य आहे. पण आम्ही तुमच्या पापाचे वाटेकरी होणार नाही, कारण आम्ही तुम्हाला या प्रकारे पैसे कमवून आणा असे सांगितलेले नाही.''

हे भारतीय दर्शन आहे. हा भारतीयांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आहे. मिळेल ते खाऊन पोट तर जनावरं सुद्धा भरतात, पण पोट कसे भरले पाहिजे हे आपल्या ऋषिमुनींनी, साधुसंतांनी, महापुरुषांनी सांगितलेले आहे. समाजमाध्यमावर एक व्हिडीओ पाहिला होता. त्यामध्ये म्हटले होते- ''तुमचे मन तुमच्याकडे येणाऱ्या पैशाला नियंत्रित करू शकते.'' आपण जर सतत असा विचार करत राहिलो की ''माझ्याकडे हे नाही, ते नाही, मी दरिद्री आहे'', तर जगातील दारिद्र्य आपल्याकडे खेचले जाईल. आकर्षणाचा नियम सुद्धा हेच सांगतो. ज्येष्ठा गौरीचे आवाहन करणे म्हणजे प्रत्यक्ष महालक्ष्मी माझ्या घरी आलेली आहे. ''मला आता यापुढे काही कमी पडणार नाही. महालक्ष्मीचा आशीर्वाद माझ्यावर व माझ्या परिवारावर सदैव आहे आणि राहील''अशा पद्धतीचा विचार जर आपण केला, तर आकर्षणाचा सिद्धांत आपल्या मदतीला नक्कीच येईल आणि आपल्या घरात समृद्धी येईलच. ज्याप्रमाणे माहेरी आलेल्या मुलीची आपण खूपच काळजी घेतो, तिला मनाप्रमाणे व प्रसन्न राहता येईल असे पाहतो, तिला जे आवडते ते सर्व काही करतो, त्याप्रमाणेच ज्येष्ठा गौरीचे आवाहन म्हणजे आमच्या जीवनाला लागणाऱ्या सर्व गोष्टींची पूर्तता करणारी महालक्ष्मी. तिचे आवाहन व पूजन करण्याचा हा दिवस आहे. या महालक्ष्मीचा वास आमच्या घरात नित्य राहावा, आमच्या देशातही ही महालक्ष्मी स्थिर राहावी यासाठी महालक्ष्मीची पूजा आणि तिच्यासाठी प्रत्येकाने वर्षभर चांगले प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी समाजाने स्वदेशीची कास धरणे पण आवश्यक आहे. असे झाल्यास भारत परमवैभवशाली होईल आणि ज्येष्ठा गौरीचे आवाहनही सफल होईल.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## सुखसमृद्धीसाठी ज्येष्ठा गौरी व्रत

भाद्रपद शुक्ल पक्षात ज्येष्ठा गौरी व्रत केले जाते. अखंड सौभाग्यप्राप्तीसाठी स्त्रिया हे व्रत करतात. पुराणात अशी कथा आहे की, असुरांच्या त्रासाला कंटाळून सर्व स्त्रिया श्रीमहालक्ष्मी गौरीला शरण गेल्या. त्यांनी आपले सौभाग्य अक्षय करण्याविषयी तिची प्रार्थना केली. श्रीमहालक्ष्मी गौरीने भाद्रपद शुक्ल अष्टमीला असुरांचा संहार करून शरण आलेल्या स्त्रियांच्या पतींना तसेच पृथ्वीवरील प्राण्यांना सुखी केले. म्हणूनच अखंड सौभाग्यप्राप्तीसाठी स्त्रिया ज्येष्ठा गौरीचे व्रत करतात. हे व्रत तीन दिवस चालते. महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी पाच लहान मडक्यांची उतरंड रचून त्यावर गौरीचा मातीचा मुखवटा बसवतात. काही ठिकाणी सुवासिक फुलांच्या वनस्पतीची रोपे किंवा तेरड्याची रोपे एकत्र बांधून त्यांची प्रतिमा बनवली जाते आणि त्यावर मातीचा मुखवटा चढवतात. त्या मूर्तीला साडी नेसवून अलंकारांनी सजवले जाते. काही ठिकाणी धातूची किंवा मातीची प्रतिमा करून अथवा कागदावर श्रीमहालक्ष्मीचे चित्र काढून पूजन केले जाते; तर काही ठिकाणी नदीकाठचे पाच लहान खडे आणून त्यांचे गौरी म्हणून पूजन करतात. गौरीची स्थापना झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी तिची पूजा करून नैवेद्य दाखवतात. तिसऱ्या दिवशी गौरीचे विसर्जन करतात. ज्येष्ठा गौरी व्रत केल्याने श्रीगणेशासह श्रीमहालक्ष्मीचा कृपाशीर्वाद लाभतो आणि ऐहिक जीवनात सुख-समृद्धी प्राप्त होते.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

## वाचक पत्रे

### संवेदनशून्यता माणसाचे मोल शून्य करते

अलिकडेच ओडिशाच्या बालासोर येथील विद्यार्थिनी विभाग प्रमुखाकडून झालेल्या लैंगिक छळाविरोधात शासन-प्रशासन यांच्याकडे दाद मागते, पण ते बहिऱ्याचे सोंग घेतात, तेव्हा नैराश्यातून ती आत्मदहन करते. तिचा उपचारादरम्यान मृत्यू होतो आणि मग जनता पेटून उठते. माणूस मेल्यानंतरच जिवंत माणसे का बरे पेटून उठत असतील. आधुनिक विचारांची राज्यस्तरीय टेनिसपटू राधिका यादव हिचा सोशल मीडियावरील वावर न रुचलेल्या तिच्याच मध्ययुगीन मानसिकतेच्या वडिलांनी गोळ्या झाडून हत्या केली. त्या मुलीचे काय चुकले इथे. काळानुरूप ती बदलली, पण मागील पिढीचे विचार तेच पारंपरिक त्यामुळेच एखादी कर्तबगार लेक अशी बळी जाते.

आरपार आतून हसणारी, खिदळणारी माणसे हल्ली हरवली आहेत. निर्विकारता येऊ लागलीय अशी की, आता कसलेच काही वाटेनासे होत आहे. मुळात हा मानवी स्वभाव नाही. माणूस म्हणजे जो दुःख पाहिल्यानंतर दुःखी होतो तो, कुणाचे अश्रू बघून ज्याच्या काळजात कालवाकालव होते तो, हर्षाने जो खुलतो फुलतो तो, कौतुकाने आनंदतो तो. इतरांच्या सुखाने दुःखी होतो तो, सत्तेच्या उन्मादात इतरांना गुलाम समजतो त्याला माणूस म्हणावे का? आपल्या आतला कोलाहल ऐकता आला पाहिजे. विधायक उक्ती या कृतीतून बदलासाठी आपल्या क्षमतेने आपल्यातील निम्मे लोक जरी प्रेरित झाले तरी वेदना जाणवायला जागवू संवेदना या मार्गाने चालण्याची आपली सुरुवात होऊ शकेल.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### जरांगे पाटलांचे मराठा आरक्षण आंदोलन

महाराष्ट्रातील मराठा समाजाच्या लोकांना आरक्षण मिळावे यासाठी जरांगे पाटील सध्या मुंबईत आंदोलन करीत आहेत. ओबीसी आरक्षणाला धक्का न लागता मराठा समाजाला आरक्षण मिळावे ही सरकारची भूमिका आहे. त्या भूमिकेतून सरकार पुढे जात आहे, अशी भूमिका राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना मांडली. आंदोलन करण्याचा सर्वांना अधिकार आहे, मात्र राज्यात सर्वत्र गणेशोत्सव साजरा होत आहे. त्यामुळे गणेशोत्सवानंतर आंदोलन करता आले असते. ज्या राजकीय पक्षांनी या आंदोलनाला समर्थन दिले आहे, त्यांनीही याचा विचार करायला हवा होता.

भारतीय संविधानांप्रमाणे आरक्षणाचा कोटा हा निश्चित करण्यात आलेला आहे. त्यात मराठा समाजाला वेगळा आरक्षण कोटा देण्यात आलेला नाही. तरीही मराठा समाजाला आरक्षण पाहिजे आहे. हे आरक्षण त्यांना इतर मागासवर्गीय (ओबीसी) च्या कोट्यामधूनच देणे शक्य होऊ शकते. इतर मागासवर्गीय वर्गाकडून त्यांच्या कोट्यातून मराठा समाजाला आरक्षणाचा कोटा देण्यास सहमती नाही. मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी जे आंदोलन जरांगे पाटील करत आहे, त्यामागे कोणते राजकीय नेते आहेत हे सर्वश्रुत आहे. महाराष्ट्रातील जातींचा विचार केल्यास, इतर मागासवर्गीय वर्ग (ओबीसी) व मराठा समाज यातील फरक लक्षात घेणे गरजेचे आहे. इतर मागासवर्गीय वर्ग व मराठा समाज हे जर एकच असतील तर मराठा समाजाला वेगळे आरक्षण देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. सबब, मराठा समाजाने आंदोलन करून आरक्षण मिळविण्यापेक्षा न्यायालयीन प्रक्रियेद्वारे त्यांनी आरक्षण प्राप्त करून घ्यावे, असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

## महत्वाचे...

### कोयता घेऊन फिरणारा तडीपार आरोपीसे अटक; फौजदार चावडी पोलिसांची कारवाई

**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

शहर पोलिसांनी तडीपारचे कारवाई केल्यानंतरही तडीपरीच्या आदेशाचे उल्लंघन करून शहरात येऊन कोणता घेऊन फिरणाऱ्या गुन्हेगारास फौजदार चावडी पोलिसांनी अटक करून त्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला. कपिल ज्ञानेश्वर भांडेकर वय २७ राहणार बुधवार पेठ वडार गल्ली सोलापूर असे अटक करण्यात आलेल्या तडीपराचे नाव आहे.३० ऑगस्ट रोजी रात्री पावणेदहाच्या सुमारास फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव राऊत यांना एक जण कोयता हातात घेऊन रामलाल चौकाकडून सरस्वती चौकाकडे जात असल्याची माहिती मिळाली होती त्यावरून पोलीस निरीक्षक राऊत यांनी कसलाही विलंब न लावता पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकास सरस्वती चौकाकडे पाठवून दिले पोलीस पथकाने सेवासदन प्रशाली समोरील ड्रीम पॅलेस पोलीस सभागृहाच्या समोर हातात कोयता घेऊन फिरणाऱ्या कपिल भांडेकर यास ताब्यात घेतली भांडेकर या ताब्यात घेतल्यानंतर त्याच्याकडे चौकशी करण्यात आल्यानंतर त्यास २२ मे २०२५ रोजी पोलीस उपायुक्त यांनी धाराशिव सोलापूर आणि पुणे या जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार केले असल्याचे निदर्शनास आले त्यामुळे फौजदार चवळी पोलीस ठाण्यात त्याच्याविरुद्ध आणखी एक गुन्हा दाखल करण्यात येऊन त्यास अटक करण्यात आली. पुढील तपास पोलीस हवालदार परीट हे करीत आहेत. ही कारवाई पोलीस निरीक्षक महादेव राऊत तानाजी दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय शिरसागर पोलीस हवालदार परीट गायकवाड सोनवलकर खरटमल यांनी केली.



### सांगोला विद्यामंदिरची संस्कृती बेहेरे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम

**सांगोला, दि.३१ ऑगस्ट-**

तांदुळवाडी ता.माळशिरस येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सांगोला विद्यामंदिर प्रशालेची संस्कृती भाग्यवंत बेहेरे हिने पाचवी ते सातवी गटात प्रथम क्रमांक पटकाविला. तिने घरोघरी मोबाईलच्या चुली या विषयावर अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले. तसेच स्व.आ.डॉ.गणपतराव देशमुख यांच्या ९८ व्या जयंतीनिमित्त न्यू इंग्लिश स्कूल व विज्ञान महाविद्यालय, सांगोला यांच्यावतीने आयोजित तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेतही संस्कृती बेहेरे हिने पाचवी ते सातवी गटात प्रथम क्रमांक पटकाविला. तिने स्व.आ.डॉ. गणपतराव देशमुख यांचे सामाजिक कार्य या विषयावर प्रभावी विचार व्यक्त केले. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांनी तिचा सत्कार केला. तिला वाङ्मय विभागप्रमुख उन्मेष आटपाडीकर, प्रशांत रायचुरे, शैलजा झपके, उमेश नष्टे, संध्या तेली, दत्तात्रय पाटील, श्रीकृष्ण वाघमारे, स्वाती चांदणे यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. संस्कृती बेहरे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, कार्यकारणी सदस्य विश्वेश झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापक चिंतामणी देशपांडे, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, उत्तम सरगर, काकासाहेब नरूटे यांनी अभिनंदन केले.



### विद्यार्थ्यांच्या बौध्दीक विकासासाठी सोजर टॅलेन्ट सर्च स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ३१ ऑगस्ट-**

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित सोजर इंग्लिश स्कूल प्राथमिक विभागाच्यावतीने प्रत्येक महिन्यात सामान्य ज्ञानाच्या विविध विषयांवर महिन्याच्या शेवटच्या दिवशी सोजर टॅलेन्ट सर्च या स्पर्धेचे आयोजन केले जाते.

३० ऑगस्ट रोजी राज्य आणि राजधानी या विषयावर संपन्न झालेल्या या स्पर्धेमध्ये स्कूलच्या पहिली ते चौथी या इयत्तेतून चार विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. झारुन मुजावर (इयत्ता पहिली), तैमुर शेख (इयत्ता दुसरी), अफिफा सय्यद (इयत्ता तिसरी), गीता शिंदे (इयत्ता चौथी) यांनी ही कामगिरी केली.

कामगिरी केलेल्या स्कूलच्या विद्यार्थ्यांचा मुख्याध्यापिका रिटा नेटके यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.

# एका व्यासपीठावर या, सिद्ध करुन दाखवू

- मराठा मंडळाच्या सभेत मनोहर सपाटे यांचे विरोधकांना खुले आव्हान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

**संस्थेची लवकरच निवडणूक**

मराठा समाज सेवा मंडळाची पंचवार्षिक निवडणूक आपण लवकरच घेणार असून त्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. गणेश देशमुख यांची नियुक्ती केल्याचे मंडळाचे अध्यक्ष श्री. सपाटे यांनी जाहीर केले.

आपल्या विरोधात रान उठवून छत्रपती शिवाजी प्रशालेला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या विरोधकांनी हिम्मत असेल तर एका व्यासपीठावर यावे. आपण त्यांना ते आमदार देवेंद्र कोठे यांचे हस्तक आणि सूर्याजी पिसाळ यांचे वंशज कसे आहेत हे जनतेसमोर सिद्ध करून दाखवू, असे खुले आव्हान मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांनी विरोधकांना दिले.

शनिवारी, हरिभाई देवकरण प्रशालेच्या मागे असलेल्या मराठा मंदिर येथे मराठा समाज सेवा मंडळाची २९वी वार्षिक सर्वसाधारण सभा सपाटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्यावेळी त्यांनी आपल्या संस्थेवर कशा पद्धतीने प्रशासन नेण्याचा प्रयत्न होत आहे आणि त्यासाठी आपल्याच समाजातीलच काही स्वयंघोषित पुढारी संस्थेला आणि आपल्याला अडचणीत आणण्याचा कसा प्रयत्न करीत आहेत याचा पाढाच सभासदांसमोर वाचला. यावेळी सपाटे म्हणाले, समाजातील हे लोक अवैध व्यवसायात गुंतलेले असताना तेच आपला बायोडाटा खराब करण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु, आपण त्यांचा खरा बायोडाटा जनतेसमोर आणू. त्यासाठी हिंमत असेल तर त्यांनी एका व्यासपीठावर यावे, असेही ते म्हणाले. प्रास्ताविक संस्थेचे सरचिटणीस प्रा. महेश माने यांनी करून अहवाल वाचन केले. दरम्यान,यावेळी मंगेश जाधव, हनुमंत बेसुळके, सुरेश पवार, मारुती फंड, दत्ता भोसले, मारुती गोरे, उमाकांत निकम आदींनी मनोगत व्यक्त केले. या सभेस विनायकराव पाटील, नामदेवराव थोरात, नीलकंठ वाकचौरे, प्रभाकर खंडाळकर, महादेव गवळी, सुनीता साळुंके, रेखा सपाटे, अशोक चव्हाण यांच्यासह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन शिवदास चटके यांनी केले. ज्ञानेश्वर सपाटे यांनी आभार मानले.




## मोफत आरोग्य तपासणीतून गणेश भक्तांची सेवा

- रोटरी क्लबचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ ऑगस्ट-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूर, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, जिज्ञासा सोलापूर विभाग, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग सोलापूर, वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय, समाजकार्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जोडभावी पेठ येथील नेताजी युवक संघटना गणेश मंडळात श्री भक्तांकरीता मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या अध्यक्षा धनश्री केळकर यांच्या हस्ते श्रींची पूजा करून आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी फॅमिली प्लॅनिंगचे व्यंकटेश कंची, आकाश गायकवाड, मंडळाचे अध्यक्ष संदीप फत्तेपूरकर, सुधाकर नराल आदींची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग सोलापूरचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी कृष्णा सकट, सांख्यिकी अधिकारी दिनेश राठोड, ब्रह्मदेव श्रीमंगले, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदींनी भेट देऊन सुरूअसलेल्या तपासणी शिबिराची पाहणी केली. कृष्णा सकट यांनी वंचित, उपेक्षित घटकाला आरोग्य सेवा देण्यासाठी मार्गदर्शन केले.

डॉ. सिद्राम चोरमले, डॉ. विद्या कोळेकर, डॉ. शंभवी काळे यांनी श्री भक्तांची आरोग्य तपासणी करून औषधोपचार दिला तर हिमोग्लोबिन, रक्तातील साखर व आय. सी. टी. सी. तपासणी लॅब टेक्निशन सत्यभामा कांबळे यांनी केली.१८० श्रीभक्तांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. पत्र जोडप्यांना (एलिजिबल कपलला) कुटुंबनियोजन साधनांचे वाटप करण्यात आले. वजन, रक्तदाब आधी तपासण्यांसह स्त्री नसबंदी शास्त्रक्रिया, पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया व सुरक्षित गर्भपात या शस्त्रक्रियांकरिता नोंदणी ही करण्यात आली. समाजकार्य विभाग विद्यार्थ्यांच्या मार्फत प्रजनन आरोग्य आणि कुटुंब कल्याण सेवांच्या माहितीपत्रकांचे जोडभावी पेठ परिसरातील कुटुंबांमध्ये करण्यात आले. शिबीर यशस्वी करण्यासाठी परिचारिका सुकेशनी सोनकांबळे, सुदूर सेवा विभाग कर्मचारी कल्पना गडगडे, करण खानापुरे आदींनी परिश्रम घेतले.

**मराठा समाज सेवा मंडळ, सोलापूर** ई -१०९
**१०१- ब, मुरारजी पेठ, सोलापूर**
**निवडणूक कार्यक्रम**

संस्थेच्या घटनेतील निवडणूक नियमाच्या अधीन राहून पदाधिकारी व कार्यकारी मंडळ यांची निवड गुप्त मतदान पध्दतीने सन २०२५ ते २०३० या पंचवार्षिक मुदतीकरिता होणार आहे. त्याचा निवडीचा निवडणूक कार्यक्रम खालील प्रमाणे

| अ.क्र. | दिनांक | विषय | स्थळ | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | ०१/०९/२०२५ | मतदार यादी प्रसिध्द करणे | मराठा मंदिर, हरिभाई देवकरण प्रशालेच्या पाठीमागे, १५६-क, रेल्वे लाईन्स, सोलापूर | स. १०,०० |
| २ | ०२/०९/२०२५ ते ०३/०९/२०२५ | मतदार यादीवर हरकती व सूचना स्वीकारणे | मराठा मंदिर, हरिभाई देवकरण प्रशालेच्या पाठीमागे, १५६-क, रेल्वे लाईन्स, सोलापूर | सायं. ६.०० ते ७.३० |
| ३ | ०४/०९/२०२५ | मतदारांची अंतिम यादी प्रसिध्द करणे. | मराठा मंदिर, हरिभाई देवकरण प्रशालेच्या पाठीमागे, १५६-क, रेल्वे लाईन्स, सोलापूर | सायं. ६.०० |
| ४ | ०६/०९/२०२५ ते १०/०९/२०२५ | नामनिर्देशनपत्र देणे व स्वीकारणे | मराठा मंदिर, हरिभाई देवकरण प्रशालेच्या पाठीमागे, १५६-क, रेल्वे लाईन्स, सोलापूर | सायं. ६.०० ते ७.३० |
| ५ | १२/०९/२०२५ | अर्जाची छाननी वैध नामनिर्देशनपत्रे पदनिहाय करणे. | मराठा मंदिर, हरिभाई देवकरण प्रशालेच्या पाठीमागे, १५६-क, रेल्वे लाईन्स, सोलापूर | सायं. ६.०० ते ७.३० |
| ६ | १३/०९/२०२५ ते १६/०९/२०२५ | उमेदवारी अर्ज परत घेणे. | मराठा मंदिर, हरिभाई देवकरण प्रशालेच्या पाठीमागे, १५६-क, रेल्वे लाईन्स, सोलापूर | सायं. ६.०० ते ७.३० |
| ७ | १७/०९/२०२५ | उमेदवारांची पदनिहाय अंतिम यादी प्रसिध्द करणे. | मराठा मंदिर, हरिभाई देवकरण प्रशालेच्या पाठीमागे, १५६-क, रेल्वे लाईन्स, सोलापूर | सायं. ६.०० |
| ८ | २७/०९/२०२५ | मतदान (आवश्यकता भासल्यास) | मराठा मंदिर, हरिभाई देवकरण प्रशालेच्या पाठीमागे, १५६-क, रेल्वे लाईन्स, सोलापूर | स.८.०० ते दु.१,०० |
| ९ | २७/०९/२०२५ | मतमोजणी | मराठा मंदिर, हरिभाई देवकरण प्रशालेच्या पाठीमागे, १५६-क, रेल्वे लाईन्स, सोलापूर | दु.३.०० ते सायं. ६.०० |
| १० | २७/०९/२०२५ | निवडणूक निकाल जाहीर करणे | मराठा मंदिर, हरिभाई देवकरण प्रशालेच्या पाठीमागे, १५६-क, रेल्वे लाईन्स, सोलापूर | मतमोजणी नंतर |
| ११ | २७/०९/२०२५ | निवडणूक निकालाची सभा | मराठा मंदिर, हरिभाई देवकरण प्रशालेच्या पाठीमागे, १५६-क, रेल्वे लाईन्स, सोलापूर | निकाल जाहीर झाल्यानंतर लगेच |

टीप- दिनांक ३०/०८/२०२५ च्या सर्वसाधारण सभेत सर्वानुमते निवडणूक कार्यक्रमास मान्यता तसेच संपूर्ण निवडणूक कार्यक्रम संस्थेच्या जागेत सायंकाळी ५ ते ७ या वेळेत पार पाडले जातील.

शिक्का

सही/-
**(ॲड. गणेश सुखदेव देशमुख)**
निवडणूक निर्णय अधिकारी, मराठा समाज सेवा मंडळ सोलापुर

Classifieds

**पाहिजेत**

**भागवत सिनेमा येथे** Operations associate, Security guard, projection **आणि** housekeeping **या पदासाठी स्टॉफ त्वरित भरणे आहे.**
**संपर्क : ८८०६३३५०५०**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

**जाहिर प्रसिध्दीकरण**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधि, १९६०, नियम १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील तरतुदीनुसार मंगळवेढा तालुक्यातील क वर्गातील सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणूक कार्यक्रम खालील प्रमाणे जाहीर प्रसिध्दीकरण करण्यात येत आहे.**

| अ. क्र. | संस्थेचे नाव | प्रारुप मतदार यादी प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | प्रारुप मतदार यादीवर आक्षेप/ हरकती मागविण्याचा कालावधी | प्राप्त हरकतीवर निर्णय देणे दिनांक | अंतीम मतदार यादी प्रसिध्द करणे दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | वेताळ वि.का. सेवा, सह.संस्था म., शिरसी ता. मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |
| २ | लक्ष्मी वि.का.सेवा सह. संस्था म., येड्राव ता. मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |
| ३ | जिजामाता वि.का.सेवा सह.संस्था म.,हिवरगाव ता. मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |
| ४ | सिध्देश्वर वि.का.सेवा सह.संस्था म.,माचणूर ता. मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |
| ५ | कै. पितांबर पवार वि.का.सेवा सह.संस्था म. रहाटेवाडी ता.मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |
| ६ | जय हनुमान वि.का.सेवा सह. संस्था म., येळगी, ता. मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |
| ७ | कै. दत्ताजीराव भाकरे वि.का. सेवा सह. संस्था म., आंधळगांव ता. मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |
| ८ | बनशंकरी वि.का.सेवा सह. संस्था म., लक्ष्मीदहिवडी ता. मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |
| ९ | बाळुमामा वि.का.सेवा सह.संस्था म., मानेवाडी ता. मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |
| १० | बिरोबा वि.का.सेवा सह.संस्था म., रेवेवाडी ता. मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |
| ११ | माऊली वि.का.सेवा सह.संस्था म., नंदेश्वर ता. मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |
| १२ | माणगंगा वि.का.सेवा सह.संस्था म., मारापूर ता. मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |
| १३ | लक्ष्मी वि.का.सेवा सह.संस्था म., मुंढेवाडी ता.मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |
| १४ | महादेव (आण्णा) आवताडे वि.का. सेवा सह. संस्था म., भोसे ता.मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |
| १५ | शिवराज वि.का.सेवा सह.संस्था म., बोराळे ता.मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |
| १६ | आमसिध्द (आण्णा) केदार वि.का.सेवा सह.संस्था म., डोणज ता. मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |
| १७ | संत बागडेबाब वि.का.सेवा सह.संस्था म., बावची ता. मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |
| १८ | संतभूमी वि.का.सेवा सह.संस्था म., मंगळवेढा, ता. मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |
| १९ | संतमेळा वि.का.सेवा सह.संस्था म., मंगळवेढा, ता. मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |
| २० | स्व. धानप्पा माने वि.का.सेवा सह.संस्था म., कात्राळ ता. मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |
| २१ | सिध्देश्वर वि.का.सेवा सह.संस्था म., तळसंगी ता. मंगळवेढा | १/०९/२०२५ स.११.०० वा | १/०९/२०२५ ते ८/०९/२०२५ स.११ ते दु.३ | १६/०९/२०२५ | १६/०९/२०२५ |

**उपरोक्त निवडणूक कार्यक्रम तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था मंगळवेढा व संबंधित संस्था/ग्रामपंचायत/तलाठी नोटीस बोर्डावर रीतसर प्रसिध्द करण्यात आले आहे.**

**सही/-**
**(विजय व. वाघमारे)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा-सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मंगळवेढा**

**कटारे स्पिनिंग मिल्स् लिमिटेड,**

**नोंदणीकृत कार्यालय, कटारे कॉम्पलेक्स, १४/३०, रविवार पेठ, बी.विंग तळमजला गांधीनगर अक्कलकोट रोड सोलापूर - ४१३००६**
**CINL17119PN1980PLC022962 ई-मेल katarespinningmills@gmail.com**

**नोटीस**

सर्वांना सूचना देण्यात येते की कंपनीच्या सभासदांसाठी ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार २९, सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता (भारतीय प्रमाणवेळ ) कटारे कॉम्पलेक्स, १४/३०, तळमजला, बी विंग, गांधीनगर अक्कलकोट रोड, सोलापूर - ४१३००६ येथे आयोजित केली आहे. वरील सर्वसाधारण सभेसाठीच्या सूचना आणि वार्षिक अहवाला कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच एजन्सी म्हणजेच www.katarespinningmills.com CDSL www.evotingindia.com ज्या सदस्यांना वार्षिक अहवाल मिळाला नाही. त्यांनी व्यवस्थापकीक संचालक यांना वरील निर्देशित केलेले ई-मेल आयडीवर किंवा नोंदणीकृत कार्यालयाशी संपर्क साधून वार्षिक अहवालाची मागणी करावी. कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०८ सह वाचल्या जाणा-या तसेच केलेल्या नियमाप्रमाणे आणि सेबीमधील नियम व अधिनियम ४४ नुसार ( लिस्टिंग ऑबलिगेशन ॲन्ड डिस्क्लोजर रिक्यारमेंट ) अधिनियम २०१५ नुसार कंपनीने सभासदांसाठी त्यांचे मत इलेक्ट्रानिक पध्दतीने मत नोंदणीची सोय उपलब्ध करून दिली आहे ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील प्रस्तावांवर त्यांना या द्वारे मतदान करता येईल. कंपनी कायदा २०१३ मधील तरतुदी आणि नियमानुसार तपशील खालीलप्रमाणे दिले आहे.

मतदाराद्वारे इलेक्ट्रानिक मतदान केला जावू शकतो. रिमोट ई-मतदानास कालावधी शुक्रवार २६ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजता सुरू होईल आणि रविवार, २८ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता समाप्त होईल. कंपनी कायदा २०१३ मधील कलम ९१ अन्वये आणि त्याखालील तयार करण्यात आलेल्या नियमानुसार सदस्यांची नोंदणी आणि कंपनीचे भाग हस्तांतर पुस्तक २१ सप्टेंबर २०२५ ते २९ सप्टेंबर २०२५ या कालावधीत बंद ठेवण्यात आले आहे. कंपनीच्या सभासदांचे समभाग जे फिजिकल फॉर्ममध्ये अथवा डिमॅटराईजड फॉर्ममध्ये असतील त्यासाठी कट ऑफ डेट शुक्रवार, दिनांक २० सप्टेंबर २०२५ असेल. सभासदांनाच फक्त सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित राहून सभासद ई-रिमोट मतदान करून सभेत सहभाग घेऊ शकतील. परंतु पुन्हा ते प्रत्यक्ष मतदान सभेमध्ये करू शकणार नाहीत.

जी व्यक्ती ज्याच्याकडे कंपनीचे समभाग आहेत आणि जे सभेची नोटीस पाठविल्यानंतर सभासद झाले आहेत आणि कट ऑफ तारखेदिवशी म्हणजे २० सप्टेंबर २०२५ रोजी भागधारक झाले आहेत. त्यांनी ई-व्होटींग संदर्भातील सूचना पाळाव्यात. वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि त्यात नमूद केल्याप्रमाणे प्रथमच सदस्य झालेल्यांनी नियम पाळावेत. कंपनीच्या संकेतस्थळावर याबाबतचे नियम निर्देशित केले आहेत. यासंदर्भात सभासदांना काही तपशील हवे असतील तर त्यांनी कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट जे की, लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड. यांच्याशी संपर्क साधून आवश्यक तो लॉग इन आय. डी. आणि पासवर्ड उपलब्ध करून घ्यावा. वार्षिक सर्वसाधारण सभेत मतपत्रिकेद्वारे मतदान करण्याची सोयही उपलब्ध करून देण्यात आली आहे. जे सदस्य सभेसाठी प्रत्यक्ष हजर आहेत. परंतु त्यांनी रिमोट ई-व्होटिंग प्रणालीद्वारे मतदान केलेले नाही केवळ तेच सदस्य मतपत्रिकेद्वारे मतदानाचा हक्क बजावू शकतील. इलेक्ट्रानिक मतदाना करिता सदस्य मदत विभागातर्गत नेहमी विचारले जाणारे प्रश्न (FQs) आणि www.evotingindia.com वर इलेक्ट्रानिक पध्दतीचे ई-मतदान करण्याच्या सुविधेशी संबधित असलेल्या कोणत्याही तक्रारी दूर करण्यासाठी संपर्क साधावे. उपव्यस्थापक, सेंट्रल डिपाझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, ऑफीस १७ वा मजला, पी. जे. टॉवर्स, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०००१ दुरध्वनी क्रमाक १८००२००५५३३ / ०२२-२२७२८५८८ ई-मेल helpdesk.evotingcdslindia.com.

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - ३०/०८/२०२५**

**कटारे स्पिनिंग मिल्स् लिमिटेडकरिता**
**सही /- किशोर ति. कटारे**
**डिन क्रमांक - ००६४५०१३**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सात्त्विक-चिरागला दुसरे कांस्यपदक

### जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धा

**◆ पॅरिस, ३१ ऑगस्ट**

येथे सुरू असलेल्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत चेन बो यांग व लिऊ यी या चीनच्या ११ व्या मानांकित जोडीकडून पराभव पत्करावा लागल्यामुळे अव्वल भारतीय जोडी सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी या जोडीला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

भारताला पदक निश्चित केल्यानंतर एका दिवसात, जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणारी पहिली भारतीय पुरुष दुहेरी जोडी होण्याच्या उंबरठ्यावर असताना या माजी जागतिक प्रथम विश्वमानांकित जोडीला उपांत्य फेरीत पराभवाचा सामना करावा लागला. ६७ मिनिटांच्या उपांत्य सामन्यात सात्त्विक-चिरागला चीनच्या जोडीकडून १९-२१, २१-१८, १२-२१ असा पराभव पत्करावा लागला. २०२२ मध्ये कांस्यपदक जिंकल्यानंतर या भारतीय जोडीचे जागतिक स्पर्धेतील हे दुसरे पदक आहे.



कांस्यपदक विजेते सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी

आशियाड क्रीडा स्पर्धेतील विजेते सात्त्विक व चिरागने आपले प्रतिस्पर्धी मलेशियाचे दोन वेळचे ऑलिम्पिक पदक विजेते आरोन चिया व सोह वूई यिक या जोडीला उपांत्यपूर्व फेरीत पराभूत करून २०११ मध्ये सुरू झालेल्या स्पर्धेत भारताची पदकांची मालिका वाढवली.

तथापि, भारतीयांनाया स्पर्धेत चीनच्या जोडीच्या दृढ बचावाला तोडता आले नाही. सात्त्विक व चिरागने टोकियो ऑलिम्पिकमध्ये पदक गमावल्यानंतर एका वर्षानंतर २०२२ मध्ये टोकियोमध्ये पहिल्यांदाच जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते. या प्रतिष्ठित स्पर्धेत त्यांचे दुसरे पदक आले आहे. याबरोबरच स्पर्धेत भारताच्या मोहिमेचाही शेवट झाला. ◄(वृत्तसंस्था)

# मध्य, उत्तर विभाग उपांत्य फेरीत





आयुष बदोनीचे द्विशतक

**◆ बंगळुरू, ३१ ऑगस्ट**

येथे आयोजित दुलीप करंडक क्रिकेट स्पर्धेत मध्य विभाग आणि उत्तर पूर्व (ईशान्य) विभाग यांच्यादरम्यानचा चार दिवसीय उपांत्यपूर्व सामना रविवारी अनिर्णीत राहिला, मात्र पहिल्या डावात मिळविलेल्या भक्कम धावांच्या आघाडीच्या बळावर ध्रुव जुरेलच्या नेतृत्वाखालील मध्य विभागाने स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश मिळविला.

मध्य विभागाने ४ बाद ५३२धावा काढून आपला पहिला डाव घोषित केल्यानंतर उत्तर पूर्व विभागाचा पहिला डाव १८५ धावांवरच आटोपला. त्यामुळे मध्य विभागाला पहिल्या डावात ३४७ धावांची भक्कम आघाडी मिळाली. मध्य विभागाने दुसऱ्या डावात ७ बाद ३३१ धावा फटकावून आपला डाव घोषित केला. त्यामुळे मध्य विभागाने उत्तर पूर्व विभागासमोर विजयासाठी ६७८ धावांचे मोठे लक्ष्य ठेवले, मात्र उत्तर पूर्व विभागाला चौथ्या दिवस अखेर ६ बाद २०० धावांपर्यंतच मजल मारता आली, परिणामी हा सामना अनिर्णीत राहिला.

**उत्तर विभाग उपांत्य फेरीत**

येथे खेळल्या गेलेला उत्तर विभाग आणि पूर्व विभागादरम्यानचा उपांत्यपूर्व सामनाही अनिर्णीत राहिला, मात्र पहिल्या डावांत मिळविलेल्या मजबूत आघाडीच्या आधारावर शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील उत्तर विभागाने उपांत्य फेरीत प्रवेश केला. उत्तर विभागाच्या आयुष बदोनीने २२३ चेंडूंत १३ चौकारव ३ षट्कारसह नाबाद २०४ धावांची खेळी केली.

उत्तर विभागाच्या ४०५ धावांच्या प्रत्युत्तरात पूर्व विभागाला २३० धावांच काढता आल्या. पहिल्या डावात१७५ धावांची आघाडी मिळविणाऱ्या उत्तर विभागाने चौथ्या दिवशी ४ बाद ६५८ धावा ठोकून आपला दुसरा डाव घोषित केला. पूर्व विभागाला दुसऱ्या डावांत फलंदाजी करण्याची संधीच मिळाली नाही, परिणामी हा सामना अनिर्णीत राहिला. मात्र पहिल्या डावांत मिळविलेल्या १७५ धावांच्या आघाडीच्या बळावर उत्तर विभागाने स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

**असे खेळले जाणार उपांत्य सामने**

मोहम्मद अझरुद्दीनच्या नेतृत्वाखालील दक्षिण विभाग आणि शार्दुल ठाकूरच्या नेतृत्वाखालील पश्चिम विभागाला थेट उपांत्य फेरीत स्थान देण्यात आले. आता ४ सप्टेंबरपासून दक्षिण विभाग आणि उत्तर विभाग यांच्यादरम्यान पहिला उपांत्य सामना, तर मध्य विभाग व पश्चिम विभाग यांच्यादरम्यान दुसरा उपांत्य सामना होणार आहे. ◄(वृत्तसंस्था)

# तू कसोटी क्रिकेटच्या सौंदर्याची आठवण करून देणारा होतास

### पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून पुजाराची प्रशंसा

**◆ नवी दिल्ली, ३१ ऑगस्ट**

चेतेश्वर पुजाराची खेळण्याची शैली कसोटी क्रिकेटच्या सौंदर्याची आठवण करून देणारी होती, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या फलंदाजीच्या मुख्य आधारस्तंभ चेतेश्वर पुजाराची प्रशंसा केली. पुजाराने अलीकडेच सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे.

पुजाराने गत रविवारी निवृत्तीची घोषणा केली होती, त्याने १०३ कसोटी सामन्यांची उल्लेखनीय कारकीर्द संपवली.

क्रिकेटच्या छोट्या स्वरूपांचे वर्चस्व असलेल्या युगात, तू खेळाच्या कसोटी क्रिकेटच्या सौंदर्याची आठवण करून देणारा होतास. तुझा अढळ स्वभाव आणि एकाग्रतेने जास्त वेळ फलंदाजी करण्याची क्षमता, यामुळे तू भारतीय फलंदाजी रांगेचा आधार बनलास, असे मोदींनी पुजाराला लिहिलेल्या पत्रात लिहिले आहे.

भारताच्या माजी तिसऱ्या क्रमांकाच्या फलंदाजाने समाजमाध्यमावर या पत्राची प्रत पोस्ट केली आणि पंतप्रधानांच्या उबदार शब्दांबद्दल त्यांचे आभार मानले.

तुझ्या उत्कृष्ट क्रिकेट कारकिर्दीत





उल्लेखनीय विशेषतः परदेशातील आव्हानात्मक परिस्थितीत खेळण्याचे कौशल्य आणि दृढनिश्चयाचे क्षण मोलाचे आहेत. उदाहरणार्थ, ऑस्ट्रेलियातील कसोटी सामन्यांसारख्या घटना चाहत्यांना नेहमीच आठवतील, जेव्हा तूने ऑस्ट्रेलियन भूमीवर भारताच्या ऐतिहासिक पहिल्या मालिका विजयाचा पाया रचला होता, असे मोदींनी या पत्रात म्हटले आहे.

सर्वात शक्तिशाली गोलंदाजी आक्रमणांपैकी एकासमोर उभे राहून, संघाची जबाबदारी काय आहे हे तू दाखवून दिले, असे मोदींनी २०१८ आणि २०२१ मध्ये ऑस्ट्रेलियामध्ये सलग दोन मालिका विजयांमध्ये पुजाराच्या महत्त्वपूर्ण भूमिकेचा उल्लेख करत लिहिले. देशांतर्गत क्रिकेटसाठी पुजाराच्या वचनबद्धतेचेही मोदींनी कौतुक केले.

तुझी खेळाबद्दलची आवड यातूनही दिसून आली की तुम्ही आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू असतानाही प्रथम श्रेणी क्रिकेट खेळण्याचा निर्णय घेतला, मग ते सौराष्ट्रासाठी असो किंवा परदेशात. सौराष्ट्र क्रिकेटशी तुझा दीर्घकाळचा संबंध व राजकोटला क्रिकेटच्या नकाशावर आणण्यात तुमचे योगदान या प्रदेशातील प्रत्येक तरुणासाठी अभिमानाचा स्रोत राहील, असे पंतप्रधानांनी म्हटले.

पुजाराने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पात्रला दिलेल्या उत्तरात लिहिले: आमच्या पंतप्रधानांकडून निवृत्तीबद्दल कौतुकाचे पत्र मिळाल्याने मला सन्मानित वाटले. व्यक्त केलेल्या उबदार भावनांचे खूप कौतुक आहे. मी माझ्या दुसऱ्या डावात प्रवेश करत असताना, मैदानावरील प्रत्येक आठवणी आणि मला मिळालेले सर्व प्रेम आणि कौतुक मी जपतो. धन्यवाद सर. ◄(वृत्तसंस्था)

### मुंबईत संडे ऑन सायकल रॅलीत रक्षा खडसे, जॅकी श्रॉफ

**◆ मुंबई, ३१ ऑगस्ट**

भारतीय क्रीडा प्राधिकरण, प्रादेशिक केंद्र मुंबईने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सहकार्याने बोरिवली येथे संडे ऑन सायकल च्या ३८ व्या आवृत्तीचे यशस्वी आयोजन केले. या रॅलीत केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा निखिल खडसे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या आणि प्रसिद्ध अभिनेता आणि फिटनेस आयकॉन जॅकी श्रॉफ अतिथी म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात ५०० हून अधिक उत्साही सायकलस्वार सहभागी झाले होते, जे फिटनेस, शाश्वतता आणि सामुदायिक भावना साजरी करण्यासाठी चळवळीत सामील झाले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या फिट इंडिया मिशन अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या 'संडे ऑन सायकल' या मोहिमेला दर आठवड्याला गती मिळत आहे यावर रक्षा खडसे यांनी भर दिला. सायकलिंग हा केवळ फिटनेसचा मार्ग नाही तर वाढत्या प्रदूषण आणि वाहतूक कोंडीवर, विशेषतः शहरी भागात, एक व्यावहारिक उपाय देखील आहे यावर त्यांनी भर दिला. निरोगी राहण्यासाठी सायकलिंग हा एक सोपा पण शक्तिशाली मार्ग असल्याचे सांगून, त्यांनी नागरिकांना त्यांच्या जीवनशैलीचा भाग म्हणून सायकलिंग स्वीकारण्यास प्रेरित केले. जॅकी श्रॉफने आपल्या प्रेरणादायी शैलीत उपस्थितांना आठवण करून दिली की 'तंदुरुस्ती प्रत्येकासाठी आहे. 'पेअर में दम तो आगे कदम'. सहभागींना मजबूत राहण्याचे, आपल्या आरोग्याची जबाबदारी घेण्याचे आणि त्यांच्या सभोवतालच्या इतरांना तंदुरुस्त आणि सक्रिय जीवन जगण्यास प्रेरित करण्याचे आवाहन केले. ◄(वृत्तसंस्था)

# भारताचा २३ वर्षांखालील फुटबॉल संघ जाहीर

### एएफसी २३ वर्षांखालील आशियाई चषक पात्रत सामने

**◆ कोलकाता, ३१ ऑगस्ट**

दोहा, कतार येथे होणाऱ्या एएफसी २३ वर्षांखालील आशियाई चषक पात्रता फुटबॉल सामन्यांसाठी भारताचा २३ वर्षांखालील २३ सदस्यीय संघ जाहीर करण्यात आला आहे.

या स्पर्धेत भारताचा गट एच मध्ये समावेश करण्यात आला आहे. या गटात भारतीय संघ बहरीन (३ सप्टेंबर), यजमान कतार (६ सप्टेंबर) आणि ब्रुनेई दारुस्सलाम (९ सप्टेंबर) यांच्याशी खेळेल.

गट विजेता आणि ११ गटांमधील चार सर्वोत्तम दुसऱ्या क्रमांकाचे संघ एएफसी अंडर-२३ आशियाई चषक सौदी अरब २०२६ स्पर्धेसाठी पात्र ठरतील. भारतीय संघात मोहन बागानच्या एकाही खेळाडूला स्थान मिळाले नाही.

भारताच्या २३ वर्षांखालील संघाने या महिन्याच्या सुरुवातीला मलेशियातील क्वालम्पूर येथे इराक २३ वर्षांखालील संघांविरुद्ध दोन बंद दाराचे मैत्रीपूर्ण सामने खेळले होते व त्यापैकू भारतीय संघाने दोन्ही सामने गमावले (१-२ आणि १-३).

**२३ वर्षांखालील आशियाई चषक पात्रता स्पर्धेसाठी भारतीय संघः** गोलरक्षकः साहिल, मोहम्मद अरबाज, दीपेश चौहान. बचावपटू : बिकाश यमनाम, प्रमवीर, मोहम्मद साहीफ अरेसिंते पुरक्कल, हर्ष अरुण पालांडे, सुभम भट्टाचार्य, रिकी मीतेई हाओबाम. मधली फळी : सोहम नवीन वार्ष्णेय, लालरिन्लियाना हन्मते, मोहम्मद आयमेन, विबिन मोहनन, मोहम्मद सनन के, चिंगांगबम शिवाल्डो सिंग, आयुष देव छेत्री, मॅकार्टन लुई निक्सन, लालरेम्तलुआंगा फनाई, विनित व्यंकटेश. आक्रमक फळी : पार्थिव सुंदर गोगोई, मोहम्मद सुहेल, श्रीकुटन एमएस, साहिल हरिजन. ◄(वृत्तसंस्था)



### भारताने पटकावले दक्षिण आशियाई चषकाचे जेतेपद

**◆ थिम्पू, ३१ ऑगस्ट**

राऊंड रॉबिन पद्धतीने खेळल्या गेलेल्या दक्षिण आसशियाई चषक १७ वर्षांखालील महिला फुटबॉल स्पर्धेत अखेरच्या सामन्यात बांगलादेशविरुद्ध पराभव झाल्यानंतरही भारतीय संघाने या स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. रविवारी भूतानच्या चांगलिमिथांग स्टेडियमवर बांगलादेशकडून ३-४ असा पराभव झाल्यानंतरही भारतीय १७ वर्षांखालील महिला संघाने विजेतेपद पटकावले. एक सामना शिल्लक असताना भारताने गुणतालिकेत अजिंक्य आघाडी मिळवली. या स्पर्धेत भारताने राऊंड रॉबिन फेरीत पाच विजय नोंदविले आणि एक पराभव पत्करला.

पहिल्या मिनिटात पूर्णिमा मार्मने बांगलादेशसाठी गोल करून सुरुवात केली. भारताच्या अनुष्का कुमारीने नवव्या मिनिटाला बरोबरी साधली. तथापि, बांगलादेशने ३४ व्या मिनिटाला अल्पी अख्तरने गोल करून आघाडी परत मिळवली आणि ४८ व्या मिनिटाला सौरवी प्रितीने गोल करून ती वाढवली. ६५ व्या मिनिटाला प्रितिका बर्मनच्या गोलने भारताने एक गोल मागे घेतला आणि ८९ व्या मिनिटाला कर्णधार जुलानच्या गोलने बरोबरी साधली. ◄(वृत्तसंस्था)

# भारताचा जपानवर ३-२ ने विजय

### हॉकी आशिया चषकात सलग दुसरा विजय





जपानवरील विजयानंतर संघातील सहकाऱ्यांसोबत आनंद साजरा करताना कर्णधार हरमनप्रीत सिंग

**◆ राजगीर (बिहार), ३१ ऑगस्ट**

कर्णधार हरमनप्रीत सिंगने दोन गोल करून रविवारी येथे झालेल्या पुरुषांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत गट अ मध्ये जपानचा ३-२ असा पराभव केला.

हरमनप्रीतने पाचव्या आणि ४६ व्या मिनिटाला गोल केला, तर मनदीप सिंगने चौथ्या मिनिटाला भारताकडून दुसरा गोल केला. जपानकडून कोसेई कावाबेने ३८ व्या आणि ५९ व्या मिनिटाला गोल केला. शुक्रवारी भारताने आपल्या मोहिमेच्या सुरुवातीच्या सामन्यात चीनवर ४-३ असा विजय मिळवला होता. आता सोमवारी यजमान भारतीय संघाचा शेवटचा गट साखळी सामना कझाकस्तानशी होईल. या खंडीय स्पर्धेतील विजेता संघबेल्जियम आणि नेदरलॅण्ड यांच्या यजमान पदाखाली होणाऱ्या विश्वचषकासाठी पात्र ठरेल. ◄(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### प्रो-कबड्डी लीग हंगामात यु मुम्बचा दुसरा विजय

**विशाखापट्टणम्** : बाराव्या प्रो-कबड्डी लीग हंगामात रविवारी येथील विश्वनाथ क्रीडा संकुलात खेळल्या गेलेल्या सामन्यात यु मुम्बाने जोरदार मुसंडी मारत तामिळ थलायव्हासवर ३६-३३ असा तीन गुणांच्या फरकाने रोमहर्षक विजय नोंदविला.



मध्यंतरापर्यंत यु मुम्बा तामिळसंघाविरुद्ध ११-१४ असा पिछाडीवर होता. मात्र मध्यंतरानंतर यु मुम्बाने आक्रमक खेळ करत सामन्यात वर्चस्व गाजविले. सामन्याच्या प्रारंभी तामिळ थलाव्हासच्या अर्जुन देशवाल, नितेश कुमार, आशिष, रौनक, हिमांशू व कर्णधार पवन सेहरावतने आक्रमक खेळ करत मध्यांतरापर्यंत आपली आघाडी कायम राखली, मात्र त्यानंतर यु मुम्बाच्या परवेश भैंसवाल, अजित चौहान, कर्णधार सुनील कुमार, रिंकू, लोकेश घोसलिया, अनिल, रोहित राघवने सांघिक खेळाचे उत्तम प्रदर्शन करत सामन्यात आपला दबदबा कायम राखला. यु मुम्बाचा हा दोन सामन्यातील दुसरा विजय ठरला, तर तामिळचा दोन सामन्यातील हा पहिला पराभव ठरला. यु मुम्बा चार गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचला,.

### जागतिक ॲथ्लेटिक्स स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व चोप्राकडे

**नवी दिल्ली** : स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा याच्या नेतृत्वाखाली भारताने रविवारी टोकियो येथे १३ ते २१ सप्टेंबर दरम्यान होणाऱ्या जागतिक ॲथ्लेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेसाठी १९ सदस्यीय संघाची घोषणा केली. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच भारताचे चार पुरुष भालाफेकपटू या स्पर्धेत सहभागी होतील. सचिन यादव, यशवीर सिंग आणि रोहित यादव हे देखील या स्पर्धेत सहभागी होतील. तसेच दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेता चोप्रा सुद्धा या स्पर्धेत सहभागी झाला आहे. गत आवृत्तीतही चार भारतीय पात्र ठरले होते, परंतु रोहितला दुखापतीमुळे माघार घ्यावी लागली.

**भारतीय संघ : पुरुष** : नीरज चोप्रा, सचिन यादव, यशवीर सिंग आणि रोहित यादव (भालाफेक), मुरली श्रीशंकर (लांब उडी), गुलवीर सिंग (५,००० मीटर आणि १०,००० मीटर), प्रवीण चित्रवेल आणि अब्दुल्ला अबूबकर (तिहेरी उडी), सर्वेश अनिल कुशारे (उंच उडी), अनिमेश कुजूर (२०० मीटर), तेजस शिरसे (११० मीटर अडथळा), सर्विन सेबॅस्टियन (२० किमी रेस वॉक), राम बाबू आणि संदीप कुमार (३५ किमी रेस वॉक). महिला: पारुल चौधरी आणि अंकिता ध्यानी (३००० मीटर स्टीपलचेस), अन्नू राणी (भालाफेक), प्रियंका गोस्वामी (३५ किमी रेस वॉक), पूजा (८०० मीटर आणि १५०० मीटर).

### आयपीएल निवृत्तीनंतर अश्विन आयएलटीच्या लिलावात

**नवी दिल्ली** : इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मधून निवृत्ती जाहीर केल्यानंतर भारताचा माजी ऑफ-स्पिन गोलंदाज अष्टपैलू रविचंद्रन अश्विन यूएईच्या आयएलटीच्या चौथ्या हंगामातील खेळाडूंच्या लिलावात उतरणार आहे. आयएलटी चा चौथा हंगाम २ डिसेंबर ते ४ जानेवारी २०२६ दरम्यान होणार आहे. खेळाडूंच्या लिलावासाठी नोंदणी करण्याची शेवटची तारीख १० सप्टेंबर आहे, तर मुख्य लिलाव ३० सप्टेंबर रोजी दुबईमध्ये होणार आहे. हो, हे खरे आहे की अश्विनने आगामी आयएलटी लिलावासाठी त्याचे नाव पाठवले आहे. काही संघांनी अश्विन लिलावात आला तर त्याला करारबद्ध करण्याचा प्रस्ताव दिला आहे आणि शेवटी त्याला स्पर्धेसाठी कोण निवडते हे पाहणे मनोरंजक असेल, असे घडामोडींचा मागोवा घेणाऱ्या सूत्रांनी सांगितले.रॉबिन उथप्पा (दुबई कॅपिटल्स), युसूफ पठाण (दुबई कॅपिटल्स) आणि अंबाती रायुडू (एमआय एमिरेट्स) हे एकमेव भारतीय क्रिकेटपटू आहेत जे आयएलटी मध्ये खेळले आहेत. या लीगमध्ये पाच संघांचे मालक भारतीय आहेत- त्यापैकी तीन संघ आयपीएलमध्ये दिल्ली कॅपिटल्स, मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स देखील चालवतात.



### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,०१,५०० |
| **चांदी** (प्रतिकिलो) | रु.१,१७,५०० |

### तापमान/पर्जन्यमान

| | कमाल | मिमी |
|---|---|---|
| सोलापूर | ३०.९ | २२.९ |
| अमरावती | ३०.२ | ०.० |
| भंडारा | ३०.० | ०.० |
| बुलडाणा | २९.० | ०.० |
| चंद्रपूर | ३१.६ | ०.० |
| गडचिरोली | ३०.६ | ०.० |
| गोंदिया | ३१.६ | ०.० |
| नागपूर | ३१.६ | ३.० |
| वर्धा | ३२.२ | २.० |
| वाशीम | २८.४ | ०.० |
| यवतमाळ | ३०.२ | ०.० |

# भाम्बरी, व्हीनसचा विजय; बोपण्णा, कढेचा पराभव

### अमेरिकन ओपन टेनिस


**◆ न्यू यॉर्क, ३१ ऑगस्ट**

भारताच्या युकी भाम्बरी व त्याचा जोडीदार मायकेल व्हीनसने मार्कोस गिरॉन व लर्नर टिएन या अमेरिकन जोडीला पराभूत केले, परंतु रोहन बोपण्णा आणि अर्जुन कढेने येथे आपल्या पहिल्या फेरीतील सामन्यामध्ये पराभव पत्करून अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेतून बाहेर झाले.

१४ व्या मानांकित भाम्बरी व व्हीनस या भारत-न्यूझीलंड जोडीने ६-०, ६-३ असा विजय मिळवला. त्यांनी सामन्यात केवळ तीन गेम गमावले.

भाम्बरी व व्हीनसने पहिल्या सेटमध्ये एकही गेम गमावला नाही आणि दुसऱ्या सेटमध्ये त्यांनी लय कायम ठेवली, त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांना लवकर हरवले आणि सामना संपवला.

तथापि, मोनाकोच्या रोमेन अर्नेओडोसोबत भागीदारी करणाऱ्या बोपण्णाचा केवळ एक तास व पाच मिनिटांत रॉबर्ट कॅश आणि जेम्स ट्रेसी या अमेरिकन संघाकडून ४-६, ३-६ असा पराभव झाला. दरम्यान, डिएगो हिडाल्गोसोबत अमेरिकन ओपनमध्ये पदार्पणात कढे यांचा सामना दुसऱ्या मानांकित जोडी मेट पाविक आणि मार्सेलो अरेव्हालो यांच्याशी झाला. कढे व हिडाल्गोने पहिला सेट जिंकून दुसऱ्या मानांकित संघाला धक्का दिला, पण शेवटी त्यांना ७-५, ६-७(४), ४-६ असा पराभव पत्करावा लागला. ◄(वृत्तसंस्था)



युकी भाम्बरी व मायकेल व्हीनस

### जॅनिक सिनर पुढील फेरीत

प्रथम विश्वमानांकित इटलीच्या जॅनिक सिनरने आपली विजयी घोडदौड कायम राखत अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेच्या पुढील फेरीत प्रवेश केला. आता सोमवारी, सिनेरचा सामना उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळविण्यासाठी कझाकस्तानच्या २३ व्या क्रमांकाच्या अलेक्झांडर बुब्लिकशी होईल.जॅनिक सिनेरने शापोवालोव्हवर विजय संपादन केला. सिनरच्या ताज्या विजयामुळे त्याची हार्ड-कोर्टवरील अपराजित मालिका २४ सामन्यांपर्यंत वाढली, यात २०२४ मध्ये अमेरिकन ओपन व २०२४ आणि २०२५ मध्ये ऑस्ट्रेलियन ओपनमधील स्पर्धेचा समावेश आहे. जुलैमध्ये त्याने गवताच्या कोर्टवर विम्बल्डनमध्ये ट्रॉफी देखील जिंकली. सोमवारी, सिनरचा सामना क्वार्टर फायनलमध्ये स्थान मिळविण्यासाठी कझाकस्तानच्या २३ व्या क्रमांकाच्या अलेक्झांडर बुब्लिकशी होईल. साडेतीन तासांच्या सामन्यात बुब्लिकने अमेरिकेच्या १४ व्या क्रमांकाच्या टॉमी पॉलचा ७-६ (५), ६-७ (४), ६-३, ६-७ (५), ६-१ असा पराभव केला.





### व्हीनस विल्यम्स, लेला फर्नांडिस महिला दुहेरीच्या तिसऱ्या फेरीत

व्हीनस विल्यम्स आणि लेला फर्नांडिस यांनी उल्रिके एकेरी आणि एरी होझुमी या जोडीला ७-६ (१), ६-१ असे पराभूत करून अमेरिकन ओपनमध्ये महिला दुहेरीच्या तिसऱ्या फेरीत प्रवेश केला.४५ वर्षीय अमेरिकन व्हीनस आणि २२ वर्षीय कॅनेडियन लेला या दोघी या आठवड्यापर्यंत कधीही एकत्र खेळले नव्हत्या. त्यांना वाईल्ड-कार्डवर या स्पर्धेत प्रवेश मिळाला.

### दुखापतीमुळे पुरुष एकेरीचे तीन खेळाडू निवृत्त

अमेरिकन ओपनच्या पुरुष एकेरीच्या तिकडी खेळाडूंनी आपापल्या सामन्यांमधून निवृत्ती घेतली, त्यामुळे ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धेत दुखापतीमुळे मैदानाबाहेर पडणाऱ्यांची संख्या सात झाली आहे.

अमेरिकन बेन शेल्टनने डाव्या खांद्याच्या दुखापतीमुळे खेळणे सुरू ठेवू शकला. त्यानंतर फ्लेव्हियो कोबोली, डॅनियल अल्टमायर आणि कामिल मॅजक्रझाक तिसऱ्या फेरीत सामन्याच्या मध्यभागी दुखापतीमुळे सामन्यातून बाहेर पडले. सेबास्टियन कोर्डा आणि शांग जुनचेंगने पहिल्या फेरीत खेळ संपवला व पाचव्या मानांकित जॅक ड्रेपरने दुसऱ्या फेरीत खेळण्यापूर्वी माघार घेतली.

शेल्टनने निवृत्ती घेतल्यानंतर काही तासांतच ३८ वर्षीय नोवाक जोकोविचने कॅमेरून नोरीला हरवून पाठीच्या दुखापतीतून बाहेर पडला. १९९१ मध्ये जिमी कॉनर्स त्याच वयाचा असताना अमेरिकन ओपनच्या चौथ्या फेरीत पोहोचणारा सर्वात वयस्कर खेळाडू ठरला.

### खेळाडूंनी प्रशिक्षणाचा भार वाढवावा : सुमारीवाला

**नवी दिल्ली** : भारतीय ट्रॅक खेळाडूंना जागतिक स्तरावरील उच्चभ्रू खेळाडूंशी स्पर्धा करायची असेल तर आपल्या प्रशिक्षणाचा भार वाढवावा लागेल, असे भारतीय ॲथ्लेटिक्स महासंघाचे प्रवक्ते आदिल सुमारीवाला यांनी रविवारी सांगितले. त्यांनी येत्या जागतिक ॲथ्लेटिक्स स्पर्धेसाठी १९ सदस्यीय पथकाची घोषणा केली. जागतिक अजिंक्यपद स्पर्धा १३ ते २१ सप्टेंबर दरम्यान टोकियो येथे होणार आहे. भारतीय संघातील १० खेळाडू ट्रॅक इव्हेंटमध्ये भाग घेतील तर उर्वरित खेळाडू मैदानी स्पर्धांमध्ये भाग घेतील, ज्यात पुरुषांचा भालाफेक गतविजेता नीरज चोप्राचा समावेश आहे.

अमेरिकन प्रशिक्षक स्कॉट सिमन्स देशाच्या लांब पल्ल्याच्या कार्यक्रमाचे पर्यवेक्षण करत आहेत आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली गुलवीर सिंग यांनी ५००० मीटर आणि १०,००० मीटर दोन्हीमध्ये राष्ट्रीय विक्रमांसह प्रचंड सुधारणा दाखवली आहे. आपले खेळाडू आठवड्यातून १००-१२० किमीचा भार उचलत होते.



## मानांकित खेळाडूंची विजयी सलामी

### स्व. शंकर शिवप्पा मस्कले स्मृती चषक जिल्हा बुद्धिबळ स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

स्व. शंकर शिवप्पा मस्कले स्मृती चषक'' जिल्हा बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या गटात अग्रमानांकित आंतरराष्ट्रीय खेळाडू मानस गायकवाड, विशाल पटवर्धन, राष्ट्रीय खेळाडू चंद्रशेखर बसरगीकर, बार्शीचा शंकर साळुंके, स्वप्नील हदगळ, अकलूजचा उन्मेष राऊत, दत्तात्रय गोरे, आंतरराष्ट्रीय खेळाडू रिद्धी उपासे, स्वराली हातवळणे, सृष्टी गायकवाड, सान्वी गोरे, सृष्टी मुसळे या आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडूंनी विजयी सलामी दिली. सात रस्ता येथील इरण्णा उपलप मंगल कार्यालय येथे सुरु झालेल्या या स्पर्धेत १६ वर्षाखालील गटात मानांकित आदिनाथ हावळे, सानिध्य जमादार, रणवीर पवार, १२ वर्षाखालील गटात विवान दासरी, श्रेयस इंगळे, विवान कोंगारी, आयुष गायकवाड तसेच ८ वर्षाखालील गटात नमन रंगरेज, नियान कंदिकटला यांनी आकर्षक विजय मिळवीले. तसेच नागेश राजमाने, पृथ्वीराज मुकाने, स्वराली जाधव या उदयोन्मुख खेळाडूंनी चांगली काम गिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ग्रँडमास्टर चेस अकॅडमी व सोलापूर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने ''स्व. शंकर शिवप्पा मस्कले स्मृती चषक'' यांच्या स्मरणार्थ आयोजित केलेल्या खुल्या, १६, १२ व ८ वर्षाखालील गटात जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत ३४ आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडूंसह सोलापुर शहरासह करमाळा, पंढरपुर, द. सोलापूर, माळशिरस, मंगळवेढा, बार्शी, अक्कलकोट, माढा आदी तालुक्यातील २५० खेळाडूंनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उद्घाटन प्रायोजीका श्रीमती कस्तुराबाई शंकर मस्कले व ग्रँडमास्टर चेस अकॅडमीचे विद्या मस्कले यांच्यातील प्रदर्शनीय लढतीने करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड, ग्रँडमास्टर चेस अकॅडमीचे सचिव गणेश मस्कले, आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अतुल कुलकर्णी, विद्यापीठ खेळाडू संतोष पाटील, सरस्वती झंपले, शकुंतला माने, दिगंबर मस्के, महादेव भोसले, उज्वला नाईकवाडे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय पंच संतोष पाटील तर प्रास्ताविक सुमुख गायकवाड यांनी केले. स्पर्धेत प्रमुख पंच म्हणून वरिष्ठ राष्ट्रीय पंच उदय वगरे तर सहाय्यक वरिष्ठ राष्ट्रीय पंच रोहिणी तुम्मा, प्रज्वल कोरे, पृथ्वीराज देशमुख, भरत वडीशेरला, गौरव माने, अभिषेक राठोड आदी काम पाहत आहेत.

# रोख बक्षिस हे खेळाडूंच्या कष्टाला दिलेली दाद : उपमुख्यमंत्री अजित पवार

### पदकविजेत्यांच्या गौरवाने पुण्यात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा, मिशन लक्ष्यवेध योजनेस प्रारंभ

### शिवछत्रपती क्रीडा संकुलात देशातील पहिले ऑलिम्पिक संग्रहालय निर्माण होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

सलग दुसऱ्यांदा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदकांचे व्दिशतक झळकावून महाराष्ट्राच्या खेळाडूंनी अभिमानास्पद कामगिरी केली आहे. आंतरराष्ट्रीयसह राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील ३३१ पदकविजेत्यांना रोख पारितोषिकाने गौरवित करून पुण्यात जल्लोषात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. खेलो इंडियासह आंतरराष्ट्रीय खेळाडूंसाठी ५८ कोटीचा अतिरिक्त निधी मंजुर करून रोख बक्षिसे ही खेळाडूंना कष्टाला दिलेली दाद असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.



पुण्यातील म्हाळुंगे बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलातील वेटलिफ्टिंग सभागृहात महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग आयोजित राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांच्या हस्ते रोख पारितोषिकाने १३ आंतरराष्ट्रीय, ३१८ राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी मिशन लक्ष्यवेध हाय परफॉर्मन्स सेंटरच्या लोगोचे अनावरण पवार व क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ऑलिम्पिक पदक विजेता स्वप्नील कुसाळे, आमदार बाबाजी काळे, क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले, सहसंचालक सुधीर मोरे, नामदेव शिरगांवकर, संजय शेटे आदी मान्यवर उपस्थित होते.

खेलो इंडियासह इतर खेळाडूंच्या बक्षीसांसाठी ५८ कोटी रुपयांची अतिरिक्त निधी देण्याची क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांची मागणीही मंजूर करताना पवार पुढे म्हणाले, बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात देशातील पहिले ऑलिम्पिक संग्रहालय उभा करण्याचा निर्णय घेतला आहे. खेळाडूंना संस्कार देणारे केंद्र हे संग्रहालय असेल. आरोग्यदायी महाराष्ट्र, क्रीडामय महाराष्ट्र हे आमचे ध्येय आहे असे सांगून असे क्रीडामंत्री कोकाटे म्हणाले, महाराष्ट्राचे राज्याचे नवे क्रीडा धारेण लवकरच विकसीत करणार आहे. खेळाडुंचा न्याय देणारे नवे क्रीडाधोरण असेल. यातून आंतरराष्ट्रीय,ऑ.लिम्पिकमध्ये महाराष्ट्रचे खेळाडू अधिकाधिक पदके जिंकतील.

उत्तराखंड येथे फेबुवारीत झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्रने गौरवशाली कामगिरी केली होती. ५५ सुवर्ण, ७० रौप्य व ७६ कांस्य अशी २०१ पदके पटकावून, सहभागी राज्यांमध्ये प्रथम क्रमांक संपादन केला. या स्पर्धेतील ३१८ पदकविजेत्या खेळाडूंचा गौरविले. सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकविजेत्यांना अनुकमे रू. ७, ५, ३ लाख रोख बक्षिस देण्यात आली राज्याच्या क्रीडा धोरण-२०१२ नुसार,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू व मार्गदर्शकांना रु.२८.७० कोटी रकमेची रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात करण्यात आला. वार्षिक रु.१६० कोटी इतका खर्च असलेल्या मिशन लक्ष्यवेध या महत्वाकांक्षी योजनेचा शुभारंभही आज करण्यात आला. पहिल्या टप्प्यातील सहा क्रीडा प्रकारांच्या प्रशिक्षण योजनेचा शुभांरभ शुक्रवारी होईल. यामध्ये अॅथलेटिक्स, हॉकी, कुस्ती, वेटलिफ्टिंग, रोईंग व लॉन टेनिस खेळाचा समावेश करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले. सहसंचालक सुधीर मोरे यांनी आभार मानले.

## मेहता प्रशालेच्या पवारला आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

अहिल्यानगर येथे नुकत्याच संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय गुणांकन बुद्धिबळ स्पर्धेत कै. विलासचंद्र गोपीचंद मेहता प्रशालेत शिकत असलेल्या प्रथमेश पवार याने उल्लेखनीय कामगीरी करत फिडेच्या नुकत्याच जाहीर झालेल्या यादीनुसार क्लासिकल प्रकारात इलो १४०९ आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त केले आहे.



या स्पर्धेत महाराष्ट्रासह गुजरात,तामिळनाडू, पश्चिम बंगाल, कर्नाटक, तेलंगणा, उत्तर प्रदेश आदी राज्यातील ४४३ खेळाडू सहभागी झाले होते. सोलापुर चेस अकॅडमीच्या प्रथमेशने स्पर्धेत आकर्षक खेळ करत महाराष्ट्राच्या आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त राकेश अक्षत (इलो १४६१) याला खळबळजनकरित्या पराभव केला तर मानांकित वरद जोशी सोबत (इलो १४४२) बरोबरी साधत आंतरराष्ट्रीय गुणांकन मिळविण्यासाठी असणारा निकष पूर्ण करीत आंतराष्ट्रीय गुणांकन प्राप्त केले. प्रथमेशला आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त उदय वगरे तसेच आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक सुमुख गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभत आहे. प्रथमेशचे आईवडील उज्वला व सुनील पवार, मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, वर्गशिक्षिका धनश्री विधाते यांचे प्रोत्साहन मिळत आहे.

प्रथमेशला संपादन केलेल्या यशाबद्दल सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील, सोलापुर चेस अकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर, उद्योजक रवींद्र जयवंत, अतुल कुलकर्णी, नितीन काटकर, गोपाल राठोड, संतोष पाटील, प्रशांत गांगजी, दिपाली पुजारी, डॉ. अनिल कांबळे, गणेश मस्कले, प्रशांत पिसे, निहार कुलकर्णी, विजय पंगुडवाले, जयश्री कोंडा, रोहिणी गड्डुम, नागेश पाटील, रोहित पवार, श्रेयांस शहा आदींनी अभिनंदन केले.





## कंदलगावच्या इंडियन पब्लिक स्कूल, राऊंड टेबल जीवनज्योत प्रशालेस सर्वसाधारण विजेतेपद

### दक्षिण सोलापूर तालुका शालेय बुद्धिबळ स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर तालुका शालेय बुद्धिबळ स्पर्धेत मुलांमध्ये इंडियन पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज कंदलगाव संघाला कै. महादेव सिद्राम धसाडे तर मुलींमध्ये राऊंड टेबल जीवनज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला कंदलगाव संघाला कै. सुगलाबाई महादेव धसाडे यांच्या स्मरणार्थ सर्वसाधारण विजेतेपद चषक देऊन गौरविण्यात आले.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य अंतर्गत सोलापूर जिल्हा क्रीडा परिषद व दक्षिण सोलापूर तालुका पंचायत समिति यांच्या संयुक्त विद्यमाने हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून या स्पर्धेचे आयोजन राऊंड टेबल जीवन ज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला कंदलगाव येथे दक्षिण सोलापूर तालुका क्रीडा शिक्षक संघटनेच्या सहकार्याने केले होते. सुरुवातीला सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी दि. शी. कमळे गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन उद्योजक धनेश कडते, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष संजय कोले, संस्थेचे सहसचिव सुबोध कोळी, प्राचार्य पी.एम. कमळे, शिक्षक भारती आश्रम शाळा विभाग संघटनेचे जिल्हाध्यक्ष विकास दसाडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेच्या संचालिका राधिका पाटील, पर्यवेक्षक रवींद्र यलगोंडे, दक्षिण सोलापूर तालुका क्रीडा सचिव शिरीष गुरव, गुरबसप्पा आचलेरे, सुखदेव गुरव, संतोष कस्तुरे, संतोष भोसले आदी उपस्थित होते. या स्पर्धेत विविध शाळांतील ३३८ खेळाडूंनी आपला सहभाग नोंदविला आहे. स्पर्धेत पंच म्हणून बसवराज कोळी, संतोष अंकलगी, महेश स्वामी, ओंकार कोले, सौरभ कोले, अझर शेख यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय पंच क्रीडाशिक्षक संतोष पाटील तर सूत्रसंचालन योगेश शिंदे यांनी केले.

**अंतिम निकाल (प्रथम पाच)**

**१४ वर्षे वयोगट मुले :** धनंजय खसगी, कार्तिक शिंदे, असीम शेख, मल्लिकार्जुन म्हेत्रे,अतिफ मकानदार. मुली : शिवानी तेली, लक्ष्मी अष्टगी, साक्षी भैरमडगे, प्रतीक्षा चाबुकस्वार, प्रीती बंडगर.

**१७ वर्षे वयोगट मुले :** पृथ्वीराज मुकाने, नागेश राजमाने, गंगाराम कुंभार, अष्टविनायक हसबे, सिद्धनाथ माने. मुली : सुकन्या बिराजदार, संजीवनी चव्हाण, विद्यालक्ष्मी म्हेत्रे, विजयालक्ष्मी म्हेत्रे, सना शेख.

**१९ वर्षे वयोगट मुले :** समर्थ कोळी, प्रथमेश रेवतगाव, सतीश जोडमोटे, संकेत जोकारे, युवराज साळुंखे. मुली : मोनाली गायकवाड, ज्योती जोडमोटे, भक्ती नानाचे, अफसाना शेख, दीपिका राठोड,.



## स्वामी विवेकानंद प्रशालेत पारंपारिक खेळाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

नॅब संचलित एमआयडीसी येथील स्वामी विवेकानंद प्रशालेत राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

तीन दिवसाच्या या कार्यक्रमांमध्ये विविध पारंपारिक व कबड्डी, खो-खो, हॉलीबॉल या खेळाचे आयोजन केले होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी मुख्याध्यापक डॉ. हणमंत नारायणकर, क्रीडाशिक्षक सुभाष माने उपस्थित होते. प्रारंभी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. तीन दिवशीय खेळामध्ये स्पर्धेमध्ये पारंपारिक खेळ जसे जिबळ्या, लंगडी, गोटया, भवरा, आट्यापाट्या, लगोरी या खेळांचा समावेश केलेला आहे. तसेच कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल या क्रीडा स्पर्धांचा देखील समावेश होता. याप्रसंगी सहशिक्षक मच्छिंद्र सपताळे, संजय राठोड, गणपती कोळी, मानसी निलंगीकर, उज्वला हिंगमिरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खंडू शिंदे यांनी केले.



## श्री धर्मणा सादुल प्रशालेत राष्ट्रीय क्रीडादिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

नीलम नगर भागातील धर्मांणा सादुल प्रशालेत हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिनानिमित्त राष्ट्रीय क्रीडादिन सेवासदन प्रशालेचे उपक्रमशील क्रीडाशिक्षक व समाजसेवक ज्ञानेश्वर काळे, संस्थेचे उपाध्यक्ष आसिफ पठाण मुख्याध्यापिका आफरीन सय्यद यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. यावेळी शांतेश कापसे व राज अहमद शेख उपस्थित होते.

हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात झाली. श्री. काळे यांनी मनोगतातून विद्यार्थ्यांना २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन का साजरा केला जातो याचे मार्गदर्शन केले. ते म्हणाले, आपल्या शरीराकडे व आहाराकडे लक्ष देणे गरजेचे आहे. परिस्थितीवर मात करून कोणतीही गोष्ट साध्य करता येते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पटेल यांनी केले. श्री. सपाटे यांनी आभार मांनलें.

## हनुमंत जाधव यांचे निधन



**मोडनिंब, दि. ३१ ऑगस्ट-**

अरण (ता.माढा) येथील हरीभक्त परायण विणेकरी हनुमंत तुकाराम जाधव ( वय७६)यांचे अल्प आजाराने निधन झाले त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. ते माजी प्राचार्य एल.टी. जाधव यांचे ते बंधू होत.

## लॉन टेनिस स्पर्धेने सोलापूर शहर शालेय क्रीडा स्पर्धेस सुरुवात

### तीन खेळांच्या स्पर्धा पुढे ढकलल्या

### महापालिकेच्या क्रीडा विभागाची माहिती

**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

लॉन टेनिस स्पर्धेने यंदाच्या मोसमातील शालेय शहर पातळीवरील क्रीडा स्पर्धेस सुरुवात होईल.

या स्पर्धेस एक सप्टेंबरपासूनच सुरुवात होणार होती. त्याप्रमाणे स्पर्धेचे वेळापत्रक सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी जाहीर केले होते. ४६ खेळांच्या स्पर्धांच्या तारखा त्यांनी जाहीर केल्या होत्या. परंतु एक तारखेच्या किक बॉक्सिंग व शूटिंग बॉल व दोन तारखेच्या स्क्वॅश या तीन खेळांचे स्पर्धा पुढे ढकलण्यात आल्या असल्याचे महापालिकेच्या क्रीडा विभागाने सांगितले. या स्पर्धेसाठी संबंधित जिल्हा संघटना आणि क्रीडा शिक्षकांचे सहकार्य घेतले जात आहे.

**स्पर्धांचे वेळापत्रक असे**

**खेळ प्रकार, स्पर्धा कालावधी व स्पर्धेचे स्थळ या क्रमाने : सप्टेंबर :** लॉन टेनिस (२ व ३, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका), टेबलटेनिस (३, मुळे पॅव्हेलियन हॉल, पार्क चौक), तलवारबाजी (३ ते ५, राजीव गांधी इन्डोअर स्टेडियम, सात रस्ता), तायक्वाँदो ( ४ ते ५), रोलर स्केटिंग/रोलर हॉकी ( ७, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका), कराटे (८ व ९, राजीव गांधी इन्डोअर स्टेडियम), वुशु (८ व ९, बी.पी.एड. कॉलेज, नेहरु नगर), डॉजबॉल (८ व ९, राजीव गांधी इन्डोअर स्टेडियम, सात रस्ता), बुध्दीबळ (८ ते १०, पार्क जिमखाना हॉल), नेहरु हॉकी (८ ते १०, शासकीय मैदान, नेहरु नगर), मल्लखांब (१० व ११, लोकमंगल प्रशाला, अवंती नगर), बॅडमिंटन (१० व ११, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका), जलतरण, वॉटरपोलो, डायव्हिंग (१० ते ११) श्री. मार्कंडेय जलतरण तलाव, अशोक चौक), बॉक्सिंग (११ व १२ पार्क जिमखाना हॉल), टेनिक्काईट (११ व १२, राजीव गांधी इन्डोअर स्टेडियम, सात रस्ता), मैदानी (११ ते १३, एस आर पी एफ कॅम्प मैदान, सोरेगाव, विजापूर रोड), बॉस्केटबॉल ( १२ ते १४, राजीव गांधी इन्डोअर स्टेडियम, सात रस्ता), फुटबॉल (१३ ते १८, फुटबॉल मैदान, वालचंद इंजिनिअररिंग कॉलेज, अक्कलकोट रोड), योगासन ( १३ व १४, पार्क जिमखाना हॉल), जिम्नॅस्टीक (१३ व १४, बी.पी.एड. कॉलेज, नेहरु नगर), व्हॉलीबॉल (१४ ते १६, हरिभाई देवकरण प्रशाला), कुस्ती (१५ व १६, श्रीकृष्ण कुस्ती केंद्र, डोणगाव रोड), क्रिकेट (१५ ते दि.१८, हरीभाई देवकरण प्रशाला), नेट बॉल (१७ व १९, रॉजर्स इंग्लिश मिडीयम स्कुल), बॉल बॅडमिंटन (१७ व १८, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका), मॉडर्न पेंटॅथलॉन (१७, स्वा. वीर सावरकर जलतरण तलाव, पार्क चौक), ज्युदो (१८ व १९, छत्रपती शिवाजी ज्युनिअर नाईट कॉलेज, सरस्वती चौक), खो-खो (१९ ते २१, जय जवान जय किसान, मुलांची सैनिकी शाळा, नेहरु नगर), शूटिंग (२० व २१, आय.एम.एस. स्कुल, जुळे सोलापूर), बेसबॉल (२२ ते २४, मल्लीकार्जुन हायस्कुल, हत्तुरे वस्ती), कॅरम (२३ ते २५, पार्क जिमखाना हॉल), रग्बी (२३ व २४, ग्रामीण पोलिस मुख्यालय मैदान, अॅच्युअर्स हॉलच्यासमोर), कबड्डी (२४ ते २६, राजीव गांधी इन्डोअर स्टेडियम), सॉफ्ट टेनिस(२५ व २६, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका), रोल बॉल (२५, राजीव गांधी इन्डोअर स्टेडियम, सात रस्ता), आट्यापाट्या (२६ ते २८, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका), हँडबॉल (२९ ते दि.१, राजीव गांधी इन्डोअर स्टेडियम, सात रस्ता), सेपक टकरा (२९ ते १, जय जवान जय किसान, मुलांची सैनिकी शाळा, नेहरु नगर), सायकलिंग रोडरेस /ट्रॅक (३०, प्रताप नगर तांडा रोड पोतदार शाळा शेजारी विजापूर रोड).

**ऑक्टोंबर :** (धनुर्विद्या) आर्चरी (२, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका), शालेय हॉकी ( २ ते ४, शासकीय मैदान, नेहरु नगर), सॉफ्टबॉल (७ ते ९, मल्लीकार्जुन हायस्कुल, हत्तुरे वस्ती) वेटलिफ्टिंग (१६ व १७, छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज, मुरारजी पेठ).

**नंतर जाहीर करण्यात येणाऱ्या स्पर्धा :** किक बॉक्सिंग ( पार्क जिमखाना हॉल, चार पुतळा पाठमागे ) शुटिंग बॉल ( सुभाष उद्यान, गार्डन, जिजामाता हॉस्पीटल शेजारी, स्क्वॅश (इंदिरा गांधी स्टेडियम, पार्क चौक).



## राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त १३ क्रीडा शिक्षकांचा सत्कार

### ड्रीम फाउंडेशन व समर्थ करिअर अकॅडमीचा उपक्रम

**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस व राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून ड्रीम फाउंडेशन व समर्थ करिअर अकॅडमीच्या वतीने १३ आदर्श क्रीडा शिक्षक व प्रशिक्षकाचा पुरस्कार वितरण सोहळा समर्थ करिअर अकॅडमी कुबेर चेंबर्स येथे संपन्न झाला.

काडादी प्रशालेचे मुख्याध्यापक अनिल पाटील द.का.आसावाचे माजी मुख्याध्यापक जितेंद्र पवार, सेंटर अकॅडमीचे शेखर वाघमारे, ड्रीम फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष काशिनाथ भतगुणगी, समर्थ अकॅडमीचे संचालक रवि राठोड, संगमेश्वर महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, सोलापूर शहर शारीरिक शिक्षण क्रीडा शिक्षक महासंघाचे शहराध्यक्ष सुहास छंचुरे, क्रीडा शिक्षक सुभाष उपासे यांच्या उपस्थितीत १३ क्रीडा शिक्षकांना ट्राफी, प्रमाणपत्र, शाल, बुके, फेटा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशराज यांनी केले.

**या क्रीडा शिक्षक व प्रशिक्षकाचा झाला सन्मान**

विरेश अंगडी (स.हि.ने प्रशाला), प्रा.विक्रांत विभुते (संगमेश्वर कॉलेज), संजय पंडित दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला ), प्रा.नावेद मुन्शी(एम.ए पानगल उर्दू हायस्कूल व जुनिअरकॉलेज), प्रशांत सूर्यवंशी (लिटिल फ्लावर इंग्लिश मीडियम स्कूल ), शिवानंद सुतार (गांधी नाथा रंगजी मराठी मिडीयम विद्यालय), रोहन घाडगे (पी.एस. इंग्लिश मिडीयम प्रायमरी स्कूल), नेताजी पवार (भारती विद्यापीठ हायस्कूल), अब्दुल्ला चौधरी (सनराईज इंग्लिश मेडीयम स्कूल), रविंद्र चव्हाण (आयडियल इंग्लिश मीडियम स्कूल), राहुल मुनाळे.(सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम स्कूल), प्रमोद कुनगुलवार (द.का. आसावा), बबलू शेख (खो- खो, क्रीडा मार्गदर्शक).

# जरांगे-पाटलांना पाठिंबा देण्यासाठी मेडशिंगी गाव कडकडीत बंद

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३१ ऑगस्ट-**

मराठा समाज आरक्षण संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे-पाटील यांच्या मुंबई येथील आझाद मैदानावरील आंदोलनास व उपोषणास पाठिंबा देण्यासाठी सांगोला तालुक्यातील मेडशिंगी गावाने रविवार दि.३१ ऑगस्ट रोजी कडकडीत बंद पाळला. गावातील सर्व दुकाने, बाजारपेठा बंद ठेवून या आंदोलनास पाठिंबा दिला आहे. मेडशिंगी येथील सकल मराठा समाज व ग्रामस्थ यांनी गाव बंद ठेवून आरक्षणास पाठिंबा दर्शविला आहे.



मराठा आरक्षणासाठी मुंबई येथे सुरू असलेल्या मराठा बांधवांच्या लढ्याला शासनाने सकारात्मक दृष्टीने पाहावे. सरकारने मराठा समाजाचा फार काळ अंत पाहू नये अशी भूमिका मेडशिंगी गावाने यावेळी व्यक्त केली.



## आप्पा गणपती देखावा...

**सोलापूर : शहरातील पूर्व भाग परिसरातील आप्पा गणपती प्रतिष्ठान कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिराचा देखावा साकारला आहे. १२० बाय १८ फूट आकारात २५ फूट उंचीचा हा देखावा आहे. या मंदिरामध्ये गर्भगृह, दीपस्तंभ, सभागृह मंदिरावर तीन शिखरे आहेत. या मंदिराचे पूर्ण रेखीव काम करण्यात आले आहे. हा पूर्ण देखाव्याचा सेट फोम सीटमध्ये बनवण्यात आला आहे. हे काम पाच महिन्यापासून सुरू होते. भालचंद्र मादास, संतोष सोमा, अंबादास म्याकल यांनी हे काम केले आहे. संस्थापक अध्यक्ष मेघनाथ येमूल यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम झाले आहे. (छायाचित्र : केवल तिवारी)**

## महत्वाचे...



**सोलापूर : वळसंगच्या स्वामी समर्थ सूत गिरणीचे चेअरमन राजशेखर शिवदारे यांच्या निवासस्थानी रविवारी गौरीचे आगमन झाले.**

### ज्येष्ठा गौरी आवाहन निमित्त श्री विठ्ठल रूक्मिणीमातेस अलंकार परिधान

**पंढरपूर, दि.३१ ऑगस्ट-**

ज्येष्ठा गौरी आवाहन निमित्त श्री विठ्ठलास सोने मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेट्या जोड, हि-याचा कंगनजोड, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी, मारवाडी पेट्याचा मोत्याचा हार, शिरपेच, मत्स्य जोड, तोडे जोड, मोहनमाळ, मोहरांची माळ, तुळशीची माळ, नाम निळाचा तसेच श्री रूक्मिणीमातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी अलंकार परिधान करण्यात आले होते. याशिवाय, आज राधाष्टमी (श्री राधिक मातेचा जन्म दिवस) असल्याने मंदिरातील श्री राधिकामातेस पांढरा पोशाख व सोन्या मोत्याचे अलंकार परिधान करण्यात आले व गुलाल टाकून जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यामध्ये सोन्याचा नक्षी टोप, मोत्याचा कंठा, खड्याचा पाटल्या जोड, मोत्याचे मंगळसुत्र, बाजीराव गरसोळी इत्यादी अलंकाराचा समावेश आहे. यावेळी मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प.प्रकाश जवंजाळ व विभाग प्रमुख संजय कोकीळ उपस्थित होते. तसेच रात्री ८.०० वाजता श्री राधिकामाते समोर भजन केले जाणार आहे.

# अकलूजमध्ये गौराईचे आगमन; बाजारपेठेत गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३१ ऑगस्ट-**

समृद्धी आणि मांगल्याचे प्रतीक असलेल्या महालक्ष्मी अर्थात ज्येष्ठा गौरी चे आगमन उत्साहात करण्यात आले शंकर नगर येथील कुंभार कुटुंबीयांच्या वतीने ज्येष्ठा गौरीचे आगमन पारंपारिक पद्धतीने करण्यात आले. सायंकाळच्या दरम्यान तुळशी वृंदावनपासून घरामध्ये ज्येष्ठा गौरीचे आगमन करण्यात आले कुंभार कुटुंबामध्ये पारंपारिक पूर्वापार चालत आलेल्या महालक्ष्मीच्या मूर्ती तसेच मातीच्या महालक्ष्मीचे आगमन कुंकवाचे ठसे उमटवत व लहान मुलांनी पितळेचे वाद्य वाजवत घरात आगमन केले कुटुंबातील प्रमुख शामा कुंभार, अपूर्वा कुंभार, दिपाली कुंभार, शितल कुंभार, साक्षी कुंभार, जिजा कुंभार, सिद्धांत कुंभार यांनी वाजत गाजत महालक्ष्मी व गणपतीच्या जय घोषणा देत घरामध्ये आगमन केले नंतर पूजन आरती होऊन प्रसाद वाटप करण्यात आला.



अकलूज बाजारपेठेत गौराईच्या सणानिमित्त विविध मिठाई, फळे व फुलांचा बाजार सजला होता. भाजी मंडई, विजय चौक, जुने पोलीस स्टेशन येथे विक्रेत्यांनी आपले दुकाने लावले होते सणामुळे फुलांचे बाजार तेजीत होते ५० ते १०० रुपयापर्यंत किलो झेंडू तर फुलांचे हार १०० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंत होते मोगऱ्याचे गजरे चारशे रुपये डझन सफरचंद व फळे १०० ते १५० किलो रुपये किलो पायनापल व मोसंबी मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी आली होती पूजेसाठी लागणारे केरसुनी (लक्ष्मी )शंभर ते सव्वाशेर पर्यंत होत्या महागाईच्या जमान्यात घरी फराळाचे साहित्य करणे परवडत नसल्याने अनेक कुटुंबांनी तयार मिठाई घेतली लाडू, शेव, बालुशाही, बेसन लाडू बुंदीचे लाडू अंदाजे दोनशे ते अडीचशे रुपये किलो प्रमाणे विक्री होत होती. सजावटीच्या साहित्याने बाजारपेठ भरून गेलेली दिसत होती.

## राष्ट्रपती शौर्य पदक जाहीर झाल्याबद्दल संतोष इंगोले यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३१ ऑगस्ट -**

सांगोला तालुक्यातील बामणी गावचे सुपुत्र आणि मुंबईच्या गोरेगाव अग्निशमन केंद्रात वरिष्ठ केंद्र अधिकारी म्हणून कार्यरत असलेले संतोष रावसाहेब इंगोले यांना अग्नीविमोचन सेवेत केलेल्या शौर्यपूर्ण, अतुलनीय आणि धाडसी कामगिरीबद्दल भारताचे राष्ट्रपती यांच्या हस्ते राष्ट्रपती शौर्य पदक जाहीर झाले आहे. याबद्दल माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांनी संतोष इंगोले यांचा सत्कार केला. सत्कार प्रसंगी बोलताना दिपकआबा साळुंखे पाटील म्हणाले, संतोष इंगोले यांनी संकटाच्या प्रसंगी दाखवलेले धाडस आणि सेवाभाव हे सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. अशा शूरवीर मुलामुळे सांगोला तालुक्याचा कर्तृत्वाचा ठसा राज्यभर उमटत आहे.

## बचेरीत सोलरच्या प्लेटांवर चोरट्यांचा डल्ला; लाखोंचे नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ३१ ऑगस्ट-**

बचेरी (ता. माळशिरस) येथील दीपक श्रीमंत गोरड यांच्या गट नंबर २४६ या दीड एकर क्षेत्रामध्ये शेतीला पाणी देण्यासाठी विहिरीवर बसवलेला सोलरपंपच्या प्लेटा अज्ञात चोरट्याने काढून नेल्या असून यामुळे एक लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.याबाबत अज्ञात चोरट्यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शेतीपंपासाठी दिवसा वीजपुरवठा व्हावा या उद्देशाने महाराष्ट्र सरकारने व महावितरण कंपनीने शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी सोलर कनेक्शन दिली होती यामुळे शेतकऱ्यांना शेतीला पाणी देण्यासाठी रात्रभर न जागे राहता दिवसा पाणी देता येत होते,परंतु सोलरच्या प्लेटा चोरीला जात असल्याने शेतकऱ्यांच्या संकटात भर पडत आहे.

दीपक गोरड यांच्या विहिरीवर सिद्धकला एनर्जी सिस्टीम या कंपनीमार्फत सोलर पंप बसवलेला होता परंतु अज्ञात चोरट्याने सोलरच्या ९० हजार रुपये किमतीच्या ९ प्लेटा चोरून नेल्याने मोठे नुकसान झाले आहे अशा चोरट्यांवर कडक कारवाई व्हावी अशी मागणी येथील शेतकऱ्यांनी केली आहे.

## भगवंत तरुण गणेश मंडळातर्फे सरकारी योजनांच्या माहितीच्या देखाव्याचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ ऑगस्ट-**

गेले १२ वर्ष भगवंत तरुण गणेश मंडळ, भगवंत चौक, भगवंत मंदीर पश्चिम द्वार यांच्यावतीने सामाजिक बांधिलकी जपत आणि गणेशोत्सवाचा मूळ हेतू सामाजिक समरसता आणि सामाजिक एकता अबाधित ठेवण्यासाठी अविरत प्रयत्न करत आहे. यालाच अनुसरुन यावर्षी सरकारी योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी देखावा करण्यात आला आहे.

या देखाव्यामध्ये व्यावसायिक, आरोग्यविषयक, शैक्षणिक आणि विविध महामंडळे याविषयी माहिती फलक लावण्यात आले आहेत. याचे उदघाटन शनिवारी रात्री माजी नगरसेवक विजयनाना राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आरती माहेश्वरी समाज बांधवांच्या हस्ते करण्यात आली.




यावेळी मंडळाचे मार्गदर्शक ऋषिकेश कुलकर्णी, प्रा. तात्यासाहेब घावटे, सूर्यकांत देशमुख, मनोज बडवे, अभिषेक कुलकर्णी, उदय कुलकर्णी, सुशील बडवे मंडळाचे अध्यक्ष सार्थक डुमने, उपाध्यक्ष कार्तिक गुरव, केदार भोसले, अस्मित कुलकर्णी हे मंडळाचे कार्यकर्ते तसेच यावेळी आदित्य बागडे, विनीत पाथरुडकर,तेजस जैन, सुकृत जोशी, अथर्व देशमुख,अथर्व उपळाईकर, रुद्र मठपती, माधव हिंगमिरे, समर्थ उपळाईकर, राकेश बडवे, राघवेंद्र जोशी, श्रीतेज बडवे, प्रणव बडवे, आर्यन गांधले, प्रणव भालेराव, राघव पाटील आदी उपस्थित होते.

# पाच वर्षे ग्रामपंचायत कर थकविणाऱ्यांना निवडणूक लढण्यास निर्बंध आणू : पालकमंत्री गोरे

### मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. ३१ ऑगस्ट -**

गावे समृध्द आणि गावातील लोकांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी तसेच शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी ग्रामविकास विभागाच्या वतीने आता 'मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानात लोकांनी सहभागी व्हावे. ग्रामपंचायतीचा थकीत कर एकरकमी भरल्यास त्यांना थेट ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. तर सतत पाच वर्षे कर थकविणार्यांना निवडणूक लढविणार्या बंदी आणणार असल्याची ग्वाही ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी केले. ग्रामविकास विभागाच्या वतीने संपूर्ण राज्यात मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान राबविण्यात येणार असून, त्यासाठी रविवारी हुतात्मा स्मृती मंदिरात आयोजित कार्यशाळेत मंत्री गोरे बोलत होते.



### प्रत्येक गावाला नोडल अधिकारी

मुख्यमंत्री ग्रामसमृध्द पंचायतराज अभियानात सहभागी असलेल्या गावांमध्ये वेळेत कामे व्हावीत तसेच प्रशासकीय पातळीवर त्यांना अडचणी येऊ नयेत यासाठी प्रत्येक गावाला एक नोडल अधिकारी नेमण्यात येईल तसेच गावातील मूलभूत कामांसाठी आणि अभियानात उत्कृष्ट काम करीत असलेल्या गावांना आमदारांच्या शिफारसीशिवाय निधी देऊ, असे आश्वासनही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले .

### विजेत्याचा पंतप्रधानांच्या हस्ते गौरव

अभियानामध्ये सहभागी ग्रामपंचायतीला कोट्यवधीची बक्षिसे मिळणार आहेत. केवळ बक्षिसासाठी नाही तर गावच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणाऱ्या आणि विजेत्या ३ ग्रामपंचायतीच्या सरपंचांचा थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सन्मान करु, असे आश्वासन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले आहे.

यावेळी यशदाचे उप महासंचालक मल्लिनाथ कलशेट्टी, आमदार सुभाष देशमुख, आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागाचे प्रकल्प संचालक अमोल जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ, शिक्षणाधिकारी सचिन जगताप, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, समाज कल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे, पुणे जिल्हा परिषदेचे माजी सभापती शरद गुट्टे आदी उपस्थित होते. या प्रसंगी जिल्हाधिकारी आशिर्वाद यांचा आषाढी यात्रेतील उत्कृष्ट कामाबद्दल सन्मान करण्यात आला. पहिल्या टप्प्यात या अभियानात राज्यातील ६ हजार ५०० गावे सहभागी होतील. त्यामध्ये १९२० गावांना बक्षीस मिळविण्याची संधी आहे. केवळ बक्षिसासाठी ही योजना नाही, तर गावे समृध्द करण्याचे अभियान आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






## महत्वाचे...

### पैशासाठी विवाहितेचा छळ; पतीसह दोघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

पैशासाठी पत्नीचा छळ करणाऱ्या तसेच घटस्फोटांच्या कागदावर सही घेऊन कधीही रद्द न होणारे व्यवसायाचे कुलमुखत्यार रजिस्टर केल्याप्रकरणी पतीसह दोघांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी नागमणी चंद्रशेखर बेत राहणार पुंजाल क्रीडांगणासमोर घर नंबर ३०, ५ भद्रावती पेठ सोलापूर या विवाहितेच्या फिर्यादीवरून पती चंद्रशेखर राहणार सपना अपार्टमेंट होडगी रोड सोलापूर आणि आरती वीरेंद्र बंडी राहणार पुंजाल क्रीडांगण समोर सोलापूर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नागमणी बेत या पती चंद्रशेखर याच्यासोबत १८ डिसेंबर २०१८ पासून ३० ऑगस्ट २०२५ पर्यंत सासरी नांदत होत्या त्यावेळी आरती बंडी ही नागमणी यांच्या घराशेजारी राहते चंद्रशेखर याने नागमणी च्या मुलांना मारहाण करून शिवीगाळ करून चोरीचे खोटे आरोप करून त्रास दिला आहे तसेच नागमणी हिने माहेरून दहा लाख रुपये घेऊन यावेत म्हणून धमकी दिली नागमणी यांचे शिक्षण कमी झाल्याने व इंग्रजी येत नसल्याने तसेच मराठीचा अर्थ बोध होत नसल्याने चंद्रशेखर याने कलकत्याच्या पार्टी कडून व्यवसायाचे पैसे येणार आहेत परंतु समोरील पार्टी पैसे देत नाही त्यामुळे आपण त्याच्यावर केस करणार आहे असे सांगून घटस्फोटाच्या कागदावर नागमणीच्या सह्या घेतल्या तसेच कधीही रद्द न होणारे व्यवसायाचे कुलमुखतार रजिस्टर केले म्हणून जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे पोलीस उपनिरीक्षक मोरे पुढील तपास करीत आहेत.

### पिकअपच्या धडकेते मुलगी ठार

**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

रविवारी सकाळी प्राचेता कल्लप्पा कमळे वय ६ वर्षे रा. भंडारकवठे ता. दक्षिण सोलापुर ही तीच्या बहिणीसह तेलगांव रोडने अमोगसिध्द मंदीराकडे रोडच्या कडेने पायी चालत जात असताना भंडारकवठे कडुन तेलगांव कडे जाणारे महिन्द्रा पिकअपने जोराची धडक दिल्याने अपघातात प्राचेता कमळे ही चिमुकली जागीच ठार झाली . या घटनेची मंद्रुप पोलीसात नोंद झाली आहे. प्राचेता ही रविवारी बहीणीसह भंडारकवठे रोडवरून तेलगावकडे जात असताना वाहन क्रमांक एम. एच.१३ डी.क्यु ९९७३ वरील चालक प्रसाद ज्ञानदेव पाटील रा. वडापुर




ता. दक्षिण सोलापुर याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगात हयगीने चालवुन रोडचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करून पाठीमागुन प्राचेता कमळे हिस जोराची धडक देवुन तीला गंभीर जखमी करून तिचे मरणास मृत्यूस कारणीभुत ठरला आहे . म्हणुन महिंद्रा पिकअप वाहन क्रमांक एम.एच. १३ डी. क्यु ९९७३ वरील चालक प्रसाद ज्ञानदेव पाटील रा. वडापुर याचे विरूध्द तक्रार देण्यात आली आहे. निलप्पा अर्जुन कमळे वय ३९ वर्षे, रा. भंडारकवठे यांनी मंद्रुप पोलीसात तक्रार दिली आहे. पोलीस हवालदार मुलाणी तपास करित आहेत.

# जरांगे-पाटलांची धडपड केवळ राजकीय आरक्षणासाठीच

## मंत्री चंद्रकांत पाटील यांचा आरोप; पंढरपुरात पत्रकारांशी केला संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३१ ऑगस्ट-**

केवळ राजकीय आरक्षणाचा लाभ मिळावा यासाठी मुंबईतील आरक्षणाव्दारे मनोज जरांगे-पाटील यांची सध्या धडपड सुरु असल्याचा गंभीर आरोप उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केला आहे.

मंत्री चंद्रकांत पाटील रविवारी पंढरपुरात आले होते. यावेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी मनोज जरांगे-पाटील हे सर्वसामान्य मुंबईकरांना वेठीस धरत आहे. मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण मिळणार नसल्याचे मंत्री पाटील यांनी ठणकावले. मंत्री पाटील यांच्या या वक्तव्यानंतर आता मराठा आरक्षण आंदोलकांमध्ये रोष निर्माण होण्याची शक्यता आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाला एसीबीसी व ई डब्ल्यूएस मधून आरक्षण दिले होते. परंतु मनोज जरांगे पाटील यांना ते मान्य नव्हते. त्यांना केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राजकीय आरक्षण हवे आहे. यासाठीच त्यांचे आंदोलन सुरू आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजातील जवळपास ५८ लाख कुणबी नोंदी शोधून त्यांना कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप केले आहे.समाजाचे सर्व प्रश्न सोडवले असतानाही आता केवळ राजकीय आरक्षण मिळावे यासाठीच मनोज जरांगे यांनी मुंबईत आंदोलन सुरू केले आहे. इतक्यात तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मनोज जरांगे पाटील यांना भेटणार नाहीत. शिष्टमंडळच त्यांच्याशी चर्चा करेल. जर चर्चा करुन मार्ग निघाला तर चर्चा करणे योग्य होईल असेही पाटील यांनी यावेळी सांगितले.

### सर्व समाजांचा फडणवीसांकडून विचार

दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व समाजाचा विचार केला आहे. त्यांनी कधीच मराठा समाजाचा तिरस्कार केला नाही. जे जे करता येईल ते फडणवीसांनी आत्तापर्यंत केले असल्याचे मंत्री पाटील यांनी सांगितले.

### मुंबईकरांना वेठीस धरु नये

मनोज जरांगे पाटील यांनी लोकशाही मार्गाने आंदोलन करावे. सर्वसामान्य मुंबईकरांना वेठीस धरु नये असे आवाहन देखील मंत्री चंद्रकांत पाटील यांनी यावेळी केले.

## घरोघरी ज्येष्ठा गौरींचे आगमन



सोलापूर : घरोघरी मोठ्या उत्साहात 'गौरी आल्या सोन्याच्या पावलाने' या जयघोषात महालक्ष्मीचे आगमन करुन सुवासिनींनी पूजन केले. जुळे सोलापूर परिसरात रविवारी सायंकाळी टिपलेले छायाचित्र.



# 'सिंहगड'च्या पाच दिवसांच्या गणरायाचे विसर्जन

### मिरवणुकीत पारंपरिक लेझीम खेळास प्राधान्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

केगाव येथील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज व सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचा पाच दिवसांचा गणरायाचे रविवारी विसर्जन सोहळ्याने संपन्न झाला. यावेळी सोलापूरची शान मानल्या जाणाऱ्या पारंपरिक लेझीम खेळाचे आकर्षण विशेष ठरले. डीजे-डान्सला फाटा देत विद्यार्थ्यांनी परंपरेला नवी ऊर्जा दिली.

श्री सिंहगडचा राजा असलेल्या गणेशमूर्तीची आरती कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या हस्ते झाली. यावेळी प्राचार्य डॉ. शंकर नवले, मुख्य प्रबंधक डॉ. डी. आय. नवले, प्रा. शरद नवले तसेच पब्लिक स्कूलचे उपप्राचार्य प्रकाश नवले उपस्थित होते. आरतीनंतर जयजयकारात मिरवणुकीस प्रारंभ झाला. सादरीकरणाबद्दल कॅम्पस डायरेक्टर संजय नवले व प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी कौतुक केले. लेझीम प्रमुख म्हणून निखिल घोडके यांनी नेतृत्व केले तर धैर्यशील साठे व प्रियांका पवार यांनी सहकार्य केले. दुपारी सुरू झालेली मिरवणूक सायंकाळी आठ वाजता कॅम्पस आवारातील विहिरीत श्रींच्या मूर्तीच्या विसर्जनाने संपन्न झाली.

> पारंपरिक ढोल-ताशांचा गजर, पर्यावरणपूरक विसर्जन आणि नो डीजेचा संकल्प या माध्यमातून आपण गणेशभक्तीला नवा अर्थ देत आहोत. आवाजात नव्हे तर श्रद्धेत आणि शिस्तीतूनच उत्सवाची खरी शोभा वाढते.
> **- प्रियंका पवार, विद्यार्थिनी**

> डीजेच्या प्रचंड आवाजामुळे उत्सवाची गोडी कमी होते, पर्यावरणालाही हानी पोहोचते. त्यामुळे डीजेमुक्त मिरवणूक, पर्यावरणपूरक विसर्जन आणि शिस्तीचा आदर्श ठेवून आपण खऱ्या अर्थाने गणेशभक्ती करतो.
> **- धैर्यशील साठे, विद्यार्थी**

> डीजेच्या कोलाहलाऐवजी पारंपरिक ढोल-ताशांचा गजर आणि शिस्तबद्ध मिरवणूक यातूनच खरी भक्ती दिसते. डीजेमुक्त उत्सव म्हणजे संस्कृती जपण्याचा संकल्प.''
> **- निखिल घोडके, विद्यार्थी**

# 'स्टार'कडून बेंगलोर-सोलापूर-मुंबई विमानसेवेचे नियोजन

### सप्टेंबर अखेर ही सेवा होणार कार्यान्वित

### स्टारच्या जनरल मॅनेंजरची चेंबर ऑफ कॉमर्सला माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

सोलापूर-गोवा विमानसेवा सुरू झाल्यानंतर मुंबई आणि पुणे विमानसेवा कधी सुरू होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मुंबई, पुण्याकडे सोलापूरहून विमानसेवा सुरू केल्यानंतर प्रवासी न मिळाल्यास विमान कंपन्यांना तोटा होण्याची भीती होती. त्यामुळे मुंबई, पुणे विमानसेवा सुरू करण्यास कंपन्या तयार नव्हत्या. त्या पार्श्वभूमीवर विमान कंपन्यांची व्यावहारिक तूट भरून काढण्याच्या निधीस मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता दिल्याने आता सोलापूरहून पुणे आणि मुंबई विमानसेवा सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दरम्यान,स्टार एअरलाईन्सच्या व्यवस्थापनाने बेंगलोर-सोलापूर-मुंबई असे नियोजन केल्याची माहिती सोलापूर विकास मंचचे सदस्य तथा चेंबर ऑफ कॉमर्सचे सदस्य केतनभाई शहा यांनी दैनिक तरूण भारतला दिली.





आजच म्हणजे रविवार, दि. ३१ ऑगस्ट रोजी सकाळी शहा यांनी स्टार एअरलाईन्सच्या जनरल मॅनेंजरबरोबर सोलापूर-मुंबई विमानसेवेबाबत विस्ताराने चर्चा केली. या चर्चेत स्टारच्या व्यवस्थापकांनी शहा यांना सांगितले की, ही विमानसेवा सोलापूर पुरती मर्यादित न ठेवता मुंबई-सोलापूर-बेंगलोर असे करण्याचे आमचे प्रयोजन आहे. यासाठी मुंबईमध्ये सकाळचा स्लॉट शिल्लक असून, या महिनाखेरपर्यंत ही सेवा आम्ही सुरू करणार असल्याचेही त्यांना सांगितले. यामुळे सप्टेंबर अखेरपर्यंत सोलापूर-मुंबई ही विमानसेवा सुरू होणार आहे.

केंद्र शासनाने सामान्य नागरिकांना विमानप्रवास परवडेल यादृष्टीने उडान (रिजनल कनेक्टिव्हिटी स्किम) योजना सुरू केली आहे. सोलापूर विमानतळासाठी देखील ही योजना लागू झाली आहे. या योजना लागू असे पर्यंत सोलापुरातून विमान सेवा देण्यासाठी कंपनीस वर्षभरासाठी प्रति आसन तीन हजार २४० रुपये दराने (शंभर टक्के व्हिजीएफ) व्यावहारिकता तूट म्हणून निधी म्हणून राज्यशासन देणार आहे. स्टार एअर कंपनी या योजनेंतर्गत विमानसेवा देण्यास तयार आहे. त्यामुळे आता सोलापूर - मुंबई आणि सोलापूर - पुणे विमान सेवेचा मार्ग मोकळा झाला आहे. सोलापूर विमानतळासाठी उडान योजना लागू झाल्यानंतर राज्यशासनाकडून देण्यात येणारा हा निधी बंद करण्यात येईल. त्यानंतर केंद्र शासनाच्या उडान योजनेतून २० टक्के व्यवहारिकता तूट (व्हिजीएफ) कंपनीस दिली जाणार आहे.

मागील काही वर्षांपासून होटगी रोडवरील विमानतळ सुरू करण्यासंदर्भातील हालचाली सुरू झाल्या होत्या. दरम्यान, मध्यंतरी सोलापूर - गोवा, सोलापूर- मुंबई व सोलापूर - हैदराबाद या तिन्हीही मार्गावर विमानसेवा सुरू होणार असल्याचे सांगितले होते. त्यानंतर आता सोलापूर ते गोवा ही विमानसेवा सुरू झाली असून, त्यास चांगला रिस्पॉन्सही मिळत आहे. गोवा-सोलापूर-गोवा विमानसेवेसाठी 'फ्लाय ९१' विमान वाहतूक कंपनीने जबाबदारी घेतली आहे. आता बेंगलोर-सोलापूर-मुंबई या विमानसेवेची जबाबदारी स्टार या कंपनीने घेतली आहे. यामुळे आता सोलापूरकरांना स्टार सेवेची प्रतिक्षा लागली आहे.

## गणपती बाप्पा मोरया.. पुढच्या वर्षी लवकर या...

### पाच दिवसांच्या गणेश मूर्तीचे झाले विसर्जन



सोलापूर : गणेश उत्सवातील पाच दिवसांच्या घरगुती गणेश मूर्तीचे विसर्जन अनेक गणेशभक्तांनी केले. अशाच एका कुटुंबियाकडून पाच दिवसांच्या उत्सवमूर्तीचे रविवारी विसर्जन करताना येथील गणपती घाटावरील छायाचित्र.

# हिंदवी स्वराज्याच्या उभारणीत भटके विमुक्त समाजाचेही योगदान

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे प्रतिपादन

### सोलापूर जिल्हा 31 ऑगस्ट हा भटके विमुक्त दिवस म्हणून साजरा करणारा पहिलाच जिल्हा

### भटके विमुक्त जातीतील नागरिकांना विविध प्रमाणपत्राचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्य निर्माण केले. हे स्वराज्य निर्माण करत असताना महाराजांनी भटके विमुक्त जातीतील नागरिकांना सामावून घेतले होते. स्वराज्यातील गड-किल्ल्यांचे संरक्षण करणे, हेरगिरी खात्याचे प्रमुख म्हणून बहर्जी नाईक यांची कामगिरी तसेच महाराजांनी या समाजातील अनेक नागरिकांना सन्मानाचे स्थान दिलेले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या उभारणीत भटक्या विमुक्ताचेही योगदान होते, असे प्रतिपादन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालय, इतर मागास बहुजन विभाग व भटके विमुक्त विकास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित भटके विमुक्त दिवसानिमित्तच्या कार्यक्रमात पालकमंत्री बोलत होते. यावेळी आमदार राजू खरे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पोलीस शहर उपायुक्त विजय कबाडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, राज्य भटके विमुक्त विकास परिषदेचे अध्यक्ष उद्धव काळे, पश्चिम महाराष्ट्रचे अध्यक्ष संतोष शिर्के, इतर मागास बहुजन विभागाचे सहाय्यक संचालक गणेश सोनटक्के आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री गोरे पुढे म्हणाले की सन १८७१ मध्ये ब्रिटिश सरकारने कायदा करून भटक्या विमुक्त समाजाला मुख्य प्रवाहापासून अलिप्त ठेवले होते. स्वातंत्र्यानंतर ३१ ऑगस्ट १९५२ रोजी तत्कालीन शासनाने हा कायदा रद्द केला व भटक्या विमुक्त समाज मुख्य प्रवाहात जोडण्याचे प्रयत्न सुरू झाले. राज्य शासन ही भटके विमुक्त समाजातील नागरिकांना सर्व प्रकारच्या शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी प्रयत्नशील आहे. इतर मागास बहुजन विभागाचे सहाय्यक संचालक श्री सोनटक्के यांनी प्रास्ताविक केले. प्रारंभी पालकमंत्री जयकुमार गोरे व मान्यवर यांच्या हस्ते राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमाचे पूजन तसेच दीप प्रज्वलन करून भटके मुक्त दिवस ह्या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

त्यानंतर पालकमंत्री महोदय यांच्या हस्ते भटके मुक्त समाजातील गुणवंत विद्यार्थी, राज्य शासनाच्या सेवेत नुकतेच निवड झालेले उमेदवार यांचा गौरव करण्यात आला. तसेच प्रातिनिधिक स्वरूपात भटके मुक्त समाजातील लाभार्थ्यांना जात प्रमाणपत्र, रेशन कार्ड आदींचे वाटपही करण्यात आले. प्रारंभी नियोजन भवन परिसरात पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे भटके विमुक्त समाजातील नागरिकांनी पारंपारिक वाद्य वाजवून व नृत्यचे सादरीकरण करून स्वागत केले.

### वर्षभरात भटके विमुक्तसाठी प्रशासनाने केलेले कार्य

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने २५ शिबिरांद्वारे विमुक्त जाती व भटक्या जमाती मधील नागरिकांना १६०९ मतदान ओळखपत्रे, १४२१ जात प्रमाणपत्रे, ५१७ आधार कार्ड, १९ दिव्यांग प्रमाणपत्रे, तसेच ९१४ आयुष्यमान भारत कार्ड वितरित केली. विशेष म्हणजे, ६२ लाभार्थ्यांना घरकुलासाठी मोफत जमीन वाटप करण्यात आली, ज्यामुळे या समाजघटकांना स्थैर्य व सन्मान प्राप्त झाला. पालकमंत्री जयकुमार गोरे व भटके विमुक्त विकास परिषदेचे राज्य अध्यक्ष श्री. काळे यांनी सोलापूर जिल्हा प्रशासन तसेच जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - ११९५

**कां जे मार्गामार्ग देखावे । साच लटिकें वोळखावें ।**
**हिताहित जाणावें । हिताचिलागीं ॥**

प्रयाणाकरिता उत्तम असणारा मार्ग म्हणजे आर्चिरादी मार्ग किंवा देवयान मार्ग असल्याचे श्रीकृष्णांनी सांगीतले आहे. त्यानंतर अर्जुनाला अयोग्य मार्ग कोणता हे जाणून घेण्याची इच्छा असल्याने भगवंत अयोग्य मार्ग कोणता याचेही स्पष्टीकरण करीत आहेत. मरणाच्या वेळी विषयवात, कफ हे गच्च भरलेले असतात, अंत:करणात अज्ञानांधकार कोंदाटून राहिलेला असतो. सर्व इंद्रिये जड होतात. रोगांमुळे ज्ञान शक्ती, क्रीया शक्तींना अडथळा येतो. स्मृतीभ्रम होतो, मन वेडे होते. प्राण देहात कोंडला जातो. जठराग्नीचा अग्नीपणा राहत नाही. चंद्राच्या आड दाट आकाश आले तर तेथे पुर्ण अंधकारही नसतो आणि पुर्ण प्रकाशही नसतो तर मंदप्रकाश आणि थोडा अंधकार अशी संमिश्र अवस्था असते. त्याप्रमाणे व्यक्ती सत्वर मरतही नाही अथवा शुध्दीवरही राहत नाही. अंतकाळी माणसाची खूप वाईट स्थिती होते. शरीरात अशी वाईट स्थिती व बाहेर चंद्रकलेचा क्षय, कृष्णपक्ष आणि दक्षिणायन अशी परिस्थिती असते यालाच अप्रशस्त काळ म्हणतात.



प्रयाणाकरिता दोन वाटापैकी एक सरळ तर दुसरी अडवळणी असल्याचे सांगून भगवंतानी अर्जुनाला या दोन्हीपैकी योग्यतो मार्ग आपणच शोधावा असे सांगतांना म्हटले,

**कां जे मार्गा मार्ग देखावे ! साच लटिकें वोळखावें !**
**हिताहित जाणावें ! हिताचिलागीं !!**

अर्थात, आपल्या हित अहिता करीताच योग्य अयोग्य मार्ग आपण पहावे तसेच सत्य असत्य जाणावे आणि आपले स्वहित कशात आहे, हे समजून घ्यावे. ज्याला हे दोन्ही मार्ग समजले, तो वाईट किंवा अप्रशस्त मार्ग निवडेलच कशाला. ? कोणाला चांगला मार्ग आवडणार नाही. ? अर्थात, सर्वांना चांगलाच मार्ग आवडत असतो. खरे म्हणजे मरणकाळी कोणता मार्ग प्राप्त होईल, हे माणसाच्या स्वाधीन नसते. देह असो अथवा जावो, आम्ही केवळ ब्रम्हरुपच आहोत असा ज्याचा जिवंतपणीच निश्चय झाला आहे, त्याला मार्ग शोधण्यासाठी कोठेही जाण्याची किंवा वेगळे असे काही करण्याची गरज नाही. लाटेच्या प्रगट होण्याने पाणी जन्मत नाही अथवा लाट नाहिशी झाल्याने पाणी मरत नाही. त्याप्रमाणे ज्ञानी देहात असुनही देहानेच ब्रम्हरुप झालेले असतात. त्यामुळे त्यांना मरणाच्या काळ वेळेशी कांही देणे-घेणे नसते. अर्थात, अशा ज्ञानी लोकांसाठी सर्व काळ हा अर्चिरादी काळच असतो. आपलेही मरण आपल्या हातात नाही किंवा आपणाला मृत्यू केव्हा येणार हे आपणाला माहिती नाही. हे जरी सत्य असले तरी, मृत्यू हा निश्चित आहे. हे ही विसरता येणार नाही. आपण चांगले वागावे, सत्कर्म करावे एवढे मात्र आपल्या हातात असल्याने ते न चुकता आपण करावे. अर्जुनाला भगवंत जो उपदेश करीत आहेत तो उपदेश, ते मार्गदर्शन जसेच्या तसे संजय धृतराष्ट्राला राजवाडयात बसून कथन करीत आहे. श्रीकृष्णाचे अर्जुनाला संस्कृत भाषेतून होत असलेले हे अमृतमयी मार्गदर्शन आपल्या मातृभाषेतून माऊली आपणाला ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून करीत आहेत. आपण या सदराच्या वाचनात सातत्य बाळगून या मार्गदर्शनाचा लाभ या ओव्यांच्या माध्यमातून घेऊ या. जय जय राम कृष्ण हरी।.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : सोमवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. १ सप्टेंबर २०२५ | ज्येष्ठा गौरी पूजन |
| विक्रम संवत् २०८२ | भागवत सप्ताहारंभ, |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - भाद्रपद | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. नवमी (२६.४२) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - ज्येष्ठा (१९.५३) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - विष्कंभ (१६.३०) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बालव (१३.५३) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

# लवकर मिरवणुका काढून विसर्जन करणार

### आजोबा गणपतीचे रात्री बारा वाजेपर्यंत विसर्जनाचा निर्धार

### सार्वजनिक मध्यवर्ती श्री गणेशोत्सव मंडळाची बैठक



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

मानाचा आजोबा गणपतीचे विसर्जन रात्री १२ वाजेपर्यंत करण्याचा निर्धार रविवारी ऐश्वर्या हॉटेल येथे झालेल्या बैठकीत करण्यात आला.

सार्वजनिक मध्यवर्ती श्रीगणेशोत्सव मंडळाची मध्यवर्ती मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या मंडळांची तातडीची बैठक पार पडली. या बैठकीत अनेक उत्सव मंडळांच्या मिरवणुक मार्गावर येणाऱ्या अडी अडचणी ऐकुन त्यावर समाधानकारक तोडगा काढण्यात आला. मिरवणुकीत अग्रभागी असलेल्या मानाचा देशमुखांच्या गणपतीचे देशमुख वाड्यातुन दुपारी एक वाजता मान्यवरांच्या हस्ते पुजन होऊन मध्यवर्ती मिरवणुकीस सुरुवात होईल त्यानंतर अनेक उत्सव मंडळे या मिरवणुकीत पारंपारिक वाद्यांसह सहभागी व्हावे असे आवाहन ट्रस्टी सुनिल रसाळे यांनी केले.

मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या उत्सव मंडळांनी काही अडचणी आल्यास मध्यवर्तीच्या पदाधिकाऱ्यांना कळवाव्या त्या सोडविण्याचा मध्यवर्ती प्रयत्न करणार असल्याचे दास शेळके यांनी उपस्थित मंडळांना सुचना केले.या बैठकीत मानाचा आजोबा गणपती, समर्थ तरुण मंडळ,राणा गणपती, ओम मित्र मंडळ, बाळीवेस गणपती, सरदार गणपती, पाणीवेस तालीम मंडळ, थोरला मंगळवेढा तालीम तरुण मंडळ, सावजी गणपती, राजस्थानी युवक मंडळ या मंडळांची उपस्थिती होती. या बैठकीस सार्वजनिक मध्यवर्ती श्रीगणेशोत्सव मंडळाचे उत्सव अध्यक्ष सोमनाथ मेंडके, सुनिल रसाळे, दास शेळके, नरसिंग मेंगजी, भाऊसाहेब रोडगे, संजय शिंदे, लता फुटाणे, हेमा चिंचोळकर, विजय पुकाळे, विष्णु मुधोळकर, कैलास मेंगाणे, चंद्रकांत वानकर, अमोल शिंदे आदी उपस्थित होते.

## उत्तम सत्य धर्म

सत्य हे जीवनाचे सर्वात मोठे अलंकार आहे. असत्याच्या आधारावर मिळवलेले यश तात्पुरते असते, पण सत्यावर उभे राहिलेले जीवन कायम टिकते. म्हणूनच जैन धर्मातील दशधर्मांपैकी एक महत्त्वाचा धर्म म्हणजे उत्तम सत्य धर्म. भारतीय संस्कृतीत सत्याला नेहमीच सर्वोच्च स्थान दिले गेले आहे. उपनिषदांमध्ये सांगितले आहे. सत्यमेव जयते नानृतं सत्याचाच नेहमी विजय होतो; असत्याचा कधीच होत नाही. सत्य म्हणजे फक्त खोटे न बोलणे नव्हे, तर मन, वाणी आणि कृती या तिन्ही ठिकाणी प्रामाणिक राहणे होय. सत्यामुळे माणसाच्या व्यक्तिमत्त्वात तेज येते. समाज त्याच्यावर विश्वास ठेवतो.




**संस्कृत सुभाषित म्हणते - सत्यं वद धर्मं चर**

सत्य बोला आणि धर्माचे पालन करा. आजच्या युगात असत्य, खोटेपणा, फसवणूक सर्वत्र दिसून येते. राजकारणात, व्यापारात आणि शिक्षणातसुद्धा कधी कधी असत्याचा आधार घेतला जातो. पण असा लाभ फार काळ टिकत नाही. उलट सत्यावर आधारलेले नाते, यश आणि समाजरचना कायमस्वरूपी टिकतात.विद्यार्थ्यांच्या जीवनात सत्याचे महत्त्व विशेष आहे परीक्षेत नकल करून मिळवलेले यश अल्पकाळ टिकते, पण प्रामाणिक मेहनतीतून मिळवलेले यश आयुष्यभर सोबत राहते. भगवद्गीतेत सांगितले आहे

**सत्यं प्रियहितं च यत् स्वाध्यायाभ्यसनं च यत्।**
**एतत् तपो वाचा (गीता १७.१५)**

सत्य बोलणे, प्रिय व हितकारक बोलणे, तसेच स्वाध्याय करणे ही वाणीची तपश्चर्या आहे. जर प्रत्येकाने उत्तम सत्य धर्माचे पालन केले तर भ्रष्टाचार, अन्याय व फसवणूक नाहीशी होईल. प्रामाणिकपणा आणि विश्वास या आधारांवर समाज अधिक मजबूत होईल. सत्येन धृतं सत्येन तप्यते सत्येनादित्यः प्रतितिष्ठति। पृथ्वी, तपश्चर्या व सूर्य हे सर्व सत्यावरच आधारलेले आहेत. सत्य हेच जीवनाचे सौंदर्य, सत्य हेच धर्माचे मूळ आणि सत्य हेच अंतिम विजय आहे. म्हणूनच प्रत्येकाने मन, वाणी आणि कृतीतून उत्तम सत्य धर्माचे पालन करण्याचा संकल्प केला पाहिजे.

**- प्रा. अजित देवसाळे**
**९८५००९२९७५**

# अन्नछत्र मंडळातर्फे न्यायाधीश कविता इंदलकर यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि ३१ ऑगस्ट-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून भक्तांची चोख व्यवस्था पाहायला मिळाली असल्याचे मनोगत कोल्हापूर जिल्हा न्यायाधीश कविता सूर्यकांत इंदलकर (रा. सातारा) यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या समवेत सोलापूर दिवाणी न्यायाधीश ईश्वर सूर्यवंशी, कनिष्ठ स्तर हे उपस्थित होते. यावेळी न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी, सौरभ मोरे, वैभव मोरे, प्रसाद मोरे, अतिश पवार, राजाभाऊ नवले, निखील पाटील, प्रवीण घाडगे, योगेश कटारे, भरत राजेगावकर, विजय माने, भारत पाटील, शुभम सावंत, शहाजी यादव, सतीश महिंद्रकर, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, तानाजी पाटील, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, एस के स्वामी, महांतेश स्वामी, शिव स्वामी, श्रीकांत स्वामी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, विशाल घाडगे, धनंजय निंबाळकर, राहुल इंडे, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.

## आज जिल्हा लोकशाही दिनाचे आयोजन

**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

जिल्हा लोकशाही दिन सोमवार, दि.०१ सप्टेंबर २०२५ रोजी होणार आहे. या दिवशी जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्याकरीता त्या त्या विभागातील विभाग प्रमुखांनी उपस्थित राहणे बाबतचे निर्देश शासन परिपत्रकान्वये प्राप्त आहेत. दरम्यान, या लोकशाही दिनास सर्व अधिकाऱ्यांनी उपस्थित राहणे गरजेचे असून, कोणी टाळाटाळ केली तर त्यांना नोटीस बजावणार असल्याचा इशारा आरडीसी अभिजित पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिला आहे. या दिवशी अधिकाऱ्यांनी आपलेकडील मागील सहा महिन्यातील लोकशाही दिनाचे निवेदनावर केलेली कारवाईचा अहवालासह हजर रहावे. तसेच आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही इ. माहितीसह सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता, येथे उपस्थित रहावे.

# चर्मकार समाज विकास मंडळाच्यावतीने रविवारी शिक्षक, विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

चर्मकार समाज विकास मंडळ सोलापूरच्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून चर्मकार समाजातील गुणवंत शिक्षक आणि दहावी व बारावी परीक्षेत उज्वल यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा रविवार ७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता विजापूर रोडवरील जगदीश श्री मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती मुख्य निमंत्रक राजशेखर जेऊरकर आणि सेवानिवृत्त सहाय्यक गट विकास अधिकारी मल्हारी बनसोडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या मंडळाच्या वतीने घेतलेल्या राज्यस्तरीय सामुदायिक वधू - वर सूचक मेळाव्यास चांगला प्रतिसाद मिळाला. त्यानंतर हा दुसरा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. इयत्ता दहावी मध्ये ९० टक्के पेक्षा जास्त गुण आणि बारावी परीक्षेत ८५ टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. सुमारे २५ शिक्षक, ७० विद्यार्थी, समाजातील एमपीएससी, यूपीएससी, सेट, नेट, पीएचडी धारक त्याचबरोबर पंढरपूर वारीमध्ये नियोजनपूर्वक जबाबदारी सांभाळल्याबद्दल जिल्हा परिषदेचे पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश आणि काम केलेल्या मान्यवरांचा गौरवही यावेळी करण्यात येणार आहे. गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र पुस्तक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून महावितरण सोलापूरचे अधीक्षक अभियंता सुनील माने , उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे, सहाय्यक उपनिबंधक विजय खडतरे, नायब तहसीलदार बालाजी बनसोडे, निवृत्त नगर अभियंता सुभाष सावस्कर, पाटबंधारे विभागाचे अरुण कांबळे आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

अध्यक्षस्थानी निवृत्त कार्यकारी संचालक हरिदास टोणपे हे राहणार आहेत. चर्मकार समाजातील गुणवंत विद्यार्थी शिक्षक आणि इतर क्षेत्रातील गुणवंत यांनी नाव नोंदणीसाठी वामन धुळराव (९४ २३ ३७ ६२ २५ ) आणि शिवकुमार तोळणूरे (९९ २२ २६ ३६ २०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन मुख्य निमंत्रक राजशेखर जेऊरकर यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस वामन धुळराव , शिवकुमार तोळणूरे , महादेव कांबळे, अंबादास खडतरे, अंबादास वाघमारे, अंबादास चाबुकस्वार, रेवनसिद्ध व्हनमराठे, शिवपुत्र हरवाळकर, कल्लप्पा व्हनहुवे, शशिकांत माचनूरकर, डॉ. सचिन राजगुरू, डॉ. दत्तात्रय हरवाळकर , ज्योती वंजारी, सुजाता हरवाळकर, सुनिता व्हनस्कर , पोर्णिमा धुळराव, राजश्री कांबळे आदी उपस्थित होते.

# ‘डिजे अन् लेझरलाईट’ बंदीचा कायमस्वरूपी आदेश काढा

**गेल्या १५ दिवसांपासून सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील जाणकार नागरिकांनी डॉल्बी सिस्टीम आणि लेझर लाईटच्या वापरावर बंदी आणण्यासाठी एक संघर्ष समिती स्थापन करुन चांगलाच आवाज उठविला होता. इतकेच नाही तर सोलापूर शहरात तर या विरोधात मोर्चा काढून जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्तांना निवेदनही दिले होते; यामुळे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी गंभीर दखल घेवून डिजे अन् लेझर लाईट बंदीचा आदेश काढला असून, हा आदेश गणेशोत्सवापुरता मर्यादित न ठेवता सर्वच उत्सवांसाठी कायमस्वरूपी करण्यात यावा, अशी अपेक्षा आता जाणकार नागरिकांची आहे.**




गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्री गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईटचा वापर नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम करणारा ठरू शकतो, याची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्ह्यात डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईट वर बंदी लागू केली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून जिल्हाधिकारी यांनी दि. २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत सार्वजनिक गणेश मंडळांनी विसर्जन मिरवणुकीत डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईटचा वापर न करण्याचे आदेश दिले आहेत. इतकेच नाहीतर या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर फौजदारी कारवाई करण्यात येईल, असेही आदेशात स्पष्ट केले आहे. दरम्यान, सोलापूर शहर आणि जिल्ह्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रमात डिजे वाजत असतो आणि काही ठिकाणी लेझर लाईटचाही वापर मोठ्या प्रमाणात होत असतो. हा वापर पूर्णत: बंद करून नागरिकांना सहकार्य करावे, अशीही मागणी आता पुढे येत आहे. इतकेच नाहीतर अशा निर्णयाला स्थानिक लोकप्रतिनिधींनीही प्रशासनाला सहकार्य करण्याची गरज आहे.

डॉल्बी सिस्टीममुळे जवळून जाणाऱ्या अनेक नागरिकांना कान व छातीस त्रास होऊन गंभीर आरोग्यविषयक परिणाम झाल्याचे निदर्शनास आलेले आहे. तसेच लेझर लाईटमुळे वयोवृद्ध व लहान मुलांच्या डोळ्यांवर परिणाम होऊन बुबळांना व पडद्याला इजा झाल्याची नोंद आहे. यामुळे जिल्ह्यातील अनेक नागरिकांनी डिजे अन् लेझर लाईटवर बंदी आणावी, अशी मागणी वारंवार केली होती. गेल्या अनेक वर्षांपासून ही मागणी पोलिस प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाकडे होत होती; मात्र बड्या पुढाऱ्यांच्या मध्यस्थीमुळे डिजे अन् लेझर किरणांचा नागरिकांना वारंवार त्रास होत होता.

गेल्या १५ दिवसांपासून सोलापूर शहर-जिल्ह्यात डॉल्बिमुक्त चळवळ सुरू केली होती. सोलापूरच्या विविध क्षेत्रातील नागरिकांनी या चळवळीमध्ये सहभाग नोंदविला. याबाबत सोलापूर विकास मंचनेही जिल्हाधिकारी आणि पोलिस आयुक्तांना मोर्चाद्वारे निवेदन दिले होते. त्याचा परिणाम शनिवारी जिल्हाधिकाऱ्यांनी आणि पोलिस आयुक्तांनी काढलेल्या आदेशात दिसून आला. या निर्णयाने सर्वसामान्य जनतेला न्याय मिळाला आहे. हे आंदोलन फक्त विसर्जनाच्या मिरवणुकीपुरते नव्हते तर कायमस्वरूपी डॉल्बी बंद करण्याबाबतचे होते अशीही भूमिका विकास मंचने घेतल्याने यापुढील मिरवणूकांनाही चाप बसणार आहे. सोलापूर जिल्ह्यात गणेशोत्सव पारंपरिक पद्धतीने आणि उत्साहात साजरा केला जातो. सार्वजनिक गणेश मंडळांकडून मोठ्या प्रमाणात मिरवणुकांचे आयोजन केले जाते. मात्र, नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ध्वनी व प्रकाश प्रदूषण टाळणे आवश्यक असल्यामुळे ही बंदी लागू करण्यात आली आहे. गेल्यावर्षी अनेक सार्वजनिक गणेश मंडळांनी डॉल्बी सिस्टीमचा मोठ्या प्रमाणात वापर केला होता. या डॉल्बीच्या आवाजामुळे काही व्यक्तींना कानाचा, छातीचा त्रास होवून त्यांच्या जिवीतास धोका झाल्याची काही प्रकरणे समोर आली आहेत. तर लेझर लाईटमुळे वृध्द आणि लहान मुलांच्या डोळ्याच्या पडद्याला तसेच बुबुळाला इजा झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. यामुळे सर्व सार्वजनिक मंडळ पदाधिकाऱ्यांनी कमी आवाजातील पारंपारिक वाद्य वाजवून मिरणुका काढण्याचे सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे. यंदा जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयामुळे त्यांचे सर्व स्तरातून स्वागतही करण्यात आले आहे. मात्र आता हा काढलेला आदेश श्रींच्या उत्सवापुरता मर्यादीत न राहता ते कायम स्वरूपी सोलापुरात सर्वच उत्सवासाठी लागू होणे गरजेचे आहे. गणोशोत्सव, नवरोत्रोत्सव या दोन मोठ्या उत्सवासह शहरात विविध समाज संघटनांद्वारे महापुरूषांच्या जयंतीनिमित्त पुण्यतिथीनिमित्त मोठ्या मिरवणूकांची काढण्याची परंपरा आहे. त्यामध्येही पारंपारिक वाद्यांऐवजी डीजे, डॉल्बी, लेजर लाईटचा वापर मोठ्या प्रमाणात होताना दिसतो. त्यामुळे गणेशोत्सवासाठी लागू झालेला नियम यापुढील सर्व मिरवणूकांसाठी कायम रहावा व सामान्य जनतेचे जगणे सुकर व्हावे अशी अपेक्षा जाणकार नागरिकांची आहे.

# पुनर्रचीत हवामान आधारीत फळपीक विमा योजना राबविण्याचा निर्णय

### फळपिकांना हवामान धोक्यांपासून संरक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

कृषी उत्पादनात फळपिकांचा वाटा दिवसेंदिवस वाढत असून, हवामानातील अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर नुकसान सहन करावे लागते. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने २०२४-२५ व २०२५-२६ या वर्षांसाठी पुनर्रचीत हवामान आधारीत फळपीक विमा योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

हवामानातील प्रतिकूल बदलांमुळे फळपिकांचे उत्पादन घटल्यास शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळावी, हा योजनेचा मुख्य हेतू आहे. स्वयंचलित हवामान केंद्रांवर नोंदवलेल्या माहितीच्या आधारे पर्जन्यमान, तापमान, वारा वेग, आर्द्रता यांचे विश्लेषण करून विमा संरक्षण दिले जाते. या योजनेसाठी समाविष्ट फळपीके मृग बहार डाळिंब, पेरू, लिंबू, चिक्कू, सीताफळ, मोसंबी, अंबिया बहार डाळिंब, द्राक्ष, आंबा, पपई, केळी, मोसंबी आहेत.



**विमा हप्ता व संरक्षित रक्कम (निवडक उदाहरणे)**

| पिक | बहार | अंतिम मुदत | शेतकरी हिस्सा रु. | संरक्षित रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| डाळिंब | मृग | १४ जुलै | ८,००० | १,६०,००० |
| पेरू | मृग | १४ जून | ३,५०० | ७०,००० |
| द्राक्ष | अंबिया | १५ ऑक्टोबर | १९,००० | ३,८०,००० |
| आंबा | अंबिया | ३१ डिसेंबर | ८,५०० | १,७०,००० |
| पपई | अंबिया | ३१ ऑक्टोबर | २,००० | ४०,००० |
| मोसंबी | गारपिट कवच | ३१ ऑक्टोबर | १,६५० | ३३,००० |
| (सर्व हप्त्यांमध्ये राज्य व केंद्र सरकारचा हिस्सा वेगळा आहे.) | | | | |

### या योजनेची वैशिष्टये अशी

ही योजना अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित फळपिकांसाठी लागू, कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक, भाडेपट्टी व कुळाने शेती करणारे शेतकरी पात्र, जास्तीत जास्त ४ हेक्टर क्षेत्रासाठी विमा नोंदणी, एकाच फळपिकासाठी एका हंगामात एकच अर्ज, उत्पादनक्षम वयाच्या बागांसाठीच विमा संरक्षण

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# पंढरपूर तालुक्यातील आठ वाळू माफिया एक वर्षासाठी तडीपार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३१ ऑगस्ट-**

पंढरपूर तालुक्यातून आठ वाळू माफिया तडीपार करण्यात आले आहेत. पंढरपूर तालुका पोलिसांनी ही धडक कारवाई केली आहे. या कारवाईमुळे वाळू माफियांचे धाबे दणाणले आहेत. चंद्रभागा नदीतून मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर रित्या वाळूची तस्करी केली जाते. या विरोधात सोलापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पंढरपूर तालुक्याचे पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ नुसार खालील नमूद वाळूमाफियांना सोलापूर ग्रामीण, सोलापूर शहर तसेच संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातून एक वर्षाकरिता तडीपार करण्याचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्याकडे सादर केला होता. त्या प्रस्तावास जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी मजुरी दिल्यानंतर आठ वाळू तस्करांना एक वर्षासाठी तडीपार करण्यात आले आहे.

दरम्यान पंकज पांडूरंग कोळेकर (वय ३३ वर्षे), हिंमत अनिल कोळेकर (वय ३० वर्षे), विनोद अर्जुन कोळेकर (वय ३५ वर्षे) ४) संतोष दगडू चव्हाण (वय ४६ वर्षे सर्व रा. कोळेकर वस्ती गुरसाळे ता.पंढरपूर),आकाश उर्फ अक्षय भगवान घाडगे (वय २८ वर्षे, रा. देगाव ता.पंढरपूर),धनाजी रामचंद्र शिरतोडे ( वय ३४ वर्षे रा.गुरसाळे ता.पंढरपूर ), महेश दिगंबर शिंदे (वय २८ वर्षे, सहयाद्री नगर इसबावी ता.पंढरपूर) आणि सोमनाथ अरुण लोंढे (वय ३४ वर्षे रा. कौठाळी ता.पंढरपूर) असे एकूण आठ वाळूमाफियांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे सोलापूर शहर सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातून एक वर्षाकरिता तडीपार करण्यात आलेले आहे. या सर्वांच्या विरुद्ध वाळू चोरीचे अनेक गुन्हे वेगवेगळ्या पोलीस स्टेशनला दाखल होते त्या अनुषंगाने वरील आठ व्यक्तींना पंढरपूर तालुका पोलिसांनी ३१ ऑगस्ट २०२५ रोजी ताब्यात घेऊन त्यांची सोलापूर जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यामध्ये त्यामध्ये पुणे ,सातारा ,सांगली या जिल्ह्यात तेथील वेगवेगळ्या पोलीस स्टेशनमध्ये सोडून तडीपाडीच्या अंमलबजावणी केलेली आहे. सदर तडीपार केलेल्या आठ जणांविरुद्ध वेगवेगळ्या पोलीस स्टेशनला मारामारीचे, वाळू चोरीचे सरकारी कामात अडथळा आणल्याचे धमकी दिल्याचे गुन्हे दाखल आहेत. दरम्यान सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे साहेब, यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनची वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय. मुजावर, पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले, पोलीस उपनिरीक्षक विक्रम वडणे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय तोंडले, सहाय्यक उपनिरीक्षक विजू गायकवाड, सहाय्यक उपनिरीक्षक आबा शेंडगे, पोलीस हेडकॉन्स्टेबल घंटे, पोलीस हेडकॉन्स्टेबल सय्यद, पोलीस हेडकॉन्स्टेबल सागर गवळी, पोलीस हवालदार मंगेश रोकडे, पोलीस कॉन्स्टेबल बालाजी कदम, चालक पोलीस कॉन्स्टेबल हसन नदाफ, घाडगे, चाटे यांच्या पथकाने सदरची कारवाई केली आहे.

## महत्वाचे...



### विद्यार्थ्यांनी सोशल मीडियापासून दूर रहावे : पोलिस निरीक्षक दीपक भिताडे

**अक्कलकोट, दि. ३१ ऑगस्ट-**

आई-वडिलांचे स्वप्न साकार करायच असेल तर विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या इन्स्टाग्राम, फेसबुक आणि व्हॉट्सअॅप पासून दूर राहावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक दीपक भिताडे यांनी विद्यार्थ्यांना केले.कै. वसंत अंबाजी भांगे यांच्या बाराव्या स्मृतिदिनानिमित्त सिद्धार्थ सोशल फौंडेशन वतीने वागदरीच्या श्री एस. एस. शेळके प्रशालेत येथे शंभर मुलांना शालेय साहित्य बॅग आणि इतर शालेय साहित्य वाटप कार्यक्रम प्रसंगी अक्कलकोट नॉर्थ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपक भिताडे बोलत होते. कमलाकर सोनकांबळे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी कार्यक्रमाचे आयोजक चंद्रशेखर भांगे, चेअरमन बसवराज शेळके, सिद्धार्थ सोशल फौंडेशनचे अध्यक्ष कमलाकर सोनकांबळे, प्राचार्य अनिल देखमुख, गोगांवचे माजी सरपंच प्रदीप जगताप, वागदरीचे तंटामुक्त समिती अध्यक्ष लक्ष्मण सलगरे, हवालदार अंगद गिते, लक्ष्मण कांबळे, टेगळे, उद्योगपती बसवराज सोनकांबळे. महादेव सोनकवडे, नितीन हलसंगी, असलम मुल्ला उपस्थित होते. राजेश्री शेळके यांनी सूत्रसंचालन केले. मलय्या मठपती यांनी आभार मानले. नितीन कुलकर्णी, विद्याधर पुजारी, घुगरे यांसह शिक्षकांनी परिश्रम घेतले.




### मोडनिंब येथे निवडणूक आयोगाच्या विरोधात स्मशानभूमीमध्ये आंदोलन

**मोडनिंब, दि. ३१ ऑगस्ट-**

मोडनिंब (ता.माढा) येथे बहुजन सत्यशोधक संघाच्या वतीने भारतीय निवडणूक आयोगाच्या विरोधात स्मशानभूमीत हल्लाबोल आंदोलन करण्यात आले. या सरकारने ईव्हीएम मशीन बंद करून बॅलेट पेपर वर मतदान घ्यावे, बोगस मतदान थांबले पाहिजे, मतांची चोरी करणाऱ्या निवडणूक आयोगाला जेलबंद केले पाहिजे, सर्वच निवडणुका पारदर्शक झाल्या पाहिजेत, मतदार यादीतील सर्व मतदारांचे नावे व पत्ते यांचे चावडी वाचन झाले पाहिजे आदी मागण्यांसाठी आंदोलन मोडनिंब येथील स्मशानभूमी येथे करण्यात आले असल्याचे सुनील ओहोळ यांनी सांगितले. ईव्हीएम मशीनमुळे मतदान वाढूही शकते. त्यामुळे या सरकारने ईव्हीएम मशीन बंद करावी अशी मागणी बहुजन सत्यशोधक संघाचे संस्थापक ओहोळ यांनी या आंदोलनावेळी केली. ईव्हीएम मशीन बंद करावी अन्यथा बहुजन सत्यशोधक संघ यांच्या वतीने ठीक ठिकाणी आंदोलने करण्यात येतील असा इशारा त्यांनी दिला आहे यावेळी रिपाइंचे नागनाथ ओहोळ, प्रमोद गाडे, विनोद नागटिळक, नितीन वाघमारे, संतोष वाघमारे उपस्थित होते. २०१४ साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत ईवीएम मशिनमध्ये घोटाळा करूनच बीजेपीने १०० जागा जिंकल्या आहेत. हा आरोप राहुल गांधी आणि कॉंग्रेसने केला आहे, यात तथ्य आहे. सर्व निवडणुका बॅलेट पेपरवरच घेतल्या जाव्यात. नुकतीच माढा येथे सर्वपक्षीय बैठक घेण्यात आली आहे. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये बैठका घेण्यात येणार आहेत. कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार यांची भेट घेण्यात येणार आहे. समविचारी पक्ष आणि संघटना एकत्र करून उग्र रुपाचे आंदोलन करण्यात येणार असल्याचे बहुजन सत्यशोधक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील ओहोळ यांनी सांगितले.



### तडवळ शाळेत रिपाइंतर्फे शालेय साहित्यांचे वाटप

**अक्कलकोट दि.२९ ऑगस्ट**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) तडवळ शाखेच्या वतीने रिपाईचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या ६८ व्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक मराठी, कन्नड आणि उर्दू शाळा येथे सर्व विद्यार्थ्यांना शालेय वही, पेन, ३० चटई आणि केळी वाटप करण्यात आले. यावेळी रिपाईचे अक्कलकोट तालुकाध्यक्ष अविनाश मडिखांबे, रासपचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर, तालुका युवा अध्यक्ष अप्पा भालेराव, शहर सरचिटणीस शुभम मडीखांबे, तालुका उपाध्यक्ष उमेश शिवशरण, कन्नड शाळेचे मुख्याध्यापक गौतम कांबळे, मराठी शाळेच्या मुख्याध्यापिका मुल्ला मॅडम, उर्दू शाळेच्या मुख्याध्यापिका शेख, ग्रामपंचायत सदस्य महिबुब शेख, राजशेखर गायकवाड, राजू शिवशरण उपस्थित होते.



## कायझन होन्डामध्ये शाईन-१०० डिलक्स गाडीचे अनावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ ऑगस्ट-**

कायझन होन्डा, एम्प्लॉईमेंट चौक येथे Shine १०० DLX आणि CB१२५ Hornet या दोन दुचाकी वाहनांचे भव्य दिमाखात लॉंचिंग करण्यात आले आहे. शोरूमचे सेल्स मॅनेजर, स्टाफ आणि फायनान्स चे अधिकारी यांच्या उपस्तिथीतीत कार्यक्रम पार पडला

ग्राहकांच्या आग्रहास्तव shine १०० डिलक्स मध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या गाडीचे काही खास ठळक वैशिष्ट्ये खालील प्रमाणे या मध्ये tubeless tyre देण्यात आलेले आहे तसेच यामध्ये लांबलचक सीट देण्यात आलेले आहे विशेष स्वरूपात डिजिटल मीटर दिलेले आहे तर या मध्ये डिस्टन्स तो एमटी दर्शवते सोबत या डिजिटल मीटरमध्ये लाईव्ह मायलेज दर्शविते. स्टायलीश लुकसाठी समोरचा हेड लाईट स्लिव्हर क्रोम फिनिशिंग मध्ये दिले गेले आहे. दमदार ग्राफिक डिजाईनसह ४ कलर्समध्ये उपलध आहेत. कायझन होन्डा सर्व ग्राहकांना निमंत्रित करीत आहे कि ग्राहकांनी या गाडीचे टेस्ट राईड घ्यावी व आजच आपली गाड़ी बुक करावी.

## उडदाचे भाव घसरले; शेतकऱ्यांची होतेय आर्थिक कोंडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट ..**

तीन महिन्यात पैसा मिळवून देणारा पिक म्हणून शेतकऱ्यांनी उडीद पिकाची पेरणी केली. यावर्षी ऊन्हाळ्यात पडलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकर्यांकडून उडीद पिकाच्या पेरणीला प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे खरीप हंगामात मुग ऐवजी उडीदाचे क्षेत्र वाढले आहे. उडीद व तूर पिकाच्या पेरणीक्षेत्रात दुप्पटीने वाढ झाली आहे. मात्र काढणीला आलेल्या अवस्थेत संततधार पावसामुळे पिकामध्ये पाणी थांबल्याने उडीदाची मुळे कुजली . शिवाय पिकावर बुरशी चढल्याने उडीद पिक कमी प्रतीचा म्हणून पाच हजार रूपये क्विंटलप्रमाणे व्यापार्यां कडून खरेदी करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडून भाव वाढीची मागणी करण्यात येत आहे.

महिलांची मजूरी तीनशे रूपयेऐवजी साडेतीनशे ते चारशे रूपयापर्यंत वाढल्याचे सांगण्यात येत आहे. तर पुरूषांची मजूरीही शंभर रूपयांनी वाढली आहे. त्यामुळे सर्वत्र उडीद काढणीची चर्चा सुरू आहे. आठ दिवसापूर्वी पावसानी विश्रांती दिल्यानंतर चाळीस ते पन्नास टक्के काढणी झाली आहे. मात्र ही काढणी पावसात सापडल्याने उडीद कमी प्रतीचा असल्याचे सांगत सत्तर किलो वजनाच्या पोत्याला अडीच ते तीन हजार रूपये, तर क्विंटलला पाच हजार रूपये दर मिळत असल्याचे शेतकर्यांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे खर्चाच्या तुलनेत उडीद पिकाला भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

> दहा एकर उडीदाची पेरणी केली. चढ्या भावाने बियाणे खरेदी करून व वारंवार औषध फवारणी करूण उडीदाची देखभाल केली. मात्र काढणी कालावधीत पावसाने थैमान घातल्यामुळे उडीदाचे नुकसान झाले आहे . काढणीवेळी मजूरीही वाढल्याने त्याचाही फटका बसला आहे . उडीद डॅमेज झाले आहे, म्हणून व्यापार्यांकडून कमी भावाने मागणी करण्यात येत आहे. त्यामुळे शृसनाने उडीदाची भाव वाढविणे गरजेचे आहे.
>
> **- गुरूनाथ जोडमोटे इंजिनिअर, शेतकरी मंद्रुप**

> शेतकऱ्यांकडून उडीद विक्रीसाठी येत आहे. पंधरा दिवसापासून ऊन्ह नसल्यामुळे माल कच्चा आहे. त्यामुळे बाजारात मागणी कमी आहे. क्विंटलला चार ते पाच हजार रूपये दर आहे. ऊन्हात काढणी केल्यास व माल चांगला कडक असल्यास दरामध्ये वाढ होऊ शकते. शेतकर्यांनी कच्चा माल न करता ऊन्हात ठेऊन विक्री केल्यास फायदेशीर ठरू शकते.
>
> **- रोहन लातुरे, व्यापारी मंद्रुप**



## माजी आमदार बबनदादा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ३१ ऑगस्ट-**

माढा तालुक्याचे भाग्यविधाते माजी आमदार बबनदादा शिंदे यांच्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त श्री ओंकारनाथ मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. संजय पाटील यांच्या हस्ते शुभारंभ करून मंदिर परिसरात वेगवेगळे फळाची आंबा (केशर) ६०, चिकू १०, फणस ५, जांभूळ ५, लिंबू ५ व शोभेची झाडे लावण्यात आली यावेळी रमेश पाटील, वसंत चौगुले, एम. डी. जाधव, विश्वभर चव्हाण, अक्षय पाटील, नितीन मस्के, नेताजी चमरे,विजय पतुले, डॉ. विनोद चव्हाण, सचिन मस्के, बालाजी मस्के, दादा तकीक, सुभाष मोहिते, परशुराम जाधव, शहाजी चव्हाण, अमोल पाठक, गोविंद गोठणे, सुभाष जाधव, दादा कदम, नागेश माने, शिवाजी माने, मुकुंद बागल, बंडू पाटोळे, राहुल टिंगरे उपस्थित होते.

## ए.आय. कॉल्समुळे रेशन दुकानदार हैराण

■ जिल्हा संघटना नाराज; तक्रार दाखल करणार

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३१ ऑगस्ट-**

नागरिकांच्या सोयी सुविधेसाठी एआय कॉल्स प्रशासनाकडून सुरू केले असले तरी त्याचा नाहक त्रास दुकानदारांना सोसावा लागत आहे. त्यामुळे रेशन दुकानदार महासंघ जिल्हा संघटनेकडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सोलापूर जिल्हा प्रशासनाकडून नागरिकांच्या सोयी सुविधीसाठी ए आय कॉल्स सुविधा सेंटर केले असून या ठिकाणाहून जिल्ह्यामधील गावोगावातील नागरिकांना दूरध्वनीवरून कॉल आल्यानंतर आपल्याला रेशन दुकानदार धान्य देतात का,आपल्याला रेशन दुकानदार यांचेकडून वेळेवर धान्य मिळून शासन नियमानुसार धान्य भेटते का,रेशन दुकानदार यांच्याकडून चांगल्या प्रतीचे धान्य दिले जाते का असे अनेक प्रश्न दूरध्वनीवरून एआय कॉलच्या माध्यमातून नागरिकांना विचारून आलेल्या सर्व तक्रारी पुरवठा विभागाकडे वर्ग केल्या जातात. परंतु पुरवठा विभाग यांच्याकडे एखाद्या गावाची तक्रार आल्यानंतर त्या गावामध्ये दोन ते तीन रेशन दुकान असतात. तक्रार ही एका दुकानाची असली तरी तालुका पुरवठा स्तरावरून काही रक्कमे साठी इतर दोन रेशन दुकानदारांची ही तपासणी करून त्याना नाहक त्रास देण्याचे काम करत आहेत.त्यामुळे एआय कॉलच्या माध्यमातून ज्या धान्य दुकानदारांची तक्रार आहे.त्याच धान्य दुकानदाराचे वैयक्तिक नाव येणे गरजेचे आहे. परंतु दुकानाचे नाव न आल्यामुळे रेशन कार्डधारक हा एका दुकानाचा लाभार्थी असतो व अधिकारी मात्र तपासणी दुसऱ्या दुकानाची करून त्यांना नाहक त्रास देऊन स्वतःची पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. तसेच अधिकारी तपासणीसाठी आल्यानंतर संबंधित तक्रारदार यांचे रेशनकार्ड हे केशरी असते व ते एपीएल रेशनकार्ड धारक असल्यामुळे त्यांना शासनाकडूनच धान्य मिळत नाही असे निदर्शनास येते व रेशन दुकानदार यांना जर वजन करून धान्य मिळाले तर रेशनकार्ड धारकांना सुद्धा रेशन दुकानदार हे व्यवस्थित धान्य वाटप करतील. तसेच शासनाकडून जे धान्य उपलब्ध करून देण्यात येते तेच धान्य रेशन दुकानदार ही रेशन कार्डधारकांना वाटप करत आहेत. या सर्व कारणामुळे चुका नसताना सुद्धा रेशन दुकानदारांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

नागरिकांच्या सोई सुविधा साठी ए आय कॉल्स सेंटर विषयी प्रशासनाचे स्वागतच आहे परंतु ए आय कॉल्सच्या माध्यमातून प्रशासनाकडून फक्त रेशन दुकानदार यांचेवरच कारवाई न करता सखोल माहिती घेऊनच संबंधित चुकीच्या पद्धतीने काम करणारा अधिकारी कर्मचारी व रेशन दुकानदार यांचेवर प्रशासनाकडून जरूर कारवाई व्हावी तसेच याबाबत अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघ सोलापूर ग्रामीण जिल्हा संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय मंडलिक व सर्व तालुकाध्यक्ष हे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन ए आय कॉल्स मधील काही विचारले जाणारे चुकीचे प्रश्न व त्रुटी यांच्यासमोर सर्व अडचणी मांडणार आहेत.यामुळे शासनाचा व अधिकाऱ्यांचा वेळ वाचेल व चुकीच्या तक्रारी कमी होण्यास मदत होईल.

## मंद्रुप परिसरात बाधित पिकांचे होईनात पंचनामे; तहसीलदारांकडून उडवाउडवीची उत्तरे

■ पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूरसह मंद्रुप परीसरात ऑगस्ट महिन्यात यंदा रोजच संततधार पाऊस पडत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेली खरीप पिके वाया गेली आहेत. शिवाय अतिवृष्टी झाल्यानेही पिकांचे नुकसान झाली आहे. खरीप हंगामातील उडीद, तूर, सोयाबीन, बाजरी, मूग यासारख्या पिकांमध्ये पाणी थांबल्याने पिके जळून गेली आहेत. नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामा करण्याची मागणी होत असताना मंद्रुपचे तहसीलदार उडवीउडवीची उत्तरे देऊन शेतकऱ्यांना आर्थिक संकटात टाकत आहेत. विविध सामाजिक व शेतकरी संघटनांकडून पंचनामा करून नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात येत आहे.

यावर्षीच्या अवेळी आलेल्या व संततधार पावसामुळे खरीप पिके धोक्यात आली आहेत. मे महिन्यात पाऊस सुरू झाल्याने शेतकर्यांनी जून महिन्यात पेरणी केली. मात्र त्यानंतर एक महिना पावसांनी विश्रांती घेतल्यामुळे पिके करपून गेली. जुलैच्या दुसर्या आठवड्यापासून पावसास सुरूवात झाली. त्यामुळे उर्वरीत पिकांना जीवदान मिळाल्याने शेतकर्यांनी आंतरम शागतीसह औषध फवारणी पिके जगविली. मात्र ऑगस्ट महिन्यात सतत आठ दिवस संततधार पाऊस झाल्याने व ऊन्हाचे दर्शन न झाल्याने पिकांचे मुळे कूजून उडीद, तूर, सोयाबीन व मूग ही पिके करपून गेली आहेत.

पर्जन्यमापक यंत्रावर विसंबून असलेल्या महसूल व कृषी विभागाकडून आतापर्यंत फक्त नदीकाठी पुराने बाधित झालेल्या पिकांचे पंचनामे करण्यात आले असून, इतर क्षेत्रासाठी या विभागांकडून मंद्रुप अप्पर तहसील हद्दीतील गावांमध्ये कमी पाऊस असल्याने पंचनामे करता येणार नसल्याचे सांगण्यात येत आहे. तालुक्यातील बोरामणी व मुस्ती मंडलांसाठी पंचनाम्याचे आदेश देण्यात आले असून, इतर मंडलांतील शेतकरी महसूल आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क केला असता वरिष्ठांकडून आदेश नसल्याचे सांगितले जाते. याउलट वरिष्ठ कार्यालयात जाऊन पंचनाम्याची मागणी केली असता, कमी पाऊस झाल्यामुळे निकषात बसत नसल्यामुळे पंचनामे करता येत नाही, असे सांगण्यात आले. यामुळे पर्जन्यमापक यंत्रावर विसंबून राहणारा कृषी आणि महसूल विभाग मात्र शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केल्याशिवाय पिकांचे किती नुकसान झाले आहे, हे त्यांच्या लक्षात येणार नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी शेतकरी करीत आहेत.



> मंद्रुपच्या तहसीलदारांनी पर्जन्यमापकचे कारण देऊन शेतकर्यांना नुकसानभरपाई पासुन वंचित ठेऊ नये. हाता तोंडाशी आलेली पिके जमीनदोस्त झाल्याने शेतकर्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. खरीप वाया गेल्याने रब्बी हंगामावर परीणाम होणार आहे. म्हणून तहसीलदारांनी स्थानिक आपत्ती म्हणून पंचनाम्याचे आदेश द्यावेत, अन्यथा आंदोलन करून मंद्रुप अप्पर तहसील कार्यालयाला कुलुप लावणार आहे.
>
> **-जावीद आवटे, तालुका अध्यक्ष, अखिल भारतीय किसान सभा, दक्षिण सोलापूर**

> **लवकरात लवकर पंचनामे सुरू करा**
>
> जमिनीतील ओलावा वाढून पिकांत पाणी साचल्यामुळे तूर, उडीद आणि मूग पिकांचे शेंगा कुजून गेले आहेत. दहा एकर क्षेत्रातील तूर पिकांमध्ये पाणी थांबल्याने तुरीचे झाडावरील पाने गळून पडली आहेत. शिवाय तुराटीसारखे तूरीची अवस्था झाली आहे. पावसामुळे वीस एकर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने लवकरात लवकर पंचनामे सुरू करण्याचे आदेश देऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करावी.
>
> **-शिवपुत्र म्हेत्रे , शेतकरी, मंद्रूप,**

> दक्षिणमधील चार मंडलातील पिकांचे पंचनामे पूर्ण झाली आहेत. पंचनाम्यासाठी कृषी यंत्रणा सज्ज आहे. मात्र अपर तहसीलदार यांच्याकडून आदेश प्राप्त नाहीत. पंचनाम्यांबाबत पुढील आदेश प्राप्त झाल्यानंतर बाधित पिकांच्या प्रक्षेत्रावर प्रत्यक्ष पाहणीचे काम सुरू करण्यात येईल.
>
> **- अवधूत मुळे, तालुका कृषी अधिकारी, दक्षिण सोलापूर**

> मंद्रुप अप्पर तहसील कार्यालयाअंतर्गत गावांमध्ये संततधार पावसाचे प्रमाण १० मिलीमीटर व अतिवृष्टीचे प्रमाण ६५ मिलीमीटरपेक्षा कमी आहे. वरीष्ठ कार्यालयाच्या अहवालानुसार पावसाचे प्रमाण कमी असल्याने पंचनामे करण्याचे आदेश नाहीत. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आदेश आल्यास पंचनामा करण्याच्या सूचना देऊ.
>
> **- सुजित नरहरे, तहसीदार, अप्पर तहसील मंद्रुप**

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## माळशिरस परिसरात घरोघरी उत्साहात गौरीचे आगमन

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ३१ ऑगस्ट-**

माळशिरस शहर परिसरात घरोघरी मोठ्या उत्साहात भक्ती भावात 'गौरी आल्या सोन्याच्या पावलाने', ' गौरी आल्या मोती पोवळ्याच्या पावलाने आल्या' या जयघोषात आज आगमन झाले. आज गौरीचे आगमन असल्याने सकाळपासून महिलांची लगबग सुरू होती. तर गौरी सजावट करण्यासाठी कुटुंबातील सदस्य मदत करीत होते. सोमवारी गौरीचे पूजन होणार आहे. तर गौरी पूजनादिवशी महिला हळदी कुंकवांसाठी घरोघरी जातात. मंगळवारी गौरी विसर्जन आहे.





**महत्त्वाचे**



## गौराईच्या स्वागतासाठी पंढरीत साकारली महाद्वार प्रतिकृती

**पंढरपूर, दि. ३१ ऑगस्ट-**

श्री संत नामदेव महाराज यांनी समाधी घेतली त्याला यावर्षी ६५० वर्षे पूर्ण झाली. हे वर्ष षष्ठशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी सोहळा समाधी दिन म्हणून साजरे होत आहे. याच पार्श्वभूमीवर पंढरपूर येथील सुप्रसिद्ध फोटोग्राफर उमेश मधुकर टोमके (भागवत) व परिवाराने आज महालक्ष्मीच्या सणावेळी श्री संत नामदेव महाराज महाद्वारची सुंदर हुबेहूब प्रतिकृती आपल्या टाकळी रोड येथील निवासस्थानी तयार केली आहे. गेली आठ दिवस परिश्रम घेऊन ते महाद्वार आज पुर्णत्वास आले आहे. यावेळी हा देखावा करण्यामागचा उद्देश उमेश टोमके यांना विचारला असता ते म्हणाले, श्री संत नामदेव महाराज पायरी ही भारताची दक्षिण काशी समजल्या जाणाऱ्या श्री विठ्ठल रूक्मिणी मंदीराच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळील पायरी आहे. जिथे संत नामदेव महाराज व त्यांचे कुटुंबीयांनी समाधी घेतली. संतांच्या व विठू माउली भक्तांच्या चरणधुळीचा लाभ व्हावा या हेतूने संत नामदेवांनी नामा म्हणे आम्ही पायरीचे चिरे । वरी संत हिरे पाय देती । असे म्हणत या पायरीवर समाधी घेतली. त्यामुळे या प्रवेशद्वाराला महत्व प्राप्त झाले आहे. आज हजारो नाही तर लाखो भक्त या पायरीचे दर्शन घेतात. त्यामुळे आपण किती भाग्यवान आहोत की या भूवैकुंठ नगरीचे नागरीक आहोत म्हणूनच यावर्षी गौराई समोर हा देखावा तयार करण्याचे ठरवले होते.हा देखावा करणेकामी कुटुंबातील सर्वांचे आपणाला सहकार्य लाभल्याचे श्री. टोमके यांनी सांगितले.

## आ. दिलीप सोपलांचा मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा

**बार्शी, दि. ३१ ऑगस्ट-**



मराठा समाजाच्या आरक्षणाच्या न्याय मागणी संदर्भात कार्यवाही करण्याबाबत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना बार्शीचे आमदार दिलीपराव सोपल यांनी विनंती पत्र लिहिले आहे. ते पत्रात म्हणतात की, मराठा समाज गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक न्याय व समान संधीसाठी आरक्षणाची आग्रही न्याय मागणी करीत आहे. या मागण्यांच्या समर्थनार्थ संघर्षयोद्धा श्री. मनोजदादा जरांगे पाटील यांचे आझाद मैदान, मुंबई येथील न्याय आंदोलन सुरु आहे. मराठा समाजाच्या न्याय मागण्यास आमदार म्हणून मी पूर्ण पाठींबा दर्शवीत आहे. राज्यातील मराठा समाजातील लाखो सामाज बांधव या मागणीशी निगडीत असुन त्यांच्या सामाजिक, शैक्षणीक भविष्याचा प्रश्न समोर उभा आहे. शासनाने या प्रश्नावर न्याय निर्णय करावा ही माझी विनंती आहे. आपण कार्यवाही कराल अशी अपेक्षा करतो, असे त्यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

## बार्शीतून मुंबईला जाणार अन्नधान्य; समाज बांधवांनी सहकार्य करण्याचे आवाहन

**बार्शी, दि. ३१ ऑगस्ट-**

आपल्या न्याय मागण्या घेवून मनोज जरांगे-पाटील मुंबईत आरपारची लढाई लढत आहेत. या लढ्यात सहभाग घेतलेल्या मुंबईतील मराठा समाज बांधवांचे तेथे अन्न-पाण्याविना होत असलेले हाल ऐकून बार्शीत मराठा समाजातील युवकांनी शिवसृष्टी येथे तातडीची बैठक बोलावली होती. यात तेथील बांधवांच्या सहकार्यासाठी तांदूळ, तेल डबे व डाळ अशी अन्नधान्य स्वरुपाची मदत पाठविण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करुन भर पावसात बैठकीला सुरुवात झाली. मनोज जरांगे-पाटील हे मराठा समाजाच्या न्याय मागण्यासाठी आपले प्राण हातावर घेवून लढत आहेत. तेथे आंदोलकांचे हाल होत आहेत. बैठकीत एकमत होवून डाळ, तांदूळ, तेल डबे, पाण्याचे बॉक्स अशा वस्तू पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी हर्षवर्धन पाटील, निलेश पवार, तुळशीदास मस्के, प्रितम मोरे यांनी तसेच आंदोलनातून परतलेले दोन आंदोलकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. रविवार दि ३१ रोजी दिवसभरात जमा झालेली अन्नधान्य स्वरुपातील मदत एकत्र करुन सायंकाळी बार्शीतील शिवसृष्टी येथून टेम्पोमध्ये मुंबईला पाठविण्यात येणार आहे. ही मदत ऐच्छिक असून ज्या समाजबांधवांना मदत देण्याची इच्छा आहे, त्यांनी त्या भागात समन्वयक यांच्याशी संपर्क साधून जमा करावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## न्यू हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे कुस्ती स्पर्धेत यश

**बार्शी, दि. ३१ ऑगस्ट-**

येथील न्यू हायस्कूल प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी तालुक्यातील कुस्ती स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करुन प्रशालेचा नावलौकिक वाढविला आहे. विश्वजीत शरद काशीद यांनी ५५ किलो वयोगटात तालुक्यामध्ये कुस्ती खेळामध्ये प्रथम क्रमांक पटकावला. समर्थ सुहास काशीद याने ११० किलो वजन गटात तालुक्यात दुसरा क्रमांक मिळवला. या विद्यार्थ्यांच्या यशाचे मुख्याध्यापक सारंग, संस्थेचे सचिव ज्ञानदेव गादेकर, प्रशिक्षक शिंदे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# जगात संशोधन व ज्ञानाला पर्याय नाही

## उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील; स्वेरी लॉ कॉलेजच्या इमारत व क्रीडांगणाचे उद्घाटन





**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि. ३१ ऑगस्ट-**

आजचे जग ज्ञानावर सुरु आहे.विकास हा ज्ञानातून होतो. ज्ञान हीच शक्ती आहे ज्ञानाच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांनी काम केले पाहिजे. जग हे संशोधनावर श्रीमंत झाले आहे. ज्ञान नसेल तर तंत्रज्ञानात पुढे जाता येणार नाही, जगात पुढे जायचे असेल तर नाविन्यपूर्ण संशोधन व ज्ञानाला पर्याय नाही, असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पंढरपूर या संस्थेच्या स्वेरी लॉ कॉलेज पंढरपूर, नवीन बहुउद्देशीय इमारत, विद्युत प्रकाश झोताच्या सुविधेने सुसज्ज भव्य क्रीडांगण तसेच मुलींचे नऊ मजली नूतन वस्तीगृह पायाभरणी सोहळा उच्च व तंत्र शिक्षणमंत्री आणि संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याहस्ते करण्यात आला.

यावेळी ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजित पाटील, आमदार बाबासाहेब देशमुख, माजी आमदार प्रशांत परिचारक, स्वेरी कॉलेजचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे, सचिव सूरज रोंगे, डॉ.अनिकेत देशमुख, जि. प माजी सदस्य वसंतनाना देशमुख तसेच कॉलेजचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, जगातले सवोर्त्तम ज्ञान भारतात होते. नालंदा, तक्षशिला जगातील पहिली विद्यापीठे होती. आपल्या क्षेत्रातील सामाजिक गरजांची पूर्तता करायची असेल तर सर्व क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञान शिक्षणसंस्थातून निर्मित होणे गरजेचे आहे. तसेच नाविन्यपूर्ण संशोधनासाठी शिक्षणसंस्थे बरोबर शासन राहिल. राज्यात ८४२ कोर्सेस ना मुलींना फी माफ केलेली आहे. मुलींच्या वसतीगृहाशिवाय त्यांच्या उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढणार नाही. सुरक्षित वसतीगृहे आवश्यक आहे, मुलींच्या वस्तीगृहाला पर्याय नाही. कमवा व शिका या योजनेतेर्गत राज्यातील पाच लाख मुलींना किमान दोन हजार रुपये प्रति महिना देण्याचे उद्दिष्ट आहे. यावर शासन काम करत आहे. मुलींना मोफत शिक्षण व इतर शैक्षणिक आवश्यक सुविधा उपलब्ध करुन दिल्यास त्या खुप शिकतील असे ही उच्च व तंत्र शिक्षणमंत्री श्री.पाटील यांनी सांगितले.

यावेळी उद्दीष्टपुर्ती करण्यासाठी माणसाला ध्येय लागते. रोंगे सरांनी मेहनत घेवून स्वेरी संस्था नावारुपाला आणली असे गौरोवद्गार उच्च व तंत्र शिक्षणमंत्री श्री.पाटील यांनी केले.

दरम्यान प्रास्ताविकात स्वेरी संस्थेचे संस्थापक डॉ.बी.पी रोगे म्हणाले, सन १९९८-९९ पहिलंच वर्ष त्यावर्षी या महाविद्यालयाची रूपाली पवार या विद्यार्थिनी शिवाजी विद्यापीठामध्ये गोल्ड मेडल मिळवून पहिली आली होती.ती परंपरा अद्याप चालू आहे स्वेरी संस्थेची विद्यार्थी संख्या १६०वरून ५ हजार ५०० विद्यार्थी संख्या, तर ८ शिक्षकावरुन ३३० शिक्षक संख्या झाली. संस्थेचे प्लेसमेंटच्या माध्यमातून ५०० हून अधिक विद्यार्थी नोकरीला लागले आहेत. विकसित देशात संस्थेचे विद्यार्थी नोकरी करीत आहेत. प्रवेश आणि कॅम्पस एवढेच नाही तर संशोधन करण्यालाही प्राधान्य दिलेले आहे. राजीव गांधी सायन्स अँड टेक्नॉलॉजी कमिशन यांनी ३३ कोटी ७३लाख रुपयेचा दोन वर्षाच्या रिसर्च प्रोजेक्ट मंजूर केला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### मुलींच्या शिक्षणात कोणतीही अडचण येऊ न देणे ही भूमिका शासनाची : पालकमंत्री

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, मुलींना शिक्षणामध्ये कुठल्या अडचणी येऊ नये त्यांना समाजामध्ये मानाचे स्थान मिळालं पाहिजे ही भूमिका शासनाची आहे. मराठा समाजातील मुला-मुलींना शिक्षण देण्यासाठी शिक्षणातल्या सगळ्या सवलती देण्याचा निर्णय शासनाने घेतला .तसेच चांगल्या शिक्षणाबरोबर निवासाची चांगली व्यवस्था व्हावी यासाठी सर्व जिल्ह्यात मराठा समाजातील मुला मुलींसाठी वसतीगृहाची व्यवस्था करण्यात येत आहे. देशाची पिढी घडविण्यासाठी विद्यार्थ्यांना चांगलें शिक्षण आणि चांगल्या सुविधा देण्यासाठी स्वेरी ने नेहमीच प्राधान्य दिलेले आहे. स्वेरीमुळे गोर गरिबांच्या मुलांसाठी उच्च शिक्षणाची सोय झाली आहे. विद्यार्थी घडवण्यासाठी जे जे करायला लागेल ते करण्याचा संकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला असून, शैक्षणिक दर्जा सुधारण्याच्या कार्याला राज्यशासन नेहमी सहकार्य करेल,असेही पालकमंत्री श्री गोरे यांनी सांगितले.

## कॅनॉलच्या पाण्यामुळे पिके उध्वस्त

### मंद्रुपच्या शेतकऱ्यांवर ओल्या दुष्काळाचे सावट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ ऑगस्ट-**

मंद्रूप परिसरात झालेला जोरदार पाऊस अन् कॅनॉलमधून मोठ्या प्रमाणात सुरू असलेला पाण्याचा प्रवाह यामुळे शेतात पाणी घुसले आहे. उडीद, तूर, मूग, सोयाबीन, भुईमूग, बाजरी व इतर बागायती पिके उध्वस्त होत आहेत. त्यामुळे ओल्या दुष्काळाचे सावट आहे.



उन्हाळ्यात पाटबंधारे विभागाकडून शेतकऱ्यांना पाणी सोडण्यात येत नाही. मात्र सध्या कॅनॉलच्या जास्त पाण्यामुळे ओला दुष्काळाची स्थिती आहे. कॅनॉलच्या मोठ्या प्रवाहामुळे शेतात पाणी थांबले आहे. कालव्यातील पाण्यामुळे माती वाहून जाण्याचे प्रमाण वाढत आहे. शिवाय पिकांत पाणी थांबल्याने पिकांची मुळे कुजुन पिके जमीनदोस्त होत आहेत. त्याचा मोठा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसणार आहे. कॅनॉलच्या पाण्यामुळे जमिनीतील माती उताराच्या दिशेने वाहून जात असल्याने जमीनीची धूपही होत आहे. सध्या कॅनॉलच्या पाण्याची आवश्यकता नाही. मात्र पाटबंधारे विभागाकडून कॅनॉलमध्ये पाणी सोडल्याने खरीप हंगामातील पिके उध्वस्त होत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना भरपाई देण्याची मागणी होत आहे.

> मंद्रुप परिसरात दहा एकर तूर व उडीद पीक आहे. संपूर्ण शेतामध्ये पावसाचे पाणी असताना कॅनॉलमधून ही पाणी शेतात शिरले आहे. त्यामुळे शेतातील माती वाहून जात आहे. शिवाय पिकांची मुळे कुजल्यामुळे पिकेही वाहून गेली आहेत. त्यामुळे पिकांची नुकसान भरपाई देण्यात यावे. - **अमजद मकानदार,** शेतकरी मंद्रूप

## सह्याद्री सामाजिक संस्थेतर्फे वृक्षारोपण



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ ऑगस्ट-**


येथील सह्याद्री प्रतिष्ठान सामाजिक व बहुउद्देशीय संस्था यांच्यावतीने सार्वजनिक गणेशोत्सवनिमित्ताने उपळाई रोड येथील भागात सामूहिक वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचा विचार अंगी बाळगत संस्थेच्या सर्व सदस्यांनी बार्शीतील वृक्ष संवर्धन समिती यांच्या सोबत वृक्षरोपण केले. मंडळांनी बार्शीतील वृक्ष संवर्धन समिती यांना सोबत घेत गणरायाच्या साक्षीने वृक्षारोपण करण्याचे कार्य हाती घेतले. या कार्यासाठी बार्शी नगरपरिषदेने स्वच्छता करण्यासाठी देखील सहकार्य केले आहे. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, प्रशासन अधिकारी वाठोरे यांनी मंडळाला सहकार्य केले. या कार्यक्रमासाठी उपस्थितीत वृक्ष संवर्धन समितीचे अध्यक्ष उमेश काळे चांदमल ज्वेलर्सचे विशाल गुगळे, नलवडे सर, तात्या शेंडगे, राऊत, युवराज जगताप सर हे उपस्थित होते. मंडळाचे अध्यक्ष प्रदीप चव्हाण, सचिव निखिल मस्के तसेच मंडळाचे सदस्य केशव मुकटे, ओमप्रसाद अनपट, विशाल जाधव, कुमार जाधव, पंकज रणदिवे, बबलू राऊत, सनी शिंदे, यश ढोणे, मनोज शिंदे, महेश गवळी उपस्थित होते.

## कवठेकर प्रशालेमध्ये प्लास्टिकबाबत वादविवाद स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.३१ ऑगस्ट -**

येथील पंढरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित कवठेकर प्रशाले मध्ये इयत्ता दहावीच्या वर्गातील मुलांनी प्लास्टिक हा विषय निवडून प्लास्टिकचा वापर करावा किंवा प्लास्टिकचा वापर करू नये यावर वादविवाद स्पर्धेमध्ये भाग घेतला.

प्लास्टिकचा अतिवापर हा घातकच परंतु काही ठिकाणी प्लास्टिकचा वापर अपरिहार्यपणे करावा लागतो. प्लास्टिकचा वापर करावयाचा असेल तर प्लास्टिकचे विघटन कसे करावे जेणेकरून पर्यावरणाची हानी होणार नाही व पर्यायाने जीवित वित्तहानी होणार नाही अशा पद्धतीची वाद विवाद स्पर्धा अत्यंत चुरशीने पार पडली.



अखेर या वादविवाद स्पर्धेमध्ये मुलींच्या गटाने बाजी मारली. विशेष म्हणजे इयत्ता दहावी ( तुकडी, ड ) मधील पाटील हा विद्यार्थी या वादविवाद स्पर्धेतील बेस्ट स्पीकर ठरला. या स्पर्धेसाठी प्रशालेतील ज्येष्ठ शिक्षक नरेंद्र भंडारकवठेकर, खिलारे यांनी परीक्षणाचे काम बघितले.

विद्यार्थ्यांना वादविवाद स्पर्धेसाठी भक्ती रत्नपारखी यांनी प्रमुख मार्गदर्शन केले तर कार्यक्रमाचे नियोजन वाडीले यांनी केले. हा कार्यक्रम प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही.वाय. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात पार पडला. प्रशालेच्या उपमुख्याध्यापिका एस.आर. कुलकर्णी तसेच पर्यवेक्षक गडदे, शेलार आदींसह प्रशालेतील सर्व शिक्षक,शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होते. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नानामालक कवठेकर, चेअरमन विणा जोशी, सचिव सुधीर पटवर्धन तसेच सर्व सदस्यांनी अभिनंदन केले.

# पाणी वापर संस्थांची नोंदणी काळाची गरज

## आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील; भीमाकाठच्या १५ गावांची बैठक गणेशगाव येथे संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३१ ऑगस्ट-**

डिसेंबर अखेरपर्यंत उजनीतील सव्वादोन टीएमसी पाणी घाटणे बंधाऱ्यात जाणार आहे .पुढील वर्षी पर्यंत उजनीतील आणखी सात टीएमसी पाणी मराठवाड्यात जाणार आहे. त्याशिवाय बंदिस्त जलवाहिनी झाल्याने सोलापूरला पिण्याच्या पाण्याच्या नावाखाली भिमेला सोडण्यात येणारे सात टीएमसी पाणी भीमेतून येणे बंद होणार आहे. उजनीतील पाण्याचा हा तुटवडा वरचेवर वाढत जाणार असल्याने उजनीचे पाणी आरक्षित करण्यासाठी पाणी वापर संस्थांची नोंदणी करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी केले.

माळशिरस व माढा तालुक्यातील भिमेकाठच्या पंधरा गावांची बैठक आमदार रणजितसिंह यांनी गणेशगाव येथे आज (रविवार) घेतली. या बैठकीस माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते -पाटील शिवतेजसिंह मोहिते-पाटील, विश्वतेजसिंह मोहिते-पाटील ,भीमा पाटबंधारे मंडळाचे कार्यकारी अभियंता सोमशेखर हरसुरे, उप अभियंता कल्याणराव देशमुख व इतर अधिकारी आणि हजारो शेतकरी उपस्थित होते .त्याआधी गणेशगाव येथील नव्याने बांधण्यात येणाऱ्या ३३ / ११ के .व्ही . च्या वीज उपकेंद्राचे भूमिपूजन आमदार मोहिते-पाटील यांच्या हस्ते झाले .यावेळी विठ्ठल नलावडे , सरपंच रेहाना नजीर शेख , उपसरपंच बाळासाहेब ठोकळे, कुंडलिक शेंडगे, कार्यकारी अभियंता संजीव राठोड उपस्थित होते.

मला पाण्याचे राजकारण करायचे नाही म्हणून भर पावसाळ्यात आज ही बैठक आयोजित केली आहे. उजनी धरणावरील पाण्याचा ताण वाढत चालला आहे. आपण वेळीच जागे झालो नाही तर भविष्यात मोठे जल संकट येणार आहे . त्यासाठी भीम`च्या दोन्ही काठावरील गावांनी आपापल्या स्तरावर पाणी वापर संस्था निर्माण करण्याची गरज आहे , असे केले तरच आपले पाणी आरक्षित राहणार आहे अन्यथा ते इतरत्र वापरले जाईल असा इशारा देखील आमदार रणजितसिंह मोहिते - पाटील यांनी दिला. पुढील आठवड्यात या संदर्भात पंढरपूर येथे देखील बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे .

> नुकत्याच येऊन गेलेल्या पुरात भीमा व निरेतून १४२ टीएमसी पाणी वाहून गेले आहे यावरून स्थिरीकरण योजनेचे महत्त्व अधोरेखित होते. सोलापूरला पिण्यासाठी एक टीएमसी पाणी जलवाहिनीतून जात होते आता त्याचा विस्तार केल्याने सोलापूरला सव्वादोन टीएमसी पाणी जाणार आहे .बंदिस्त जलवाहिनीद्वारे सोलापूरला पाणी जाणार असल्याने नदीद्वारे सोलापूरला पिण्यासाठी सोडण्यात येणारे पाणी बंद होणार आहे .उजनी वरील पिण्याच्या पाण्यासाठी असणाऱ्या योजनांना नऊ टीएमसी पाणी लागते त्यासाठी प्रत्यक्षात १७ टीएमसी पाणी सोडावे लागते . आता यातही सात टीएम सी ची घट होणार आहे त्यामुळे नदीकाठच्या गावांचा भविष्यकाळ वाईट असल्याचे आमदार रणजितसिंह यांनी समजावले .

> उजनी हा प्रकल्प बारमाही नसून आठमाही आहे . येथे खरीप व रब्बी हंगामासाठीच पाण्याची तरतूद आहे उन्हाळ्यासाठी नाही असे कार्यकारी अभियंता हरसुरे यांनी सांगितले .पाणी वाटप संस्था झाल्यानंतर त्या पाणी वाटप संस्थेचे हक्काचे पाणी ती संस्था कोठेही साठवून त्याचा उन्हाळ्यात उपयोग करू शकते.कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यांवर ३०० ते १ हजार हेक्टर पर्यंत क्षेत्र सिंचित होईल एवढ्या क्षमतेच्या पाणी वाटप संस्था नदीच्या दोन्ही तीरावर स्थापन करण्यात येतील.